ed NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

[ ... ४७ ] आकोला-- सोमवार तारीख ७ माहे एप्रिल सन १९१३ इ० [ अंक १३

नोटीस ...
... पास्टूल
...ली नि
... कीं उ
...ली त्या
... चें
... वाडी

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........२ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील. नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठीमागुतें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस भगर त्यांपैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } G. A. Phillips.
आकोला ९।९।०९ } एजंट
नं १

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६¾ तोळे असतें.

साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक } G. A. Phillips.
आकोला २१-९-१० } एजंट
नं० नं० २

### हिंदुस्थानावर आरिष्ट.

हिंदुस्थानातील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें आरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु

बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १।८

बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली खरूज याचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला नें. पी. मु वरळी लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ३

## माझा मला पाहिजे

तुम्ही कांहीं ही ह्मणा पण मी कांहीं हा माझा नांगर तुह्मांस देणार नाहीं हा नऊ नंबरचा नांगर आहे व तो माझा मला पाहिजे आणि तुह्मांला ही तसलाच पाहिजे असल्यास तुह्मी किर्लोस्करबंधु किर्लोस्करवाडी (जिल्हा सातारा) यांना लिहा ह्मणजे ते तुह्मांला पाठवून देतील. मी त्याला एकूणचाळीस रुपये दिले आहेत.

किर्लोस्कर बंधु
पोस्ट किर्लोस्कर वाडी.
जि० सातारा ( सं. औंध. )
नो० नं० ४

—सीतागीत—किं. २ आणे

शाळा खात्यानें मंजूर केलेलें, मनोरंजन, केसरी, आनंद वगैरेंनीं उत्तम अभिप्राय दिलेलें, मुद्दाम स्त्रियांकरितां सोप्या व चटकदार चालीवर रचलेलें.

अडीच आण्याची तिकिटे पाठवून मागवा.

कर्ता:--- गणेश दिनकर आठवले
मास्तर हायस्कूल
नो० नं० ५ आकोला [ वऱ्हाड ]

# निराश्रित बालरक्षण गृह

सर्वत्र जनसमाजास अल्प मतीनें व अज्ञान बुद्धीनें व नम्रतेनें जाहिर करण्यांत येते कीं ज्या ज्या ज्ञातींत पुनरविवाहाची वहिवाट नाहीं त्या त्या ज्ञातींत वैधव्याचें प्रमाण दिवसें दिवस वाढत चाललें आहे यामुळें गर्भपात बालहत्यादी पातकें कशीं होतात व त्यांचा परीणाम पातकी व त्यांचे संसर्गी लोकांस कसा भोगावा लागतो व सदरील संबंधानें अनीवार्य संकटांत पडल्यामुळें त्यांना किती दुःखें सोसावीं लागतात. ते तपसीलवार लिहिण्यास अशक्य आहे. तरी थोडक्यांत त्याचा परीणाम इतकाच आहे कीं ईश्वरापुढें पातकी, सरकारपुढें गुन्हेगार, व आपआपल्या ज्ञातींत अनेक प्रकारच्या दोषास पात्र व घरांतील आप्त वर्गास स्वतः डोळ्यावर झांकण टाकून कानाडोळा कसा होतो याचा विचार प्रत्येकांनी स्वतःच करावा. या सर्व गोष्टीविषयीं जगनियंत्या परमेश्वरानें माझे मनांत संचार केल्यामुळें वर दर्शविलेल्या संकटांतून निभावण्याकरितां आकोला ताजनापेठेंत हनुमान वस्तींत मारुतीचें देवळाजवळ निराश्रित बालरक्षण गृह स्थापन केलें आहे. भाड्यानें घेतलेलें घर केव्हां सोडावें लागेल याचा निश्चय नसतो या करितां मुद्दाम विकत घेतलेलें घर या कामीं अर्पण केलें व वर दर्शविलेल्या नांवाची फळी त्या ठिकाणीं लावलेली आहे. या कामीं संचार करणारा व प्रत्यक्ष हातानी करविणारा व अशा कामीं सर्व प्रकारें निरंतर यश देणारा जगनियंता परमेश्वरच समर्थ आहे.

आपलें अज्ञान बालक जी. श्रीमंतातर्फे
म्यानेजर विष्णु प्रभुराम पेन्शनर
हायकोर्ट पिटिशनरायटर
ता० १६-५-१२ आकोला वऱ्हाड
नो. नं. ६

### वऱ्हाडांत खात्रीची उत्तम नवीन सोय.

## खरे गारेचे थंडचष्मे

आह्मी मुद्दाम वऱ्हाडच्या लोकांकरितां डोळे तपासून सर्व तऱ्हेच्या फ्रेमीसहित खरे गारेचे थंड चष्मे माफक दरानें विकण्याचें दुकान काढलें आहे. मुंबई वगैरे मोठ्या ठिकाणच्या भपक्यावर मंडळी कशी फसतात हें सर्वांना श्रुतच आहे सर्व गरजूनी अनुभव घेवून पहावा.

मोपाळ पांडुरंग आणि कंपनी
नो० नं० ७ आकोला

उन्हाळ्याकरितां

## लिमलेटच्या वड्या

१६ वड्यांचे बाटलीस ८ आणे पोष्टखर्च माफ. ६ बाटल्या घेणारास एक बाटली फुकट. खात्री करितां एकच मागवा.

वि. व्ही. रानवाडे बुधवार पेठ पुणें सिटी
नो० नं० ८

## LEUCODERMA.

10,000 Packets Free.

It has now been arranged to distribute about 10,000 sample packets of PANDIT KRIPARAM'S infallible cure for LEUCODERMA or WHITE LEPROSY to pr[ove] its efficacy and to show that the di[sea]se is not incurable as supposed. It nev[e]r fails. The sample packet will be enough to produce wonders in only one inch spot. write for it atonce per V. P. P. for As. 3 to meet the cost of its transmission, to

PANDIT KRIPARAM,
8, NANDIBAGAN LANE,
P. O. Salkea, Dist. Howrah.

P. S.—Pandit Kriparam's deeply interesting volume on Leprosy, its causation and treatment, etc., etc., can be had only at As. 8 per copy (V. P. P. charges As. 3). Every leper and sufferer from a tough kind of skin disease should read the volume—in both English and Bengalee. Please write the address legibly.

No. N. 9

### नोटीस

सर्वत्र शेटसावकार व इतर रहिवासी लोक यांसः—

चुन्नीलाल पितांबर पांडे दलाल राहणार नांदुरा तालुके मलकापूर जिल्हा बुलढाणा यांजकडून जाहिर नोटीस देण्यांत येते कीं, माझा भाऊ नामे नथु पितांबर पांडे दलाल रा. नांदुरा हा म्याड झाला असून त्यास ७।८ सात आठ महिनें झाले आहे. करितां या जाहिर नोटीसीनें कळविण्यांत येतें कीं त्यांजला कोणी रुपये कर्ज देऊं नये. त्यापासून जंगम माल स्थावर माल गहाण, खरेदी, बक्षीसपत्र वगैरे कोणत्याही तऱ्हेनें व्यवहार करूं नये. केल्यास रद्द समजलें जाईल. करितां जाहिर नोटीसीनें सर्वत्रास कळविलें आहे. कळावें तारीख २८।३।१३ इ.

सही
चुन्नीलाल पितांबर पांडे दलाल
रा. नांदुरा द. खु.
नो. नं. २२

## नोटीस

. रा. कन्हयालाल यादव आगरवाले
र वडनेर भोलजी तालुका मलकापूर
यांसः—

ळीं सही करणार यांजकडून नोटीस येते कीं आमचे तीर्थरूप तुमच्या ३२ वर्षावर चाकर होते; आणि चाकरींतच त्यांचा अंत झाला. ते गाण्यानिमित्त वडनेऱ्याहून वरखेडला तेव्हां माझ्या आईच्या व माझ्या ाचे दागिनें तुह्मापाशीं अमानत ठेविले. ागिने ह्मणजे.

| | |
|---|---|
| याचे कडे २ | वजन तोळे १० |
| याची ठुशी | तोळे ६ |
| याच्या मुद्या २ | तोळे ४ |
| पाटल्या २ | तोळे १२ |
| ाची सरी १ | तोळे २० |
| ाची कंठी १ | तोळे ६ |
| " गोफ १ | तोळे ७ |
| ' गोल २ | तोळे १५ |

दर ८० तोळे वजनाचे दागिने. वाय वडिलांच्या नांवाचे कर्जरोखे ४ हवाली केले. त्यांचा तपशील.

| णको | रोख्याची रक्कम |
|---|---|
| १) डुमगराव दवलतराव | |
| मीन सीताराम आत्माराम | ९० |
| २] नथु कान्हू तेली | १०० |
| ] " | १०० |
| ) सखाराम यादव तेली | ९० |
| एकूण | ४००० |

ी नोटीस पोचल्या तारखेपासून आठ ाचे आंत वरील दागिने व कर्जरोखे हवाली चार पंचासमक्ष परत करून पावती घ्यावी.

सिंच ता. १४।४।१२ रोजीं रामचंद्र जी देशमुख राहणार निंबे याची ह्मणजे वरखेड येथील स. नं. १९४ ल १० आणे ८ पै चा हिस्सा आ- वडिलांनीं ५००० रुपयांस खरिदी ा. या रुपया पैकीं फक्त ४६०० सदहू देशमुख यांस द्यावयाचें होते. ्या वडिलापाशी ३१०० रुपये होते. ंचे १५०० रुपये तुह्मी कर्जाऊ दिले. कर्जानिमित्त आमच्या वडिलांच्या संम- तुमचे ही नांव खरिदीखतांत दाखल यांत आलें आहे. पुढें तुह्माला वडि- ी १५०० रुपयांची प्रामिसरी नोट न दिली आणि तुह्मी खरेदी वरील ा हक्क उरला नाहीं हे दर्शविण्यासाठीं ळा कागद करून द्यावा असा विचार ा. पण वडील पुढें अधिकाधीक ारी होत गेल्यामुळे तुह्माकडून घेण्याचा द तसाच होणें राहिला आहे. च्या पीकापैकीं निम्मे पीक किंमत ी ३०० चे तुह्मी १५०० रुपयांच्या ासरी नोटींत वसूल ह्मणून घेतलें आहे. ही नोटीसं पोचल्यापासून १५ दिव- या आंत १४।४।१९१२ च्या खरेदींत ा कांहीं हक्क संबंध नाहीं अशा ीचा लेख लिहून नोंदून देण्याची करावी. आणि प्रामिसरी नोटीची ीची रक्कम घेउन तोही कागद रद्द न आमच्या स्वाधीन करावा. साहु-

कारांच्या इभ्रतीकडे व माझ्या वडिलांच्या चाकरीकडे पाहून आपण विनलोभानें सर्व गोष्टी सुरळींत व सुयंत्र करून द्याल असा पूर्ण भरंवसा आहे. आपण योग्य वेळीं माझ्या विनंतीला मान न दिला तर माझें बहुत नुकसान होईल आणि इतक्या वर्षाच्या लोभांत विपर्यास देऊन सरकारदरबार करावें लागेल आणि त्याची सर्व नुकसानी तुमच्या शीरावर राहील. कळावें ता. २९।३।१९१३ इ.

सही

मुकुलाल व्यंकटलाल अगरवाले
अज्ञानपालन करणार आई
राधाबाई जवजे व्यंकटलाल
राहणार वरखेड तालुका
मलकापूर निशाणी
हातची बांगडी असे

नो० नं० १०

---

## नोटीस

नोटीस बेशमी अमृता वलह रामजी काठोले कुणबी राहणार आकोट तालुके मजकुर यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटि- सीनें कळविण्यांत येते कीं तुह्मी तारीख २४-१२-१२ आकोलें येथील वतनदार छापखान्यांतून दिलेली नोटीस पावली त्या नोटिसींत लिहिलेला मजकूर अगदीं खोटा आहे तुह्मी मला चारपांच दिवस घराबाहेर थंडीमध्ये बसविलें व मारहाण करून माझे आंगावरील सर्व दागीनें तुह्मी काढून घेऊन तुह्मीच मला नरसिंग बोवाची जत्रा झाल्यानंतर तांदुळवाडी येथें माझे चुलत्याचें घरीं आणून घातलें. तेथून मी आठवें दिवसी आपले बापाचे घरीं टाकळी तालुके आकोट येथें गेलें मी तुमचे दिडशे १५० रुपये चोरून आणिलें नाहींत व दागीनेही आंगावर आणिले नाहींत माझ्या आंगावरील सर्व दागीनें तुह्मी काढून घेतले व मला चुलत्याचे घरीं पोचविले माझेकडे कांहीं एक गुन्हा नसून विनाकारण माझ्यावर रुपये चोरल्याचा व दागीन्यासह न विचारतां तुमचे येथून तांदुळवाडी येथें चुलत्याचे घरीं मी आ- ल्याचा खोटा आरोप ठेवून वाटेलतशी खोटी नोटीस दिली संबब तुह्मास कळवितें कीं मला तुह्मी नीट रितीनें मारठोक वगैरे न करितां वागविण्यास कबूल असल्यास व मारठोक केल्यास दरसाल रुपये २०० दोनशे अन्नवस्त्रा बद्दल मला द्यावें असा करारनामा करून देण्यास कबूल अस- ल्यास करारनामा करून देऊन मला घेऊन जावे कारण पहिल्या बायकोस तुह्मी असाच त्रास देऊन त्यामुळें ती अखेरीस मेली असें मला हल्लीं कळलें व माझे गंधर्वास पुरे १ वर्ष झाले नाहींतोच तुह्मी मला वाटेल तसा त्रास देउन व मारहाण करून चुलत्याचे घरीं पोंचविलें तेव्हा मीही आतां तुह्मी करारनामा वर लिहील्याप्रमाणें करून दिल्याशिवाय तुमचे येथें राहण्यास कबूल नाहीं तर ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसाचे आंत करार नामा करून द्यावा व मला घेऊन जावे तसे न केल्यास हीच नोटीस फारकत समजून मी दुसरा घरठाव करीन मग माझ्यावर तुमचा नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं कळावे तारीख २६-३-१३ इसवी

सही.

सखी मर्द रामजी काठोलें राहणार
आकोट हल्ली वस्ती टाकळी
नि खु. निशाणी दस्तुर
पांडुरंग व्याकाजी गावंडे

नो. नं. ११

---

## नोटीस

रा० रा० भाईजी गणेश कुलकर्णी रा० आसलगांव ता० जळगांव यांस—

राजाराम तोताराम अ० पा० आई गंगाबाई मर्द तोताराम पा० रा० आस- लगांव ता० जळगांव यान कडून —— नोटीस देण्यांत येते कीं, आह्मी तुह्मास ता० २-७-१९१२ ई॥ चे दिलेलं कुल- मुखत्यारपत्र रजिष्टर केलेलें आज पावेतों तुह्मी आमचे काम करीत आलां आतां बनत नसल्या कारणानें तुह्मास आह्मी कमी करून तुमचें मुखत्यारपत्र आह्मी रद्द केलें आहे करितां आमचें कोणतेंही काम तुह्मी आतां करूं नये. करितां कळविलें आहे. कळावे ता० २३-१-१९१३ ई॥

दस्तुर बंकटप्रसाद रामप्रसाद तिव्हारी

सही

राजाराम वा॥ तोताराम अ० पा०
आई गंगाबाई मर्द तोताराम
नि० खु० हातची बांगडी
द० गणपत गंगाराम

नो० नं० १२

---

## नोटीस

नोटीस बेशमी बाळकृष्ण सोनाजी वडनेरकर रा० पचगव्हाण ता० आकोट जि० आकोला यास

नोटीस देणार भागेर्थीबाई जवजे अमृतराव देशमूख रा० पंचगव्हाण ता० आकोट जि० आकोला नोटीस देते कीं तुह्मी इतके दिवस माझे कुलमुखत्यार होता. आतां तीन महिने झाले तुह्मी माझे घरीं येत नाहीं व काम करीत नाहीं करितां तुमची नोकरी आज पासून बंद केली आहे तुमचे जवळ जी आमची कागदपत्रें आहेत ते आह्मास आज पासून १५ दिवसांत आमचे स्वाधीन करावे व आमची पावती घ्यावी व तुमचा आमचे कडे जो पगार संगळला असेल तोही आह्मास मा- गून घ्यावा असें न केल्यास रीती प्रमाणें केलें जाईल. ही नोटीस दिली. कळावे ता० २६-३-१३ ई० द०

व्यंकटराव लक्ष्मणराव देशमूख हिव- रखेड कर

सही

भागेर्थी जवजे अमृतराव द० खु०

नो० नं० १३

---

## नोटीस

नोटीस बेशमी जीतमल कन्हयाल मारवाडी मालक रामनारायण जीतमल मारवाडी रा० पातुर्डा ता० जळगांव जिल्हा बुलडाणा यांसः—

खालीं सही करणार याज कडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्माला आह्मीं गहाणखत ४००० अक्षरीं चार हजार रुपयाचे लिहून देऊन सब रजिष्टरसाहेब जामगांव यांचे कचेरींत त्याच दिवशीं नोंदून दिले वरील रुपयाच्या भरण्या पैकीं तुह्मी मजला लक्ष्मीनारायण उत्तमचंद यांचे गहाणा बद्दल १२७० व मुलतानचंद मनसुखदास यांचे कर्जरोख्या बद्दल ३७० एकूण रुपये १६४० तुह्मी दिले व बाकीचे रुपये २३६० संवत १९६९ चे मार्गशीर्ष शु॥ ९ रोजीं देण्याचे ठरले होतें तर ते रुपये तुह्माला दोनचार वेळां मागितले असतां आज देतो उद्या देतो असे करितां करितां तुह्मी अजमासे तीन महिने लोटले तरी आज पावेतों दिले नाहीं रुपयाचा भरणा पुरा नझाल्या मुळें तुह्मी गहाणखत हक्क नोंदणाचे रजिस्टरांत दाखल केलें नाहीं व आतां मजला असें समजलें आहे कीं तुह्मी २३६० रुपयाचा खोटा जमाखर्च वही मध्यें केला आहे व तुह्मी विद्यमान तहसीलदार साहेब तालुका जळगांव यांचा मुक्काम पातुर्ड्यास तारीख १८-२-१९१३ रोजीं होता तर तुह्मी ते पोकळ गहाणखत त्यान समोर नेऊन दाखल केले त्यांच्या सांगण्या वरून पटवारी यानीं तकरारीचे रजिष्टरांत नोंद केली तुह्मी जर मजला पुरा भरणा दिला असतां तर हक्क नोंदणीचे वेळींच गहाण- खत नोंदलें असते एकूण आतां तुमचे मनांत बेइमानकी येऊन पोकळ गहाणखत तुह्मी नोंद केलें असें करणें तुमच्या सारख्या सावकाराला चांगले नाहीं. हल्लीं मजला हक्क नोंदणीचा उतारा मिळाला आहे त्या मध्यें सुद्धां नोंद नाहीं तरीच या नोटिसीनें तुह्माला कळवितों कीं हीं नोटीस पावल्या पासून १५ दिवसाचे आंत मजला २३६० रुपये व्याजा सुद्धा द्यावे व मजी रुपये पावल्या बद्दलची पावती घ्यावी. अगर आह्मी तुह्माला १६६० रुपये व्याजा सुद्धां घेऊन माझे गहाणखत मला वापस द्यावे असें वरील मुदतींत न केल्यास आह्मी तुमच्यावर दिवाणींत दावा करून खोटा जमाखर्च केल्या बद्दल व पोकळ गहाणखत नोंद केल्या बद्दल तुमचेवर कायद्याचे रिती प्रमाणें काम चालविले जाईल मग या नोटिसीचा खर्च कोर्ट खर्च तुमचे जवळून घेतला जाईल. दोघांहि खर्चांत पडूं नये ह्मणून या नोटिसीनें सुचविले आहे. ही नोटीस दिली. कळावे ता० २०-३-१३ ईसवी

सही

राधाकिसन बालमुकुंद आगरवाले
द० खु० तर्फे वकील
विनायकराव लक्ष्मणराव ओक
बी० ए० एल० एल० बी
वकील

नो० नं० १४

---

र नाहीं. ही
१९-३-१३ ई०
ऱ्णार अन्वी
ची बांगडी
ा. जामडी
जगनाथ
र्तिजा-
१ कीं
हाडस-
पावली
खोटा
ाहिने
करी
ावर
तुह्मी
ऊन
कर-
र
मी
रत
ही
तुह्मी
र द्यावें
दस्ताऐ-

## नोटीस

नोटीस शामराव चाहादूजी हेडमास्तर ० पास्टूल ता० बाळापूर पो० पातूर

यांस—

खा:लीं निशानी करणारा कडून नोटीस देण्यांत कीं आह्मी जी .नोटीस वऱ्हाडसमाचारामधून ली त्याचें उत्तर आपण दिलें ता० २४-३-१३ चें तें अगदीं बनावट अ.हे. सुरजमल वाडी यच्या व माझ्या तंट्याचा मी : निकाल करितों असें ह्मणून आपण कागदावर माझा आंगठा घेतला. त्या कागदावरच पुढें तुह्मी मला न वितां माझें नावची प्रामेसरी नोट लिहिली. तें मला माहीत नाहीं. आपण पावती बद्दल लिहितां तेंही मला त नाहीं. आपण खेरदीचे रुपये दिले खिटें असून मी मारवाड्याचा निकाल ांच करितो. तुह्मी फक्त माझे नांवे ी द्या. (निकाला पुरती) तुमच्या ण्यावर मी फसलो. आणि रुपये मला नगदी दिले नाहींत. ज्या आपण घराचा ताबा घेण्यास आले त्या वेळेस रुपये वरून अणून असे चार चैाघा समक्ष आपण केले होते. आमचे गांवांत पायऱ्या वा॥ चिनक्या महार याज जवळूही तुह्मी खोटी प्रामेसरी नोट लिहून घेतली आहे. तरी नोटीस पावल्या पासून १५ दिवसाचे आंत मला खेरदी परत करून व प्रामेसरी रद्द करून माझा निकाल करावा. असें न केल्यास मला कोर्टाची दाद मागावी लागेल. तुह्मी कोणतेही भानगड केल्यास तुमचे खर्चा बद्दल मी मुळींच जबाबदार नाहीं. फिर्यादीचा प्रसंग आल्यास तुमचे खोटेपणा बद्दल पुष्कळ पुरावे देतां येतील हो नोटीस दिली. कळावे ता० २८-३-१३ इसवी

सही

निशानी आंगठा नारायण सयाजी आंद रा० कोसेगांव पो० पातूर

नो० नं० १५

## जाहिर नोटीस

सर्वत्र शेटसावकार व इतर सर्व लोकांस या जाहीर नोटीसीनें कळविण्यांत येतें कीं. माझा मुलगा उकर्डा वल्लद सदू तेली राहणार नांदुरा बु॥ ता० मलकापूर हा तीन वर्षापासून वेगळा राहात आहे व अलीकडे तो गैरचालीचा व्यसनी झाला आहे. करितां त्यास कोणी कर्ज वगैरे देऊन माझी स्थावर जंगम कोणतीही इस्टेट गहाण खेरदी वगैरे करून घेऊं नये घेतल्यास त्या रकमेचा मी जबाबदार नाहीं. माझ्या कोणत्याही स्थावर जंगम जिनगीवर त्याचा हक्क नाहीं सबब कोणी गावांतील परगांवातील लोकांनीं त्यास कर्ज देऊं नये कळावें तारीख २६-३-१३ इ.

सही

सदू वल्लद बनाजी तेळी राहणार नांदुरा बु। नि० खु० द० किसनसा नारायणसा राहणार नांदुरा बु॥

नो० नं० १६

## नोटीस

नोटीस बेशमी गणेशदास जेटमल मारवाडी दुकान आडगूल ता० आकोट.

यांस:—

खालीं सही करणाराकडून नोटीस देण्यांत येतें. बन्नू वा॥ कमाल मु॥ वानखेडे यांचा हवाला ता० ११ माहे सप्टेंबर सन १९११ इ० रोजीं रुपये ४५० साडेचारशेचा आपण घेतला. ते रुपये आजपावेतों दिले नाहींत करितां आतां नोटीस देण्यांत येते कीं एन रुपये साडेचारशे व व्याज १८ महिन्याचे ८१ रुपये (रुपया शेंकडा प्रमाणें) एकूण रुपये ५३१ पांचशे एकतीस हे रुपये नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचें आंत माझेकडे देऊन पावती घ्यावी. असे न केल्यास वरील मुदती नंतर कोर्टमार्फत फिर्याद करून कोर्ट खर्च व नोटीस खर्चासुद्धां रक्कम भरून घेतली जईल ही नोटीस दिली ता० २७ मार्च १९१३ इ.

सही

नंदलाल पन्नालाल दु० हातरूण पो० आकोला.

नो० नं० १७

## नोटीस

नोटीस बेशमी देवजी भीवसन उदेभान नारायण, विठू जानजी, आणि विठू वा॥ मारोती माळी वरोकार अ. पा. क. आई पुंजई इच्या इस्टेटीसी हीतसंबंध असणारें लोक राहणार पळशी बु। खामगाव या सर्वांस खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे कारेगांव खुर्द ता०. खाम ांव येथील शेत स० नं० ८६ मधील विठू वरोकार याने आपला हिस्सा विक्रीस काढला त्यावेळीं त्यानें व मी तुह्मा सर्वांस (घेण्याविषई) विचारणा केली असतां तुह्मी सर्वांना तो हीस्सा विकत घेण्याचे नाकारले वरून मी तो हिस्सा ता० २५।३।१३ रोजीं खरेदी घेतला व खरेदीखत त्याच दिवशी नोंदलें खरेदीखत नोंदून परत आल्यावर तुमचे पैकीं कोणी अग्रक्रीयेचा दावा करणार असे कळले वरून विनंती कीं जर कोणास तो हीस्सा विकत घेण्याची इच्छा असेल त्याने नोटीस प्रसीद्ध झाली त्या तारखेपासून १५ पंधरा दिवसाचे आंत खेरदीखतांत लीहीलेली रक्कम खरेदीखतास व ह्या नोटीशीस लागलेल्या खर्चाची रक्कम मला देऊन मजपासून तो हीस्सा विकत घ्यावी मी देण्यास तयार आहे परंतु १५ पंधरा दिवसानंतर १६ सोळावे दिवशीं तो हीस्सा विकत घेण्यास कोणी आल्यास मी तो हीस्सा विकत देणार नाहीं व आग्रक्रीयेच्या दाव्याचा जबाबदार राहणार नाहीं नोटीस दिली ता० २७।३।१३ इ.

द. दामोदर लक्ष्मण कारगांवकर

सही

फकीरा वा॥ चाहादु न्हावी राहणार पळशी नि. खु. द.

नो० नं० १८

## नोटीस

नोटीस बेशर्मी पंढरी वा॥ निंबाजी ध्यार राहणार नांदखेड ता० अकोट जिल्हा आकोला यांस खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझे गंधर्वाचे नवरे असून अजमास ११ वर्षें झाले गंधर्व झालें आहे गंधर्व झाल्यावर तुमचे घरीं मी ३ वर्षें नांदले पुढें तुह्मास गर्मीचा उपद्रव झाल्यामुळें त्या योगानें तुह्मी पुरुषत्वातून गेले व संसाराचे उपयोगीं राहिले नाहीं. तरीही मी तशीच तुमचे येथें राहिली नंतर तुमच्यांत पुरुषत्वाचे ढंग नसल्यामुळें तुह्मी तुमचा वडील बंधू गणाजी यासही स्त्री नसल्यामुळें सदरहु माझे जेठानीं माझेवर वाइट नजर ठेविली त्या बद्दल तुह्मास मी सांगितले असतां त्यास बोलण्याचें टाकून देऊन उलट तो सांगेल ऐकण्या विषयीं मजला सांगितलें तें मी नाकबूल केल्यामुळें तुह्मी उभयतांनीं मजला मारहाण करून घरांतून काढून दिले त्यावेळीं मी माझे आईचे घरीं ह्मणजे अन्वी ता० आकोला येथें येऊन राहिले त्यास सरासरी ८ वर्षें होत आले आहे तरीही तुह्मी माझी नेआण केली नाहीं या वरून तुह्मी तसेच आहा असे मजला वाटते अगर तुह्मी दुसरी बायको ही केली नाहीं आज पर्यंत मी तुमचे नांव धरून राहिले होते परंतु माझे पोटा पाण्याची अगर चोळी लुगड्याची मुळींच तुह्मी खबरदारी आजपर्यंत ठेविली नाहीं आह्मास कोणी पोशिंदा मनुष्य नसल्यामुळें माझ्या आईला मजकरितां दुसऱ्याचे कर्ज काढणें भाग पडले व ते कर्ज येथील माळी कडताजी याज पासून काढले आहे व त्याचे आज पर्यंत रुपये माझे खर्चाचे दरसाल ३६ रुपये प्रमाणें ८ वर्षाची रक्कम त्यांची मजला देणें २८८ रुपये व शिवाय व्याज दरमहा दर शेकडां २ रुपये प्रमाणें दामदुपटी प्रमाणें ५७६ रुपये मजकडेस त्यांचे देणें निघाले त्या देण्याची त्यांनीं मजला निकड लावल्या मुळें व तुमचे कडून मजला कांहींच पोटा पाण्यास आज पर्यंत न मिळाल्या मुळें मजला सदरहु इसमाचें कर्ज करणें भाग पडले त्या कर्जाचे फेडी करितां मजला माझा जीव धर्माची परवा न बाळगतां दुसऱ्याचें घर निघणें भाग पडेल व याज करितां मी दुसऱ्याचें घर निघण्याचा माझा मानस आहे. तर सदरहु नोटिशीनें कळविण्यांत येते कीं मग तुमचा नवरे पणाचा हक्क मजवर राहणार नाहीं व ज्यांनीं आज पर्यंत खादगी खाल्ल्याचे रुपये सदरहु माळयास दिले आहेत व त्याची पावती ही त्या इसमानीं घेतली आहे त्या इसमास ही नोटीस पावल्या सून ८ दिवसाचे आंत वर लिहिलेली रक्कम द्यावी असें होणार नाहीं व नोटिसीचा जबाबही तुमचे कडून मिळणार नाहीं तर हीच फारकत समजून मी दुसऱ्याशीं गंधर्व लावीन मग तुमचा नवरे पणाचा हक्क बिलकूल राहिला नाहीं व तुह्मी फिर्याद कराल ती रद्द समजली जाईल व याज बद्दलची कोणत्याही प्रकारची जबाबदारी मजवर नाहीं. ही नोटीस दिली. कळावे ता० १५-३-१३ ई०

सही

कवशी मर्द पंढरी राहणार अन्वी निशानी खुद्द हातची बांगडी

नो० नं० १९

## नोटीस

रा. रा. जैराम गणू कुणबी रा. जामठी बु॥ ता० मोर्तीजापूर

यास:—

खालीं सही करणार खेतसीदास जगनाथ मारवाडी रा० जामठी बु॥ ता० मोर्तिजापूर याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी ता० १६।३।१२ रोजीं वऱ्हाडसमाचार पत्रातून नोटीस दिली ती पावली तीत तुह्मी लिहीलेला मजकूर सर्व खोटा आहे. सुर्यभान यानें फक्त ३॥ महिने नोकरी केली आहे ८॥ महिने नोकरी त्याकडून घेणें आहे व तो इसम बरोबर नोकरी इमानानें करीत नाहीं तरी तुह्मी नोटिशीत लिहीले प्रमाणें स्वतः येऊन माझी ८॥ महिनें राहीलेली नोकरी करण्यास येत असल्यास तुह्मी कामावर हाजर होऊन साळ पुरे करून द्यावें व मी तुह्मास दोनतीन वेळां बोलावले तर येत नीवळ थापबाजीच्या गोष्टी करीतां तरी ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांत तुह्मी माझे नोकरीवर येऊन साळपुरे करून द्यावें याप्रमाणें न केल्यास रीतीप्रमाणें दस्तऐवजाचे शर्ती प्रमाणे रुपये फीर्याद करून वसूल करून घेऊं नंतर फीर्यादीचा खर्च नोटीसीचा सर्व खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावें ता० १४।३।१९१३ इ.

सही

खेतसीदास जगन्नाथ द० खु०

नो. नं २०

## जहिर नोटीस

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार हरी वा॥ बाबूजी राहणार लाखपुरी तालुके मुर्तीजापूर जिल्हा आकोला याजकडून कळविण्यांत येते कीं, मौजे लाखपुरी येथील शेत सर्व नंबर ३६ एकर ३३ गुंठे २० आकार रुपये ६३ याचे खाते माझे नावानीं असून हानंबर माझे वडीलोपार्जीत मालकीचा आहे असें असतां माझा अज्ञान पुतण्या नामे बळीराम वल्लद नारायण तेली हा या शेतासंबंधानें भानगडी उपस्थित करण्याचें विचारांत आहे तरी त्याजपासून कोणीही हा नंबर अथवा यांतील कोणतीही हिस्सा खरेदी, गहाण अथवा पट्ट्यानें घेऊं नये. घेतल्यास घेणाराचे विनाकारण नुकसान होईल. आणि अशा तऱ्हेनें केलेल्या व्यवहाराची सर्व जबाबदारी घेणारावरच राहील कळावें तारीख ता. २-४-१३ इ.

सही

हरी वा॥ बाबुजी तेली नी. खु.

नो. नं. २१

## पत्राच्या वर्गणीदारास एक सवलत.

### प्रतिभा.

नांवाची कादंबरी श्रीयुत बाबू द्रदास एम० ए० बी० एल० यांची त्यांत अत्यंत श्रेष्ठ पद पावलेल्या ' नामक कादंबरीचा आनुवाद वडें सांगितले असतां ही कादंबरी नोहर आहे हें निराळें सांगण्याची आवश्यकता नाहीं. प्रस्तुत कादंबरी पत्राचे एप्रील अखेर वर्गणीदार निम्या (८१०) किंमतींत दे- योजिले आहे. प्रती बेताच्याच च्या असल्यामुळें या सवलतीचा घेऊं इच्छिणारांनीं खालील पत्यावर ादविण्याची त्वरा करावी. इतरांस अखेरपर्यंत नांवें नोंदविल्यास ट० ह १८४ सवा रुपया.

ती हें पत्र दर सोमवारीं प्रसिद्ध असून यात निडवक लेख, वर्तमान- मनोरंजक आणि आश्चर्य कारक येत असून चालू सालच्या जानेवारी पासून 'अंजनासुंदरी' नांवाची वटकदार कादंबरी चालू आहे. वार्षिक ट० हा० सह २ रु० तरी पंथ दो काज ' या म्हणी प्रमाणें त्रास वर्गणीदार होऊन वरील सवल- फायदा घेण्याची वाचकांनीं करा

म्यानेजर-सुमति वर्धा. (सी. पी.)

नो. नं. २७



वऱ्हाडसमाचार

चैत्र शुद्ध १ शके १८३५ प्रमादी


## इष्ट सुधारणा.

अनेक कारणांनीं सामाजिक सुधारणा हा सामान्य जनसमूहाला अप्रिय झालेला हे. तथापि सामाजिक सुधारणेचा एक ार तरी त्याला— विशेषतः त्याच्यांतल्या विक विचारी स्त्री पुरुषांना— खात्रीनें मान्य ण्या सारखा आहे. ही सामाजिक सुधारणेची च म्हणजे कांहीं विशिष्ट ब्राह्मण जातींत पसांत बेटी व्यवहार होऊं लागण्याची ता हा होय. आपल्या महाराष्ट्रीय ब्राह्मण ांचे ठळक असे दोन वर्ग आहेत एक द्राविड व दुसरा पंच गौड. पैकीं हिल्या वर्गांत कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे येतात व दुसऱ्यांत मुख्यत. शेणवी अथवा रस्वत ब्राह्मण यांचा समावेश होतो. पंच विडांतल्या पोट वर्गांत म्हणजे देशस्थ, कोंक- स्थ (चितपावन) व कऱ्हाडे यांच्यांत पापसांत रोटी व्यवहार आज दोन तिनशे तरी निदान चालू आहे. बेटी व्यवहारालाही ाचाची आडकाठी नाहीं. रूढिचाच काय तिबंध इतके दिवस होता, पण आलि ी बाजूला ठेवून कित्येकांनीं ही मलांत आणिली आहे व समाजानें तिकडे दुर्लक्ष करून अप्रत्यक्षतया आपली त्याला संमती दिली आहे. या उपर जर ही सुधारणा प्रचारांत न आली तर त्याचा दोष शास्त्राकडे किंवा समाजाकडे मुळींच नसून आमच्या सुशिक्षित वर्गाच्या अंगच्या भित्रेपणाकडे येईल. पण या हून ही जास्त सोपी व राष्ट्रैक्यच्या दृष्टीनें अत्यंत इष्ट अशी एक सुधारणा मुंबईच्या सामाजिक परिषदेचे सेक्रेटरी रा० भाजेकर यांनीं सुचविली आहे. व तिच्या संबंधांत काढलेल्या विनंती पत्रकांवर ना० श्री० अण्णासाहेब कुरुंदवाडकर ना० रा० ब० काशिनाथपंत गोडबोले, श्री० जमखिंडीकर श्री० बाबासाहेब इचल करंजीकर, ना० रोद ना० मि० बेळवी, पेनशनर कलेक्टर पानसे वगैरे बड्या बड्या मंडळीच्या संमति दर्शक सह्या आहेत. इतक्या बड्या मंडळीला जी गोष्ट संमत वाटली ती निदान समाजानें विचारार्ह तरी समजून तिची चर्चा करणें अवश्य आहे असें आम्हास वाटतें. रा० भाजेकर हे थोड्या दिवसां पूर्वी दक्षिण हिंदुस्थानांत फिरत असतां त्यांना तंजावर, मदुरा, तिनेवल्ली वगैरे ठिकाणीं अनेक महाराष्ट्रिय गृहस्थ भेटले. हे तिकडे स्थायिक झाले आहेत तरी मुळचे ते महाराष्ट्रीय होते या गोष्टीला त्यांची घरांत बोलण्याची मराठी भाषा, व रीत रिवाज, वगैरे अनेक प्रमाणे आहेत. श्री शिवाजी महाराजांचे बंधू व्यंकोजी राजे कर्नाटकची जहागिरी संभाळून होते, त्यांच्या आश्रितांचेच हे वंशज, अर्थात यांचे पूर्वज मूळ इकडून गेलेले होते. हे बहुतेक देशस्थ असून यांची संख्या सुमारें दहा हजार आहे. हे इकडल्या देशस्थांसारखे वनस्पत्याहारी असल्यामुळें इकडच्या पंचद्राविड ब्राह्मणांनीं त्यांच्याशीं बेटीव्यवहार करण्यास शास्त्राचा प्रतिबंध बिलकुल दिसत नाहीं. त्यांना जरी आपल्यासारखी शुद्ध मराठी भाषा बोलतां येत नाहीं, तरी ही इष्ट सुधारणा घडून येण्याच्या कामीं भाषेची अशुद्धता हें सबळ कारण आहे असें कोणी हो विचारी माणूस कधीं म्हणणार नाहीं. तुमचा व त्यांचा इतकी शतकें संबंध तुटला म्हणून त्यांच्या भाषेंत तामिळ शब्दांचें मिश्रण झालें हा संबंध पुनः जडल्यावर भाषेची ही शुद्धि होईल. ते निरामिषाहारी असल्यामुळें खाण्यापिण्याच्या संबंधांतली भिन्नता ही सबब सांगतां येणार नाहीं. त्यांच्याशीं बेटीव्यवहार करण्याला कोणतें ही रास्त कारण दिसत नाहीं. उलट हा बेटीव्यवहार सुरू झाला, तर महाराष्ट्राचा मोठाच फायदा होणार आहे. राष्ट्रांत ऐक्य उत्पन्न करण्याचे जे प्रयत्न निरनिराळ्या दिशांनीं सुरू आहेत त्याला या सुधारणेचें बरेंच साह्य होईल. यामुळें महाराष्ट्रदेशाची मर्यादा बरीच विस्तृत होईल. महाराष्ट्र भाषेचा प्रसार होण्यास आधिक वाव मिळेल. महाराष्ट्रीय ब्राह्मण समाज जो फारच संकुचित आहे त्याचा व्याप वाढेल, आणि त्या समाजाच्या अंगीं अधिक कार्यक्षमता येईल. या गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे या सुधारणेची इष्टता कोणाला ही दिसून येणार आहे. करितां या प्रश्नाची आमच्या समाजाकडून योग्य प्रकारें चर्चा व्हावी अशी जी इच्छा विनंतिपत्राच्या द्वारें उपरिनिर्दिष्ट बड्या मंडळीनें प्रदर्शित केली आहे तिला मान देऊन आमचा महाराष्ट्रीय ब्राह्मण समाज हा प्रश्न लवकरच निकालाला लावील अशी आम्ही आशा करतों.

## मरणोन्मुख प्राच्य राष्ट्रें.

आड्रियानोपल तुर्कांच्या शत्रूंच्या हातांत शेवटीं गेलें. तहाच्या वाटाघाटीनंतर कित्येक दिवसपर्यंत तुर्कांनीं जो आवेशदाखविला त्यावरून तुर्की राष्ट्राचें नष्टचर्य संपून त्याच्या अभ्युदयाविषयीं उत्पन्न झालेला आशांकुर गेल्या आठवड्यांतल्या बातमीनें जागचे जागींच करपून गेला. तुर्कस्थानचा सुल्तान एकंदर मुसलमानांचा खलीफा म्हणजे धर्मनायक असल्यामुळें त्याचा झालेला हा अधःपात ऐकून कोट्यावधि मुसलमांनांना पराकाष्टेचें दुःख होणें साहजिक आहे. आमच्या मुसलमान बंधूंवर आडेला हा दैवाचा घाला पाहून त्यांच्याविषयीं आमच्या मनांत सहानुभूति जागृत होते. आणि हें संकट त्यांच्याच एकट्यावर नसून एकंदर प्राच्य राष्ट्रें ध्वंसोन्मुख व्हावी अशी परमेश्वराची योजना दिसतेशी पाहून मन दुःखानें व्याकुळ होतें. विचार दृष्टीनें पाहणारांस प्राच्य राष्ट्रांची ध्वंसोन्मुखता स्पष्ट दिसणारी आहे. तुर्कीराष्ट्र आतां बहुतेक नामशेषच होणार, निदान तुर्त तरी गतप्रभ झाले आहे. इराणांतली धामधूम ही त्याच्या मरणोन्मुखतेची साक्ष देत आहे. अफगाणिस्थान अद्याप जीव धरून आहे तरी ते राज्य सागरांतल्या एखाद-दुसऱ्या जल बिंदूप्रमाणें क्षुद्र असल्यामुळें तें हिशोबांत धरतां येत नाहीं. हिंदुस्थान तर बोलून चालून पराधीन झालेलें आहे. राहतां राहिलें चीनचें राष्ट्र त्याला ही अखेरची घरघर लागली आहे कीं काय अशी भीती क्षणोक्षणी वाटत आहे. त्याला पुष्टिकारक अन्नाच्या अभावी क्षयाची भावना आज कित्येक दिवसांपासून झालेली स्पष्ट दिसत आहे. युरोपियन राष्ट्रें कर्ज देण्याच्या मिषानें त्याच्या इतिश्री करण्याच्या उद्योगाला प्रारंभ करीत आहेत असें खुद्द युरोपियन पत्रें म्हणत आहेत. पण कर्ज न घ्यावें तर आजचें मरण निश्चित आहे. म्हणून चीन जाणून बुजून विषाची गोळी औषध समजून गिळण्यास तयार झाला आहे. राशियानें इराणांत ज्या रीतीनें हातपाय पसरले तीच रीत चीनसंबंधानें युरोपियन राष्ट्रांनीं उचलली आहे. ही सगळीं कशाची चिन्हें आहेत? त्रैलोक्यचिंतामणीची मात्रा मरणोन्मुख रोग्यास दिल्यावर कांहीं वेळ त्याच्या अंगांत मोठा आवेश संचरत असतो. चीनमधली प्रजासत्ताक राज्याची स्थापना, इराणांत थोड्या वर्षापूर्वी झालेली राज्यक्रांति आणि तुर्कस्थानांत तरुण पक्षाचा नुकताच झालेला जयजयकार या गोष्टी त्रैलोक्य चिंतामणी मात्रेनें संचारविलेला आवेश आहे कीं खरोखरीच उदयोन्मुखतेची लक्षणें आहेत. हें कालक्रमानेंच दिसून येणार आहे, आणि रहस्यमय कालोदरांत काय सांठवन ठेविलेलें आहे कोणास ठाऊक!

## प्रगती कीं परागति?

न्याय व अंमल बजावणी हीं खातीं वेगळीं काढण्याची अवश्यकता किती आहे या संबंधानें सध्याचें पब्लिक सर्विस कमिशन शिष्ट लोकांचे अभिप्राय विचारीत आहे, आणि वरिष्ट कायदे कौन्सिलांत ही या बद्दलचा प्रश्न निघाला तेव्हां सरकारनें या प्रश्नांत गर्भित असलेल्या तत्वा संबंधानें स्वतच्या मताची अनिश्चितता उघडपणें बोलून व्यक्त केली. पण मुंबईचे क्रॅानिकल पत्र म्हणतें कीं या प्रश्नांतलें तत्व सरकारनें पांच सहा वर्षां पूर्वींच कबूल केलें असून तें तत्वकृतींत कोणत्या रितीनें उतरावयाचें या बद्दलच काय तो विचार व्हावयाचा राहिला होता. असें असतां पुनः सरकार तत्वाच्या मुद्यावर अनिश्चितता दाखवूं लागलें आहे याचा अर्थ काय? गेल्या पांच सहा वर्षांत सरकारच्या विचाराची ही प्रगति समजावयाची कीं परागति?

## जंगल खात्याचें काम.

मध्यप्रांत आणि वऱ्हाड यांतील जंगल खात्याच्या कामाची पद्धत प्रशंसनीय म्हणून गणली जात आहे आणि या बद्दलचें श्रेय चीफ कॅान्सर्वेटर मि० हार्ट व त्यांचे साह्य कारी कामदार यांना दिलें पाहिजे. १९-११-१२ सालच्या जंगल खात्याच्या रिपोर्टांत आमच्या या म्हणण्याच्या पुष्टिकरणार्थ हवा तेवढा पुरावा आहे. जगलांच्या रक्षणा पासून देशाला सुपिकता, पर्जन्य व हवामान यांच्या बाबतींत अनेक रितीनें फायदा होत असतो ही गोष्ट शिक्षणप्रसारा बरोबर लोकांना कळुं लागली आहे. ही समाधानाची गोष्ट आहे. आतां या जगांत अमिश्र अशी कोणतीच गोष्ट नाहीं त्या प्रमाणें जंगल खात्याच्या संरक्षणा बरोबर गुरांच्या चारण्याचे निर्बंध लांकुडफाट्याची महागाई वगैरे कित्येक गैर सोयी येतात ही गोष्ट खरी; पण शहाणे व लोकांचा गैर सोय जाणणारे अधिकारी हें अनिष्ट टाळण्याचे दुसरे उपाय तत्काळ शोधून काढतात. जंगल खात्याच्या कडक नियमां मुळें गुरांचे हाल होतात हें पाहून कापलेल्या गवताचे दर बजेठे गठ्ठे पाठविण्याची सोय करण्यात आली आहे. ही पद्धत वऱ्हाड सारख्या प्रांताला अधिक फायदे कर होण्याचा संभव आहे. गेल्या सालीं जंगल खात्याचें उत्पन्न ३१ लक्ष रुपयांनीं वाढलें. या वर मे० चीफ कमिशनर साहेब यांनीं आपल्या ठरावांत असा शेरा मारला आहे कीं जंगल खात्याच्या कामाची महती व्यापारी पद्धतीनें म्हणजे उत्पन्नाच्या वाढीवरून ठरविणें हें योग्य नाहीं. जंगल खात्याचे अधिकारी ना० सर बेंजामिन रॅावर्टसन साहेबांचा हा शेरा नेहमी डोळ्यापुढें ठेवून जंगलखात्याच्या सुधारणे बरोबरच लोकांच्या सोयीकडे ही अधिक लक्ष देतील तर त्यांचें खातें हें एक अत्यंत उपयुक्त खातें आहे अशी लोकांची खात्री होईल. मे० चीफकमिशनर साहेबांनीं चालू सालीं गुरांच्या चराईसाठीं अधिक रकम मंजूर केली आहे या त्यांचा उदारपणा-

बद्दल मुकी बनावें व त्यांच्याच सारखे त्यांचे अशिक्षित अतएव मुके असे त्यांचे मालक नामदार साहेबांस दुवा देतील यांत संशय नाहीं.

---

### हिंदुमुसलमानांचें ऐक्य

आपलें राजकीय उद्दिष्ट काय असावें ? निर्भेळ स्वराज्य कीं वसाहतीचें स्वराज्य ? ...संबंधांत कांग्रेसच्या पुढारी मंडळींत लागले तंटे पुढें कसे विकोपास गेले व त्यापायीं देशाची केवढी हानी झाली तें तून ऑलइंडिया मास्लिम लीगनें (सगळ्या हिंदुस्थानांतल्या मुसलमानांचें ऐक्य करणारी सभेनें) शहाणें व्हावयास पाहिजे होतें व हा प्रश्न केवळ तात्विक दृष्ट्या किती ही महत्वाचा असला तरी त्या संबंधाची चर्चा उपस्थित करून व्यर्थ कालक्षेप व शक्तीचा अपव्यय करण्याचें टाळावयास पाहिजे होतें. आज आपल्यापुढें कार्य क्षेत्र येवढें विस्तीर्ण आहे कीं लीगमधल्या कित्येक पुढाऱ्यांनीं आपलें सारें आयुष्य त्यांतल्या एका भागा कडे खर्च केलें तरी तें पुरें होणार नाहीं. पण तिकडे दुर्लक्ष करून स्वराज्या सारख्या मोहक मृगजळा कडे धावण्यांत काय अर्थ आहे? आज आपल्या पुढें हिंदु व मुसलमानांचें ऐक्य व लोक शिक्षण यांच्या सारखे दोन मोठाले प्रश्न आहेत व हे दोन्ही सांप्रत काळीं अत्यंत जरूरीचे आहेत. गेल्या पांच चार वर्षांत लीगच्या पुढाऱ्यांनीं या दोन्ही बाबतींत आपलें कर्तव्य शक्य तेवढ्या प्रमाणानें बजाविलें आहे काय? तुर्को बाल्कन युद्धाचे संबंधांत ब्रिटिश सरकारनें कसें धोरण ठेवावें त्याचा धडा ब्रिटिश प्रधान मंडळाला देण्या पेक्षां व स्वराज्या सारख्या विषयाची निष्फळचर्चा करण्या पेक्षा या दोन विषया संबंधानें लोकांत जागृती करण्याचें वृत या संस्थेनें स्विकारलें असतें तर त्यांचे प्रयत्न अधिक फलद्रूप झाले असते असें आह्मांस वाटतें. या दोन प्रश्नां पैकीं पहिला प्रश्न हा हिंदुस्थानच्या राष्ट्राचें मुख्य उद्दिष्ट असून लोक शिक्षण हें त्याचें साधन आहे. हें उद्दिष्ट साधण्याचे प्रयत्न आज पर्यंत जोरानें असे कधींच झाले नाहींत. हिंदु व मुसलमान यांचे पुढाऱ्यांना एकत्र जमवून एक जुटीनें देशकार्य करण्या विषयींचा ठराव चार वर्षं पूर्वीं कांग्रेसनें करून ठेविला, पण तो अखेर कागदा वरच राहिला. लीग सारख्या संस्थेनें तो हातीं घेऊन अमलांत आणण्याचा प्रयत्न कां करू नये तें कळत नाहीं. हिंदु व मुसलमान हीं हिंदुस्थानच्या राष्ट्रपुरुषाचीं दोन प्रधान अंगें आहेत. या दोन अंगात जर जुटीनें काम करण्याची शक्ति नसली तर राष्ट्रपुरुषाचा देह विकल अत कार्यसाधनाविषयीं असमर्थ असणारच. विकलत्व काढून टाकून त्याला सबळ ण्याचें काम स्वराज्याचें मृगजळामागें ...यापेक्षां कमी महत्त्वाचें आहे असें ...तास कोणी ही सुशिक्षित मुसलमान कधीं ही तयार होणार नाहीं अशी आमची खात्री आहे. मग उशीर कां ?

---

### सरस्वतीचें राज्य,

कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या पदवीदान समारंभाचे वेळीं व्हाइसचान्सेलर सर आशुतोष मुकर्जी यांनीं सांगितलें कीं सरस्वतीचे राज्यांत जातिभेद किंवा वर्णभेद नसला पाहिजे. योग्यतेचीच खरी कसोटी समजून युनिव्हर्सिटींत प्रोफेसरांच्या वगैरे नेमणुका झाल्या पाहिजेत. अगदीं खरी गोष्ट. पण हा तात्विक विचार ... या प्रश्नाला व्यावहारिक ही बाजू आहे ... सर साहेब त्यावेळीं विसरले. कॉलेजांतून संस्कृत प्रोफेसरांच्या जागीं सरकार जेव्हां एखाद्या युरोपियनाची नेमणूक करतें किंवा डा० पी. सी. रॉयसारख्या त्रिखंड कीर्तीच्या शास्त्रज्ञास प्रांतिक सर्विसमध्येंच कुचंबण्यास लावून त्यांचे शिष्य ह्मणण्यास सुद्धां अपात्र अशा एखाद्या अपक्वबुद्धीच्या युरोपियनास त्यांच्या डोक्यावर आणून बसवितें तेव्हां हा तात्विक विचार सरकार बाजूला ठवतें कीं नाहीं ! सरकार खरोखर व्यवहारज्ञ आहे, आणि ज्याला व्यवहारांत वागावयाचें आहे त्यानें व्यवहारदक्षता ठेविलीच पाहिजे आमच्यांतल्या विद्वानांचें चुकतें तें येथेंच.

---

### शास्त्रीय ज्ञानाचा अभाव

कलकत्याच्या प्रेसिडेन्सी कालेजांतील शास्त्रीय विषयाचे मुख्याध्यापक आणि सुप्रसिद्ध रसायनशास्त्रवेत्ते डा० पी. सी. राय यांनीं बंगालच्या साहित्यसंमेलन प्रसंगीं केलेल्या भाषणांतले एक दोन मुद्दे सद्यःस्थितींत विशेष विचारणीय आहेत. इकडील शाळांत विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शिक्षणांत अनेक दोष आहेत ही गोष्ट सर्वांना मान्य आहे. पण या दोषांत अतिशय मोठा दोष ह्मणजे शास्त्रीय विषयाच्या ज्ञानाला देण्यांत आलेले गौणत्व हा आहे असें डा० राय यांचें ह्मणणें आहे. आह्मी आमच्या मुलांना लॅपलँड, सानसाल्व्हाडोर वगैरे अप्रसिद्ध ठिकाणें कोठें आहेत तें शिकवितों, कोंवळ्या आणि अपरिपक्व बुद्धीच्या मुलांकडून भूमितीसारख्या कठीण विषयाचीं प्रमेयें सोडवून अथवा घोकवून घेतों, इंग्रजी भाषेंतल्या अप्रसिद्ध व अप्रचलित संप्रदायाचीं सोपपत्तिक माहिती त्यांना करून देतों, संस्कृत व्याकरणाचा कीस त्यांचेकडून करवून घेतों, आणि व्यवहारांत अगदीं कधीं न लागणाऱ्या विषयांचा त्यांच्याकडून अभ्यास करवून घेण्यांत त्यांच्या बहुमोल आयुष्यांतल्या वीस बावीस वर्षांचा अपव्यय करवितो, नुसता कालाचाच अपव्यय करवितो असें नाहीं तर लहानपणापासून असल्या निरुपयोगी विद्येच्या भाराखालीं त्यांना इतके दडपून टाकतों कीं त्यांची तरतरी, बुद्धिमत्ता, भावी उमेदी, उत्साह आणि शारीरिकबल यांचा ऱ्हास झालाच पाहिजे. पण त्याला व्यवहारांत जें ज्ञान पदोपदीं लागावयाचें, ज्या ज्ञानाच्या बलावरच पाश्चात्य राष्ट्रें उदयाला आलीं, जें ज्ञान हिंदुस्थानाला आजच्या स्थितींत दारिद्र्य विमोचनाचा खरा मार्ग दाखविणारें आहे आणि हिंदुस्थानचा सांपत्तिक भाग्योदय ज्या एका ज्ञानावरच सर्वथा अवलंबून आहे त्या ज्ञानाचा मात्र गंधसुद्धां त्याला लागूं देत नाहीं. ज्या शास्त्रविषयक गोष्टी विलायतेंत १०।१२ वर्षांच्या मुलाला सुद्धां ठाऊक असतात त्या आमच्या इकडे पदवीधरांना सुद्धां ठाऊक नसतात इतके शास्त्रीय ज्ञानांत आह्मी मागें पडलों आहों. पण भाषाविषयक किंवा इतर निरर्थक विषय कमी करून त्याबद्दल शास्त्रीय विषय अभ्यासक्रमांत घालण्याचें कोणाच्या डोक्यांत येत नाहीं हें आश्चर्य आहे. आमचें वाङ्मय पाहावें तर त्यांत सुद्धां हीच रडकथा दिसून येतें. दरसाल मराठी भाषेंत होणाऱ्या तीन चारशें पुस्तकांत पांचचार पुस्तकें सुद्धां शास्त्रीय विषयांवरचीं नसतात. ही उणीव अतिशय महत्त्वाची असून तिकडे कोणाचें फारसें लक्ष जात नाहीं हें आश्चर्य आहे. आमच्या देशांत सामान्य लोकांत ह्या शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार झाल्याशिवाय आमच्या देशांतले उद्योगधंदे वाढणार नाहींत. कारण उद्योगधंद्याचा मुळ पायाच शास्त्रज्ञानावर आहे. तेव्हां आमच्या सुशिक्षितांचें व सरकारचें पहिलें कर्तव्य ह्मणजे सामान्य लोकांत शास्त्रीय शिक्षणाचा प्रसार करणें हें आहे.

---

### देशी भाषेंतच पुस्तकें

#### व्हावयास पाहिजेत.

अलीकडे कित्येक विद्वान एखाद्या विषयाचें विशेष परिशीलन करून क्वचित् एखादा बहुमोल ग्रंथ निर्माण करतात, पण अशा वेळीं आपल्या गुणाची पारख होऊन स्वतःस अर्थलाभ व कीर्तिलाभ व्हावा ह्मणून ते आपले ग्रंथ बहुधा इंग्रजी भाषेंत लिहून प्रसिद्ध करतात. हा एक प्रकारचा स्वार्थच आहे, आणि तो टाकून देऊन सामान्यजनाला सुद्धां कळेल अशा रीतीनें देशी भाषेंत आपले शोध व कल्पना प्रसिद्ध करण्याइतका स्वार्थत्याग आमच्या ग्रंथकारांत जागृत झाल्याशिवाय हिंदुस्थानचे लोक व त्यांचें देशी वाङ्मय या दोघांची ही उन्नति कदापि होणार नाहीं. ह्मणून आमच्या लेखकवर्गानें आतां आपला मोर्चा शास्त्रीयविषयाच्या अध्ययनाकडे व देशी भाषेंत त्या विषयावर सोपे ग्रंथ लिहिण्याकडे वळविला पाहिजे असे डा० राय यांचें ह्मणणें आहे. आह्मी स्वतः अनेक वेळां हीच गोष्ट प्रतिपादित आलों आहों आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेला आमची अशी विनंती आहे कीं त्या संस्थेनें आपलें लक्ष मराठी भाषेंत शास्त्रीय ग्रंथ निर्माण करण्याकडे प्रथम लावावें व लोकांत त्या विषयाची अभिरुचि उत्पन्न केल्याचें श्रेय घ्यावें. सद्यःस्थितींत याहून अधिक महत्वाचें व जरूरीचें दुसरें कार्यच नाहीं ह्मटलें तरी चालेल. रशिया जर्मनी, जपान वगैरे राष्ट्रें शास्त्रीय ज्ञानाच्या प्रगतीच्या मार्गांत आघाडीला गेलीं तीं याच ह्मणजे देशी भाषांत हरतऱ्हेचें शास्त्रीय वाङ्मय तयार करण्याच्या मार्गानेंच गेलीं आहेत, व त्यांच्या सारखे नेटाचे व एकनिष्ट प्रयत्न आमच्यांतल्या साहित्य संस्था व लेखक वर्गानें ... होईना, पण त्यांचे प्र... ...लांतानें कां ... होतीलच होतील.

---

या शास्त्रीय विषया कडे आमच्या ... क्षित लोकांचें कसें पूर्ण दुर्लक्ष आहे ... पाहावयाचें असेल तर आमचीं वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें पहावीं. विलायतेंत शास्त्रीय विषयावर स्वतंत्र वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें आहेत तरी तीं कदाचितें सामान्य वाचकांच्या हातीं पडणार नाहींत. ह्मणून इतर वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें यांचे संपादक शास्त्रीय विषयक ग्रंथांतून व मासिकांतून येणारी माहिती आपल्या वाचकांस मनोरंजक रितीनें नेहमीं करून देतात. आमच्या इकडचीं ठळक वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें घ्या, आणि त्यांनीं लिहिलेल्या लेखांची मीमांसा करा, ह्मणजे उभ्या वर्षांत किंबहुना कित्येक वर्षांत एक सुद्धां शास्त्रीय लेख किंवा उतारा दिलेला आढळणार नाहीं. शास्त्रीय विषयाचा स्पर्श ह्मणजे विटाळ अशी त्यांची समजूत झालेली दिसते शास्त्रीय विषयासारख्या अत्यंत महत्वाच्या व जरूरीच्या ही विषयाची ही उपेक्षा अत्यंत शोचनीय आहे असें कोण ह्मणणार नाहीं?

---

### प्राच्य आणि पाश्चात्य सत्यवादित्व.

तुलना ह्मटली ह्मणजे केव्हां ही वाईटच मग ती व्यक्तीची असो, किंवा राष्ट्र पुरुषांची असो. त्यांतून एखाद्या वादग्रस्त मुद्याचा समावेश त्या तुलनेंत झाला, ह्मणजे तर तिला अधिकच तिरस्कार्य स्वरूप येतें. पण कधीं कधीं राजकारणी पुरुषांना आपलें वर्चस्व स्थापित करण्यासाठीं आपली दुसऱ्याशीं तुलना करून दुसऱ्याचें अंगीं हीनता आहे हें दर्शविण्याचा मोह पडत असतो. वस्तुतः प्राच्य राष्ट्राचा— विशेषतः भरतखंडाचा सत्यवादित्व हा गुण प्राचीन काळापासून जग विश्रुत आहे. पण लॉर्डकर्झन ह्मणाले कीं भरतखंडांतले लोक लबाड आहेत. आणि कर्झन साहेब हे पडले त्या काळचे भरतखंडाचे सर्व श्रेष्ट अधिकारी त्यांच्या विरुद्ध कोण बोलतो! भरतखंडाला लबाड ठरवून पाश्चात्य राष्ट्रांना सत्य भाषणाचे कामीं कर्झन साहेबांनीं जरी सार्टिफिकेट ते वेळीं दिलें तरी सत्य तें सत्य. तें बदलण्याची शक्ती लाट साहेबांचे अंगीं नाहीं. लाट साहेबांचे उद्गार लोकांच्या स्मरणांतून व तुर्को— बाल्कन वगैरे प्रसंगीं पाश्चात्य बातमीदार कशा खोट्या बातम्या पाठवीत असतात तें जगाच्या निदर्शनाला आलें, आणि टाइम्स ऑफ इंडिया व कलकत्याचा इंग्लिशमन यासारख्या गोऱ्या पत्रकारांना सुद्धा खोट्यानाट्या बातम्या प्रसिद्ध करणाऱ्या बातमीदारांच्या कृतीची अगदीं चीड येऊन आपल्या मनाला वाटणारा तिरस्कार व्यक्त केल्यावांचून त्यांच्यानें राहवलें नाहीं. सध्याच्या बाल्कन युद्धांत तर उच्चपदस्थ प्रधानमंडळीवर सुद्धां खोट्यानाट्या गोष्टी प्रसिद्ध केल्याचा आरोप हीं पत्रें करीत आहेत. यावर लॉर्ड कर्झन साहेब काय ह्मणतात ते ऐकण्यास मिळेल तर गंमत होईल.

---

## ...ची प्रयत्न

...मोठा सुधारक आहे. तो ...सुधारणा आपोआप घडवून आणितो. ...रींत स्पर्शास्पर्श झाला तरी स्नान ... करतां फराळाच्या डब्यावर ताव मारित ...ना, काल्पनिक सोवळ्या ओवळ्याच्या बागुलबोवाला न भितां सोय आणि सयुक्तता यांचा विचार करून वर्तन ठेवा असें सांगणारे उपदेशक पाठविण्याचें कारण पडलें नाहीं. लोकांच्या आचारविचारांतलें हें परिवर्तन काळानेंच आपोआप घडवून आणिलें. पण कित्येकांचा काळाच्या सुधारकत्वावर विश्वास नाहीं. कित्येकांना असें वाटतें कीं काळाच्या मार्फत सुधारणा घडण्यास फार विलंब लागतो. गोष्ट खरी आहे. पण ही सुधारणा समाजांत उष्णता उत्पन्न नहोतां झाल्या कारणानें अधिक चिरास्थायी व लोकांना न कळत होते. इष्ट समाजसुधारणेस आह्मा अनुकूल असल्या मुळें काळाच्या मदतीला समाज सुधारकांचे प्रयत्न आल्यास आमच्या दृष्टीनें तें इष्टच आहे, आणि सध्यां लोकांत सामाजिक सुधारणे विषयीं ती उदासीन वृत्ती दिसत आहे ती पाहतां सामाजिक सुधारणेची प्रचार जोरानें करण्यासाठीं मुंबईच्या सामाजिक परिषदेच्या चिटणीसांनीं जी जी योजना प्रसिद्ध केली आहे ती आह्मास अभिनंदनीय वाटते. सामाजिक परिषदेच्या शाखा प्रांतोप्रांतीं स्थापाव्या भाषणांच्या हस्त पत्रकाच्या व लेखांच्या वगैरे द्वारें लोकांत समाज सुधारणे विषयींची इच्छा जागृत ठेवावी वगैरे गोष्टी या योजनेत अंतर्भूत आहेत. या कार्याला लागणारा पैसाही गोळा होईल. पण या कार्याला तनमनधन अर्पण करणारे एकनिष्ठ माणसें कोठें मिळणार? सुधारकांचा समाज चांगला सुशिक्षित असून 'सुधारका' सारखें त्या विषयाच्या चर्चेसाठीं मुद्दाम अवतीर्ण झालेलें साप्ताहिक पत्र ज्या सुधारकां कडून आगरकरांच्या मागें वीस पंचवीस वर्षें सुद्धां जिवंत राखण्यांत आलें नाहीं, त्यांनीं जागोजाग शाखा स्थापून समाज सुधारणा संस्थांचें जाळें सगळ्या हिंदुस्थानभर पसरण्याची महत्त्वाकांक्षा धरावी हें खरोखर हास्यास्पद दिसतें. या योजनेंत 'सुधारका'चें पुनरुज्जीवन करण्याचा उल्लेख ही नसावा हें तर अगदींच विचित्र किंबहुना अक्षम्य आहे. सुधारक 'सुधारका'ला इतक्यांतच विसरले काय?

—•—

## जाहिराती.

शिल्प, कला, व्यापार वगैरे अनेक बाबतींत इंग्लंड देश आह्मांला गुरुस्थानीं आहे आणि या बाबतींत त्या देशापासून आह्मांला पुष्कळ गोष्टी शिकावयाच्या आहेत. जाहिराती देण्याचे कामीं धाडस व त्यांच्या उपयुक्ततेविषयींचा विश्वास या दोन गोष्टी त्यांपैकींच होत. विलायतेंत नवीनच गेलेला मनुष्य जिकडे तिकडे भिंतीवर आगगाड्यांच्या डब्यांतून वर्तमानपत्रांतून, फार काय पण खाद्यपेय पदार्थांतून सुद्धां जाहिरातीच जाहिराती पसरलेल्या पाहून भांबावून जातो. पियर्स, सन लाइट, कॅडबरी, बीच्याम, झंबूक वगैरेंच्या जाहिराती नाहींत असें एक सुद्धां गांव विलायतेंत नाहीं हिंदुस्थानांत सुद्धां ह्या जाहिराती जिकडे तिकडे पसरल्या आहेत. चित्रकाराला हजारो रुपये चित्र काढण्याबद्दल देऊन त्याच्या कोट्यावधि प्रतींचा प्रसार आपल्या जाहिरातीसह करण्याचें जणूं काय पियर्स सारख्या कंपन्यांना वेडच लागलें आहे. इंग्लंडच्या सरकारी खजिन्यांत रक्कम सांपडणार नाहीं येवढी रक्कम या कंपन्या सालोसाल जाहिरातींच्या पायीं खर्चीत आहेत. हा एवढा खर्च त्या मानानें फायदा झाल्या शिवाय या कंपन्या करीत नाहींत हें तर उघडच आहे. या जाहिरातीं पासून व्यापाराची वाढ तर होतेच, पण अप्रत्यक्ष रितीनें दुसराही एक फायदा त्या देशाला होत आहे. इंग्लंडच्या वर्तमानपत्रांचा उत्कर्ष हा पुष्कळ अंशानें या जाहिरात देणारांच्या आश्रयाचा परिणाम आहे. इंग्लंडचीं वर्तमानपत्रें जीं जोरानें विशिष्ट राजकीय मतें प्रतिपादीत असतात त्याचें कारण त्यांना या जाहिराती मुळें प्राप्त झालेली स्वतंत्रता हें आहे, कित्येक वर्तमानपत्रांत वाचण्याचा मजकूर वीस पानें तर जाहिरातीची शंभर पानें असा प्रकार आढळतो! आमच्या इकडे असें एकच उदाहरण आहे आणि तें अलाहाबादच्या पायोनियर पत्राचें होय, जाहिरातीच्या उत्पन्नावर वर्तमानपत्रांना आपलीं विशिष्टमतें कशीं जोरानें प्रतिपादतां येतात याचें उदाहरण ह्मणजे केसरी पत्राचें आहे इंग्लंडच्या मानानें हें उदाहरण कांहींच नाहीं तथापि वाचकांना कांहीं थोडीशी कल्पना करतां यावी ह्मणून तें येथें दिलें आहे. विलायतेंत जाहिरात देण्याची एक कला होऊन बसली आहे आणि या कलेंतल्या निष्णात लोकांनीं मंडळ्या स्थापून व्यापाऱ्यांच्या जाहिराती लिहून देण्याचा व त्यांचा प्रसार करण्याचा एक प्रतिष्ठितपणाचा धंदाच मांडला आहे. या संस्था मार्फत जाहिराती देण्याचें काम शिकविण्याच्या शाळा सुरू आहेत. जाहिराती आणि त्यांचा व्यापारोत्कर्ष व साहित्योन्नति यांच्याशीं संबंध हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. आमच्या इकडे पाश्चात्यांच्या अनुकरणानें वर्तमानपत्रांचीं संस्था अस्तित्वांत येऊन पंनासावर वर्षें झालीं, तथापि जाहिरातीचें महत्व आमच्या व्यापारी वर्गाचें मनावर ठसावें तसें अद्याप ठसलें नाहीं. आमचा व्यापार जोरानें फोफावत नाहीं व साहित्याची वाढ व्हावी तशी जोरानें होत नाहीं याचें एक कारण जाहिरातीकडे शास्त्राच्या व कलेच्या दृष्टीनें आह्मी पाहत नाहीं हें आहे.

---

## ना० विजय राघवाचार्य

'स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं देवो न जानाति कुतो मनुष्य' अशी आमच्यांत एक ह्मण आहे. तिचा पहिला अर्धभाग स्त्रीजातीची विटंबनाकरणारा आणि असत्य असला तरी उत्तरार्धांत पुष्कळ सत्य आहे अशी प्रतीति केव्हांकेव्हां येते. व्हाइसराय साहेबांच्या कायदे कौंसिलचे मद्रास तर्फेचे मेंबर ना मि. विजयराघवाचार्य यांच्या संबंधानें बांबे क्रॉनिकल पत्रानें जी पुर्वकथा प्रसिद्ध केली आहे ती खरी असेल तर त्यांचें चरित्र खरोखरच कल्पनातीत ह्मटलें पाहिजे भाग्य ह्मणून कांहीं शक्तिनसतीतर आज मि. आचार्य हे कायदेकौंसिलांत व्हाइसराय साहेबांच्या टेबलापाशीं न बसतां आंदमान बेटांत काळ्यापाण्याचे कैदी ह्मणून काम करतांना दिसले असते. हिंदु व मुसलमान याच्या दंग्यासंबंधानें एका आरोपावरून त्यांना जन्मठेपीची शिक्षा कांहीं वर्षांपूर्वीं खरोखरीच एका जज्जानें दिली होती. पण हायकोर्टाकडे केलेल्या अपीलांत ते निर्दोषी ठरून सुटले, आणि हळूंहळूं बढती मिळून आज ते कौंसिलांत विराजमान झालेले दिसत आहेत. राष्ट्रसभेचे एक मूळ उत्पादक व पुढारी प. वा. डबल्यू. सी. बॉनर्जी हे नाटकांतल्या सोंगाड्या पासून वाढत वाढत उच्च पदाला गेलेले होते. पण त्यांच्या पेक्षां ना. मि. विजयराघवाचार्यांचें चरित्र खरोखर आश्चर्यातीत आहे.

---

## वरिष्ठ कायदे कौंसील

गेल्या सोमवारीं वरिष्ठ कायदे कौंसिलाच्या बैठकींत सर गायफ्लीटवुड विल्सन यांनीं मांडलेल्या बजेटावर नामदार सभासदांचीं भाषणें झालीं. या भाषणांचा सारांश तारेनें आलेला जो आह्मी पाहिला आहे त्यावरून ना. गोखले यांची गैरहजिरी तेथें फारच भासमान झाली असावी असें दिसतें. ना. सर फ्ली. विल्सन यांचें ही असेंच मत दिसतें. कारण बजेटवरच्याचर्चेंत अखेर भाषण करतांना यंदा ना. गोखले यांची सणसणीत टीका ऐकण्याचा योग आला नाहीं या बद्दल त्यांनीं खेद प्रदर्शित केला, आणि हॅम्लेटच्या भूमिके वांचून जसें हॅम्लेट नाटक निःसार. तसें गोखल्या वाचून कौन्सिल निःसार आहे असें स्पष्टपणें ह्मटलें. बजेटवर झालेल्या सर्वांच्या टिकेचें मुख्य सार हें होतें कीं सरकारनें प्रांतिक सरकारला जरी मोठाल्या देणग्या दिल्या आहेत तरी त्या अपक्याच रीतीनें खर्च व्हावयास पाहिजेत असा जो त्यांच्या बरोबर निर्बंध घालण्यांत आला आहे तो काढून घ्यावा व प्रांतिक सरकारला या रकमांचा विनियोग हव्या त्या रीतीनें करण्याची स्वतंत्रता असावी. शिक्षण व आरोग्य यां प्रित्यर्थ दिलेल्या रकमा मोठ्या आहेत. पण देशाच्या गरजेच्या मानानें पाहतां त्या अधिक नाहींत. मध्यप्रांता साठीं एक स्वतंत्र युनिव्हर्सिटी स्थापावी असा सरकारचा हेतु नुकताच जाहीर झालेला आहे. पण या कार्या साठीं बजेटांत रक्कम काढून ठेवलेली नाहीं, व त्याच प्रमाणें वऱ्हाड प्रांतासाठीं एक आर्टस कॉलेज हवें आहे, त्याच्याही खर्चाची सोय बजेटांत लाविली नाहीं अशी ना० रा० ब० वासुदेवराव पंडित यांनीं टीका केली. मध्यप्रांताला लवकरच लेफटेनंट गव्हर्नर मिळून इलाख्याचा योग्यता प्राप्त होईल अशी आशा ना० सर गं० चिटणीस यांनीं प्रदर्शित केली.

---

## सर फ्ली० विल्सन यांचें मनौदार्य.

हिंदुस्थानचे सध्याचे फडणीस ना० सर फ्ली० विल्सन हे पेनशन घेणार असल्या मुळें यंदाचे बजेट हें त्यांच्या हातचें शेवटचें होतें. या बजेटावर टीका करतांना विल्सन साहेबांच्या स्तुतिपर उद्गार काढण्याची संधी बिन सरकारी सभासदांनीं हातची जाऊं दिली नाहीं. बहुतेक सभाही व्यवहार साहेबाच्या आंगचे सरळपणा हिं नाहीं. ही नोंद विषयीं सहानुभूति, मनौदार्य, सभ्यता आंत आमचें गुणांची योग्य प्रशंसा केली. तींत [illegible] अतिशयोक्ति नव्हती हें साहेबांनीं शेवटचा राम राम ठोकतांना केलेल्या अखेरच्या लहानशाच पण प्रेमळ भाषणा वरून चांगलें दृष्टोत्पत्तीस आलें. या भाषणांत साहेबांनी आपल्या हाता खालच्या अधिकाऱ्यांनीं विशेषतः हिंदी गृहस्थांनीं जी मदत केली तिज बद्दल भरपूर स्तुति करून हिंदुस्थानचे लोक सरकारी काम करण्यांत कसे वाकबगार, मेहनती, आणि विश्वासास पात्र असतात तें दाखविलें. प्रेम आणि विश्वास द्यावा आणि घ्यावा असा नियम आहे. नामदार साहेबांना पहिल्या पासून आपल्या हाता खालच्या अधिकाऱ्यांशीं प्रेमाचें वर्तन ठेवून त्याच्यावर विश्वास टाकला. आणि मोबदल्यांत त्याचे प्रेमळ व विश्वास संपादिलीं. यांत अपूर्व असें कांहीं नाहीं. आज पर्यंत ज्या ज्या अधिकाऱ्यांनी हिंदी लोकां विषयीं मनांत अढी न ठेवतां सरळ पणानें व प्रेम युक्त असें वर्तन ठेविलें त्या सर्वांना जो अनुभव आला तोच सर साहेबांनाही आला आहे तथापि आलेला अनुभव स्पष्टपणें सांगून हिंदी लोकां विषयीं स्तुतिपर उद्गार काढण्यासही आंग्लो इंडियन समाजांत मनोधैर्य लागतें तें सर साहेबाचे अंगी भरपूर आहे हें पाहून आह्मांस फार संतोष वाटतो, आणि सर साहेबांचा भावी आयुष्य काळ सुखांत जावा असें चिंतून आह्मी त्यांना निरोप देतों.

---

# वऱ्हाडवृत्त.

---

**हवामानः**— उष्णता प्रखर वाटते रात्रीं थंडोसा असतो. वारा सोसाट्यानें व हात असतो उष्णते मुळें गोंवर, देवी वगैरे आजार थोडेसे वाढले आहेत. पिण्याच्या पाण्या संबंधानें मोठीच हाकाटी आहे.

ललितकलादर्श नाटक मंडळीनें गेल्या शनिवारीं गोपिचंद नाटकाचा प्रयोग केला, ही कंपनी लोकाश्रयाला विशेष पात्र होत आहे.

सर चार्लस क्लीव्हलांड डायरेक्टर आफ क्रिमिनल इंनटेलीजन्स यांस २८ मार्चच्या तारखेपासून सहा महिन्यांची रजा देण्यांत आली.

ता. १७।४।१३ पासून डिपार्टमेंटल परिक्षा नागपुरास सुरू होतील.

नामंजूरी—उन्हाळ्यानिमित्त दिवाणी कोर्टांची सुट्टी १॥ महिन्याची करण्यासंबंधानें पत्रव्यवहार चालू होता पण सर व्हेंक्रॉकमन यांनीं अखेर ती सूचना नामंजूर केली.

विद्यार्थ्यांची सोय—शाळा खात्याच्या नव्या सरक्युलरामुळे जे विद्यार्थी शाळेला अंतरले त्यांच्या शिक्षणाच्या सोयीसाठीं म्हणून तुर्तातुर्त तरी त्यांस विद्यमान शाळागृहांत घेण्याविषयीं स्पेशल हुकूम मे. डायरेक्टर साहेब काढतील तर फार बरें होईल. खानगी शाळा निघणें शक्य नाहीं. उमरावतीच्या नागरीक लोकां प्रमाणें मुनसिपालिटी कडे धांव घेऊनही कांहीं फायदा होण्याचा संभव नाहीं. तेंव्हां मायबाप सरकारच काय करतील तें खरें.

रा. रा. ए. इ. ड्युगार्ड, एक्झिक्युटीव इंजिनिअर पश्चिम वऱ्हाड यांची बदली येथून उमरावतीस झाली आहे.

आणि त्यांचे जागीं रा. रा. भगवतीचरण डुबे, सब डिव्हिजनल आफिसर, आकोला यांस पश्चिम वऱ्हाडचे एक्झिक्युटीव इंजिनिअर नेमण्यांत आलें हें कळविण्यास आनंद वाटतो.

रा० रा० सी० ब्राऊन असि० कमिशनर, आकोला हे हक्काची व फर्लो रजा मिळून मोठ्या रजेवर लवकरच विलायतेस जाणार आहेत.

खानबहादूर निजामुद्दीन अहमद एम. ए. आफि. इनस्पेक्टर, शाळाखातें यांस इनस्पेक्टरीच्या हुद्यावर कायम करण्यांत आलें ही आनंदाची बातमी होय.

## नोटीस

नोटीस घेणारा रा. भगु भोनाजी कुणबी दाणी रा० पळशीवाशी ता० जळगांव यांस

शिवलाल गुलाबचंद दुकान पळशी सरकतदार सेवाराम कृपाराम मारवाडी रा० पळशी ता० जळगांव नोटीस देण्यांत येते कीं तुमची नोटीस पावली. आम्हास तुमचा बाप भोनाजी वा कर्णाजी दाणी यानीं रुपये २००० चे भरण्यांत किस्ती २९ संवत १९६९ सालचें किस्तीचे रुपये२०० व बाकी दरसाल रुपये १०० प्रमाणें २९ किस्तीच्या गहाण सालबंदीरोखा तारीख ७-४-०२ इसवी रोजीं लिहून देऊन नोंदून दिला आहे. पुढें संवत १९६९ सालची किस्तीचे रुपये २०० व वारिणकोने दिले नसून फक्त १०० रुपये दिले. व बाकीचे रुपये पुढें देऊं असें कळविलें. नंतर सदरहु रिणको म्हणजे तुमचा बाप मयत झाल्यावर दरसाल रुपये १०० प्रमाणें तुम्ही आम्हास संवत १९६८ साला प्रमाणें वसूल दिला आहे. तरी आतां आमचे तुमचेकडे राहीलेले पहिले किस्तीचे रुपये १०० व त्याचें आज पावेतों व्याज असे आम्हास देऊन आमची रसिद घेऊन जावी. व सदरहु दस्तऐवज तुमचे बापाचे नांवाचा असल्यामुळें तो दस्तऐवज राहिले किस्तीच्या तुमचे नांवाचें गहाणी सालबंदीरोखा नवीन करणें जरूर आहे तरी तो नवीन रोखा संवत १९६९ सालचे रुपये १०० व त्याचें व्याज व संवत १९६९ सालचे रुपये १०० असे आम्हास ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत देऊन आमची पावती घेऊन जावी. या प्रमाणें तुम्ही न केल्यास आम्ही तुमचे वर दिवाणी कोर्टांत दावा करून त्याचे खर्चासुद्धां व इस्टेटी सुद्धां ताब्यांत घेऊं मग तुमची तक्रार ऐकिली जाणार नाहीं. ही नोटीस लिहून दिली. कळावे ता० १७-३-१९१३ ई०

सही

सेवाराम कृपाराम मारवाडी द. खु मारवाडींत सही असे.

नो० नं० २८

## जाहिरात

सर्व साहुसावकार व इतर लोक रा. जामोद यांस:—

या नोटीसीनें कळविण्यांत येतें कीं बीरजाबाई जवजे छोगालाल श्रावगी ही हल्ली जामोद येथें ज्या घरांत रहात आहे ते घर आमचे मालकीचें असून तिजला तें राहाण्यास दिलें आहे. सदर्हू घर विकण्याचा व गहाण ठेवण्याचा किंवा इतर रीतीनें त्याची विल्हेवाट करण्याचा तीजला कांहीं अधिकार नाहीं. सदर्हू घर विकण्याचे बेतात ती असल्याचे कळतें. या उपर सदर्हू घरासंबंधानें तीजशीं कोणी कोणत्याही प्रकारचा व्यवहार करूं नये. केल्यास त्याची जबाबदारी व्यवहार करणारावर राहील कळावें. ता. ३१-३-१३ ई.

सही इंग्रजींत

एस्. पी. अंबडेकर एजंट

अज्ञान मोतीलाल धनालाल

पालन करणार बनसीलाल

नो. नं. २९　　　निंबाजी

## नोटीस

बीरजाबाई जवजे छोगालाल श्रावगी रा० जामोद ता० जळगांव जि० बुलडाणा

ईसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं कजबे जामोद तालुका जळगांव येथील आमचें घर ज्यांत हल्लीं तुम्ही राहात आहां तें खालीं करून देण्याविषयीं तुम्हांस २।३ वेळा सांगितेंहे असतां खाली करून देत नाहीं. तुम्ही कांहीं इस्टेट विकली आहे व घर ही विकण्याचे बेतांत आहा असें कळतें सदर्हू घर तुम्हांस फक्त राहण्यास दिलें आहे तें घर विकण्याचा, गहाण टाकण्याचा किंवा इतर रीतीनें त्याजबद्दल कोणताही व्यवहार करण्याचा तुम्हांस अधिकार नाहीं. ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत आमचें घर आम्हांस खाली करून द्यावें व या नोटीसीचा खर्च आणुन द्यावा तसें न केल्यास आम्हांस रीतीप्रमाणें तजवीज करावी लागेल कळावें ता० ३१।३।१३ ई.

सही इंग्रजींत

एस्. पी. अंबडेकर एजंट

अज्ञान मोतीलाल धनालाल

पालन करणार बनसीलाल

निंबाजी

नो. नं. ३०

## कापूस- तक्ता- साप्ताहिक-　　　२९ मार्च १९१३ पर्यंत

| जिल्हा. | वर्ष | काटन मार्केट — आयात — कापसाच्या गाड्यांची संख्या: ता. २९।३।१३ पर्यंतचा आठवडा | कापसाच्या गाड्यांची संख्या: १।१०।१२ पासून | रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या: ता. २९।३।१३ पर्यंतचा आठवडा | रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या: १।१०।१२ पासून | गठ्ठे बांधण्याचे प्रेस — बांधलेली गठ्ठी: ता० २९।३।१३ पर्यंतचा आठवडा | बांधलेली गठ्ठी: ता. १।१०।१२ पासून आज तागाईत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उमरावती | चालू साल | १,०४० | १३७३५३ | ९२६ | १४,३५४ | २,०११ | १३२,५३५ |
| | गुदस्त | ३,८३५ | २२७६८६ | १३५६ | २१६११ | .... | .... |
| | तिगस्त | ४,३५२ | ८८,२४० | ७७६ | ८,८४५ | .... | .... |
| यवतमाळ | चालू साल | ७७१ | १३०४४५ | १०२१ | १३,६१२ | ८९३ | ७३,८११ |
| | गुदस्त | १२६७ | १३९९३३ | ७०१ | ९,५०९ | .... | .... |
| | तिगस्त | ४१९ | ३८,५७९ | ३४० | १०,९६७ | .... | .... |
| आकोला | चालू साल | १,२९४ | १३७३९१ | १,३८७ | ३३१६० | १,८१५ | १४४,९९४ |
| | गुदस्त | २,५४५ | १७२५७६ | २.०१५ | ४०३३४ | .... | .... |
| | तिगस्त | २,५०२ | ८७,०७४ | १,२४५ | १६१६२ | .... | .... |
| बुलढाणा | चालू साल | ५३४ | ८६,०८७ | २५० | ७,४३३ | १,३१४ | १०१,४७४ |
| | गुदस्त | ११६४ | ११८७१० | ४०४ | ७,६७६ | .... | .... |
| | तिगस्त | २,२६२ | १०८०४३ | २७६ | ४,६८९ | .... | .... |
| एकूण वऱ्हाड | चालू साल | ३,६३९ | ४९१२७६ | ३,१८४ | ६८,५५९ | ५,९९३ | ४५२,८१४ |
| | गुदस्त | ८,८११ | ६५८९०५ | ४,४७६ | ७९,१३० | .... | .... |
| | तिगस्त | ९,५३५ | ३२१९३६ | २,६३७ | ४०,६६३ | .... | .... |

टीप—चालू सालाच्या बरोबरीचे साल गुदस्त व तिगस्त सालचे आठवडे २० मार्च १९१२ व १ एप्रिल १९११ पावेतों होते

पत्रकें धाडणारे
मार्केट प्रेस
३० ९७

सी. यू. वील्स.
डायरेक्टर आफ आग्रिकल्चर
इंडस्ट्रीज—मध्यप्रांत

# एकाच वस्तूपासून तीन देणग्या

सौंदर्य

आरोग्य

थोडा खर्च

जेव्हां तुमचें रक्त दूषित होतें तेव्हां ह्या तिन्ही सुखाना मुकावें लागतें.

रक्तदोषापासून पुष्कळ प्रकारचे घाणेरे भयंकर रोग होतातः—काळे डाग, संधिवात वगांतव्रण पीनस, नाकसडणें, रक्तपिती, सर्वांगठणकणें, सुनभेरी मेहरी, बद, फोड, चट्टे, अंगाची आग, तोंडाला दुर्गंध, अजीर्ण, कंडू व कडकीपासून इतर रोग.

तर स्वतःचाच राजवैद्य बनून रोग नष्ट करणें बरें नव्हें काय ?

—डा. गोखले एम्. ए. एम्. डी यांच्या प्रख्यात—

## आयोडाईझड सार्सापरिलानें

ते निखालस बरे होतात.

फक्त उत्तम वनस्पतींचा बनविलेला आयोडाईझड.

——अनुभवतरपहा.——

किं. १ रु. पो. ख. ०४ आ. उत्तमगुणास, ४ बाटल्यांची पो. ख. सह किं. ४ रु.

**बालामृत हें काय आहे ?**

—— अस्सल बालामृत हें ——

मुलाना आरोग्य देणारें आहे तें पुढील रोगावर अमोलिक उपाय आहे क्षय, खोकला, दम, अपचन, मोठें पोट, काड्यांसारखीं हाडें, ओकारी, शौचाला घाण, दाईट दुधानें होणारें रोग, कंडू, आंकडी वगैरे. डा० गोखले एम्. ए. एम्. डी यांनीं पुष्कळ वर्षांच्या अनुभवानें प्रथम तयार केलेलें. इतर सर्व बालामृतें याच्या रंगीत नकला ! रंगीत साखरेचे पाक पाजून नसते रोग मुलांना विकत घेऊ नका.

किं. १८२ आणे पो. ख. ०४ पूर्ण गुणास ३ बाटल्यांची किं. पो. ख. सह २८९


पत्ताः-- हिंदु फ्यामिली मेडिकल हॉल माधवबाग मुंबई नं. ४ नं. २३

# जाहिरात.

!!! डाक्टर जी. बी. यांची सुवासिक औषधी तपकीर !!!

!! मागवा व खात्री करून घ्या !!

ह्या तपकीरीचा शेंकडों लोकांनीं अनुभव घेऊन सर्टिफिकीटें दिलीं आहेत.




शिवाय वैद्य व डाक्टर लोकांचीं या तपकीरीच्या स्वच्छते बद्दल व गुणाबद्दल अनुकूल मतें आह्माकडे आलेलीं आहेत. ही तपकीर पिनस. अर्धाशिशी, डोकें दुखणें व डोक्यांतील मेंदुचे इतर सर्व रोग तसेंच पडसें वगैरे विकारांवर फार वस्ताद आहे. ही ओढल्यानें मेंदुतील दूषित धातु पातळ होऊन नेत्रद्वारें व नाकांतून बाहेर निघून जाते व मस्तकांतील मेंदु स्वच्छ होऊन बुद्धी व ज्ञान तीव्र व वृद्धिंगत होतात. मज्जेसंबंधीं रोग दूर करणारें या सारखें सुलभ साधन दुसरें नाहीं. साधी तपकीर दहा वीस वेळां ओढून जो उपयोग होतो तो गुण आमची ही सुवासिक तपकीर फक्त दोन तीन वेळ ओढल्यानें करते. एक पैशाच्या साध्या तपकीरींत आमच्या सुवासिक तपकिरीच्या दोन चिमटी मिळविल्या असतां सर्व तपकीर सुगंधी होते. शेंकडों लोक ही तपकीर आपल्या कुटुंबांत नित्य लागणाऱ्या औषधाप्रमाणें संग्रहीं ठेवतात साध्या तपकीरी प्रमाणें ह्या आमच्या तपकीरींतील सुवास व तीव्रता एकदोन दिवसांत नष्ट होत नाहींत हे गुण आमच्या तपकीरींत एक वर्षपर्यंत कायम रहातात ही तपकीर आह्मीं मोठ्या श्रमानें व वैद्यलोकांच्या सहायानें तयार करविली आहे. एक वेळ अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी. एक आण्याचीं तिकीटें पाठविलीं असतां नमुन्याची बाटली पाठवूं. सर्वांस घेण्यास सुलभ पडावी ह्मणून हिची किंमत आह्मीं फायद्याकडे न पहातां फारच माफक ठेविली आहे.

एक बाटलीस ४ आणे व वेगी टपाल व व्ही. पी. खर्च १ आणे

डजन बाटल्यास रु. २—८ " " " ६ आणे

सूचना ] पत्र लिहिणारांनीं इंग्रजींत अथवा बालबोध लिपींत आपचेनर दया करून लिहीणें कळावें. तपकीर मिळण्याचें ठिकाणः—

गुरुबसवा आणि कंपनी,

नो. नं. २४ सावकार पेठ, मद्रास

# का य द्या चीं

मराठी

**न्यायाश्रय मासिक पुस्तक** आह्मी आज ४९ वर्षें काढीत असतों; यांत चारी हायकोर्टांच्या व प्रिव्हिकौन्सिलच्या ठरावांचें भाषांतर दिलेलें असतें. याची सालीना आगाऊ वर्गणी रु. १० व ट. खर्च ६ आणे आहे.

**इतर कायद्यांचीं पुस्तकें**, इंडियन पिनलकोड, क्रि. प्रो. कोड, सि. प्रो. कोड वगैरे सर्व सटीक व साधीं पुस्तकें व किरकोळ आकट आमचेकडे विक्रीस तयार आहेत; खालील पत्यावर क्याटलाग मागवा.

पुणें, शनवार ४२९. न्यायाश्रय कर्ते.

नो. नं २९

# Oriental Government security
# LIFE ASSURANCE COMPANY
# Limited

ESTABLISHED IN 1874.

R. Paterson, Brown, Manager,

HEAD OFFICE—BOMBAY

**FUNDS Exceed 4 crores**

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up to treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested:—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For terms please apply to the undersigned.

Prospectuses forms and any further information can be obtained on application to

M. DESOUZA,

CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P. BERAR & KHANDESH No. No 26


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

*Registered NO N. 150*

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४७ ] आकोला-- सोमवार तारीख १४ माहे एप्रिल सन १९१३ इ० [ अंक १४

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील-
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठीं येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

**मुंबई व्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यांपैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुप-याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ { G. A. Phillips. एजंट

नं १

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां येथे तपास करावा.

एका चिपचें वजन २१३/४ तोळे असतें. त्याचा भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१-९-१० { G. A. PHILLIPS. एजंट

नो० नं० २

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाट लीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं**

**शक्तिकारक गोळ्या**

हें औषध वेतस्थानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ० इ० विकार. तावडतोब दूर होतात. किं रु. १८८

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली खरूज याचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ३

### माझा मला पाहिजे

तुम्ही कांहीं ही ह्मणा पण मी कांहीं हा माझा नांगर तुह्मांस देणार नाहीं हा नऊ नंबरचा नांगर आहे व तो माझा मला पाहिजे आणि तुह्मांला ही तसलाच पहिजे असल्यास तुह्मी किर्लोस्करबंधु किर्लोस्करवाडी ( जिल्हा सातारा ) यांना लिहा ह्मणजे ते तुह्मांला पाठवून देतील. मी त्याला एकूणच तीस रुपये दिले आहेत.

**किर्लोस्कर बंधु**
**पोस्ट किर्लोस्कर वाडी.**
नि० सातारा ( सं. औंध. )

नो० नं० ४

### —सीतागीत—किं. २ आणे

शाळा खात्यानें मंजूर केलेलें, मनोरंजन, केसरी, आनंद वगैरेनीं उत्तम अभिप्राय दिलेलें, मुद्दाम स्त्रियांकरितां सोप्या व चटकदार चालीवर रचलेलें.

अर्ध्याच आण्याची तिकिटे पाठवून मागवा.

**कर्ता:---** गणेश दिनकर आठवले
मास्तर हायस्कूल
आकोला [ वऱ्हाड ]

नो० नं० ५

## निराश्रित बाल रक्षण गृह

सर्वत्र जनसमाजास अल्प मतीनें व अज्ञान बुद्धीनें व नम्रतेनें जाहीर करण्यांत येते कीं ज्या ज्या ज्ञातींत पुनरविवाहाची वहिवाट नाहीं त्या त्या ज्ञातींत वैधव्याचें प्रमाण दिवसें दिवस वाढत चाललें आहे यामुळें गर्भपात बालहत्यादी पातकें कशीं होतात व त्यांचा परिणाम पातकी व त्यांचे संसर्गी लोकांस कसा भोगावा लागतो व सदरील संबंधानें अनीवार्य संकटांत पडल्यामुळें त्यांना किती दुःखें सोसावीं लागतात. ते तपसीलवार लिहिण्यास अशक्य आहे. तरी थोडक्यांत त्याचा परिणाम इतकांच आहे कीं ईश्वरापुढें पातकी, सरकारपुढें गुन्हेगार, व आपआपल्या ज्ञातींत अनेक प्रकारच्या दोषास पात्र व घरांतील आप्त वर्गास स्वतः डोळ्यावर झांकण टाकून कानाडोळा कसा होतो याचा विचार प्रत्येकांनी स्वतःच करावा. या सर्व गोष्टीविषयीं जगानियंत्या परमेश्वरानें माझे मनांत संचार केल्यामुळें वर दर्शविलेल्या संकटांतून निभावण्याकरितां आकोला ताजनापेठेंत हनुमान वस्तींत मारुतीचें देवळाजवळ **निराश्रित बालरक्षण गृह** स्थापन केलें आहे. भाड्यानें घेतलेलें घर केव्हां सोडावें लागेल याचा निश्चय नसतो या करितां मुद्दाम विकत घेतलेलें घर या कामीं अर्पण केलें व वर दर्शविलेल्या नांवाची फळी त्या ठिकाणीं लावलेली आहे. या कामीं संचार करणारा व प्रत्यक्ष हातानी करविणारा व अशा कामीं सर्व प्रकारें निरंतर यश देणारा जगनियंता परमेश्वरच समर्थ आहे.

आपलें अज्ञान बालक जी. श्रीमंतातर्फे
ग्यानेंजर विष्णु प्रभुराम पेन्शनर
हायकोर्ट पिटिशनरायटर

ता० १६-५-१२ आकोला वऱ्हाड

नो. नं. ६

### वऱ्हाडांत खात्रीची उत्तम नवीन सोय.

### खरे गारेचे थंडचष्मे

आह्मीं मुद्दाम वऱ्हाडच्या लोकाकरितां डोळे तपासून सर्व तऱ्हेच्या फ्रेमीसहित खरे गारेचे थंड चष्मे माफक दरानें विकण्याचें दुकान काढलें आहे. मुंबई वगैरे मोठ्या ठिकाणच्या भपक्यावर मंडळी कशी फसतात हें सर्वांना श्रुतच आहे सर्व गरजूनी अनुभव घेवून पहावा.

**गोपाळ पांडुरंग आणि कंपनी**
आकोला

नो० नं० ७

उन्हाळ्याकीरतां

### लिमलेटच्या वड्या

१६ वड्यांचे बाटलीस ८ आणे पोष्टखर्च माफ. ६ बाटल्या घेणारास एक बाटली फुकट. खात्री करितां एकच मागवा

डि. व्ही. राजवाडे बुधवार पेठ पुणें सिटी

नो० नं० ८

### LEUCODERMA.

10,000 Packets Free.

It has now been arranged to di—stribute about 10,000 sample packets of PANDIT KRIPARAM'S infallible cure for LEUCODERMA or WHITE LEPROSY to prove its efficacy and to show that the disease is not incurable as supposed. It never fails. The sample packet will be enough to produce wonders in only one inch spot. write for it atonce per V. P. P. for As. 3 to meet the cost of its transmission, to

PANDIT KRIPARAM,
8, NANDIBAGAN LANE,
P. O. Salkea, Dist. Howrah.

P. S.—Pandit Kriparam's deeply interesting volume on Leprosy, its causation and treatment, etc., etc., can be had only at As. 8 per copy (V. P. P. charges As. 3). Every leper and sufferer from a *tough* kind of skin disease should read the volume—in both English and Bengalee. Please write the address legibly.

No. N. 9

### जाहिर खबर.

जाहीर खबर देण्यांत येते कीं, ज्या भागीदारांचीं नांवें तारीख ३१ आगष्ट १९१२ रोजीं, किंवा त्या पूर्वीं या कंपनीचे बुकांत दाखल झालीं असतील व ज्यांचे तारीख ३१ आगष्ट १९१२ चें पूर्वीं कंपनींत शेअरचे पैसे भरले गेले असतील, त्याजला तारीख १ सप्टेंबर १९१२ पासून तारीख २८ फेब्रुवारी १९१३ अखेर सहा महिन्यांचें दरसाल दर शेंकडा ४ टके प्रमाणें, व्याज देण्याचें या कंपनीचे डायरेक्टरांनीं ठरविलें आहे.

ज्या भागीदारांना वरील नियमान्वयें, हें व्याज देणें योग्य आहे. अशांना या कंपनीचे मुख्य ऑफिसांतून व्याज देण्याचा दाखला अथवा सूचनापत्र अगोदर पाठविण्यांत येईल. तें सूचनापत्र त्या भागीदारांनीं त्यांचे हातीं आल्यापासून एक महिन्याचे आंत वरील कंपनीच, मुख्य ऑफिसांत आपले बरोबर आणावें, व तें या ऑफिसांत रुजूं होतांच व्याज अदा करण्यांत येईल. हें सूचनापत्र रुजूं न केल्यास दुसऱ्या कोणत्याही सबबीवर व्याज देण्यांत येणार नाहीं कळावें.

कंपनीचें ऑफीस ४ ब्रुसलेन, कोट मुंबई ता. ६।४।१३ } भालचंद्र आणि नगिनदास—एजन्टस् अंबाजी तारंगा रेल्वे

नो० नं० १०

ती वर्गणीदारास एक सवलत.

## प्रतिभा.

ल नांवाची कादंबरी श्रीयुत बाबू शचंद्रदास एम० ए० बी० एल० यांची साहित्यांत अत्यंत श्रेष्ठ पद पावलेल्या री' नामक कादंबरीचा आनुवाद एवढें सांगितले असतां ही कादंबरी मनोहर आहे हें निराळें सांगण्याची आवश्यकता नाहीं. प्रस्तुत कादंबरी पत्राचे एप्रील अखेर वर्गणीदार रास निम्मा (४१०) किंमतींत देयोजिले आहे. प्रती बेताच्याच वयाच्या असल्यामुळें या सवलतीचा दा घेऊं इच्छिणारांनीं खालील पत्यावर नोंदविण्याची त्वरा करावी. इतरांस ल अखेरपर्यंत नांव नोंदविल्यास ट० सह १४ सवा रुपया.

सुमती हें पत्र दर सोमवारीं प्रसिद्ध असून यात निवडक लेख, वर्तमान-, मनोरंजक आणि आश्चर्य कारक ी येत असून चालू सालच्या जानेवारी न्या पासून 'अंजनासुंदरी' नांवाची चटकदार कादंबरी चालू आहे. वार्षीक णी ट० हा० सह २ रु० तरी एक पंथ दो काज' या ह्मणी प्रमाणें पत्रास वर्गणीदार होऊन वरील सवलचा फायदा घेण्याची वाचकानीं कृपा रावी.

म्यानेजर-सुमति वर्धा. (सी. पी.)

नो. नं. ११

## नोटीस

नोटीस बेशमी शिवराम गोविंदा ढोले ... दहिवडी व सर्वत्र साहुकार क मु० दहिवडी ता० मलकापूर पो० ांदूर यांस—

खालीं निशानी करणारा कडून नोटीस देण्यांत येते कीं मी सांप्रत बऱ्हाणपूर जिल्ह्यांत पिंपळगांव बोदरडी रहितवाडी येथें राहत आहे. व माझे बाप शिवराम गोविंदा यांचे जवळ वाडिलो पार्जित इस्टेट शेत सर्वे नंबर ९३ यांत हिस्सा ४ था एकर ८ गुंठे ८ आणि जागा १ तीन धारणीं घर लांब अजमासें १६ हात रुंद १२ हात शिवाय आंगण आणि धात्रे १२ खांब अशी आहे. आह्मी २ घे भाऊ तिकडून देशांत येई पर्यंत आपण हे शेत वाहून खावें. आणि इकडे आल्यावर २ न्हीं भावानीं तुमचे खाण्यास खर्च पुरवावा असा ठराव होता. परंतु सांप्रत ते ... लहान भाऊ बळिराम याज पाशीं राहत आहेत. पूर्वीं वेगळे होते आणि ह्मणूनच हे शेत त्यांस खाण्यास ठेविलें होतें. आतां ह्मातार पणामुळें त्यांच्या मतीला भ्रंश झाला असून ते कोणास गहाण खरेदी वगैरे देण्याचे बेतात आहेत असें समजलें वरून त्यास सर्वांस कळविण्यांत येते कीं त्यांना हें शेत कोणत्याच प्रकारें व कोणासच देण्याचा अधिकार नाहीं आणि त्या प्रमाणेंच कोणीं त्याज पासून खरेदी अगर गहाण घेऊं नये. घेतल्यास तें रद्द समजलें जाइल. कोणीं कांहीं पैसे वगैरे दिल्यास त्या बद्दल मी जबाबदार होणार नाहीं. व या संबंधाचे त्याचे जवळून घेतलेले कागदपत्र रद्द समजले जातील. कळावें ही नोटीस दिली. ता. ९-४-१९१३ ई

सही

निशानी उदेभान शिवराम ढोले
रा० बोदरडी पो० इच्छापूर
ता० जैनाबाद यांची
व आंगठा

नो० नं० १२

## नोटीस

रा० परशा वल्द मान्या चांभार राहणार काखपुरी ता० मुर्तिजापूर यांसः—

खालीं सही करणार इनकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून मी वयांत आल्यास दहा बारा वर्षें झालीं असून तुह्मी मला नीट रितीनें वागवीत नाहीं मी तुमचें घरीं आले असतां मला मारहाण करितां व माझे खाण्या पिण्याचे हाल करून तुमचे पासून सुख मुळींच मिळत नाहीं उलट तुह्मी मला माझ्या शरिराचे भाग डागणीनें डागून काढून माझे हालहाल करून मारण्याच्या विचारांत होतां ह्मणून मी माझा माऊसभाऊ नामें भगवान वल्द पुरणाजी चांभार राहणार खोलापूर यास निरोप पाठवून बोलावून घेतलें त्यानें माझ्या बद्दल तुह्मास नीट रितीनें वागविण्या बद्दल ह्मटलें असतां तुह्मी जबाब दिला कीं आह्मी हिला कांहींतरी कलंक लावून काढून देऊं तेव्हां माझ्या माउसभावानें मला आपलें घरीं नेलें. त्यास बारा माहिने झाले तरी तुह्मी मला नेण्यास आला नाहीं माझ्या भावानें मला घेऊन जाण्या बद्दल तुह्मास दोन तीन पत्रें पाठविलीं असूनही तुह्मी मला घेऊन गेलां नाहीं करितां या नोटिसीनें कळविते कीं ही नोटीस पावल्या पासून तुह्मी पंधरा दिवसाचे आंत आपले जातीचे पांच पंच घेऊन येऊन त्याचे समक्ष मला चांगले रितीनें वागविण्या बद्दल कागद माझे भावास लिहून देऊन माझे बारा महिन्याचे खावटी बद्दल रुपये शंभर १०० त्यास देऊन मला घेऊन जावें मुदतीत तुह्मी असें न केल्यास मी हीच फारकती समजून दुसरा घरठाव करीन. कळावे. ता. ३-४-१९१३ ई०

सही

सखू मर्द परशराम चांभार हिचे
हातचा निशानी आंगठा असे
दस्तुर मेरो गंगाधर.

नो० नं० १३

## नोटीस

नोटीस बेशमी पांडुरंग नारायण भालेराय ब्राह्मण रा० पातुरशेखबाबू यांसः—

खालीं सही करणारा याज कडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे बागाईत पातूर येथील शेत सर्वे नंबर ४१।१ यांतील आंब्याच्या झाडाचे मालकी संबंधानें दिवाणी मुकदमा नंबर १०८—१९१२ निकाल ता० ३-२-१३ यांतील ठरावावर आमचे अपीलाचें काम सुरू आहे व अपीलाचा निकाल होई पर्यंत झाडाचा ताबा वादीस मिळू नये अशी वादीस मनाई होण्या आमचा अर्ज कोर्टांत दाखल आहे. या नोटिसीनें तुह्मास कळविण्यांत येते कीं मध्येंच आमचे फळ बारावर तुह्मी जुलमानें हल्ला केल्या मुळें सार्वजनिक शांततेचा भंग होउन आमचे पैकीं कोणास काहीं दखल झाल्यास जबाबदार तुह्मी धरले जाल. तुमचे कडून तसा कांहीं भयंकर प्रकार घडू नये याज करितां ही नोटीस देणें भाग पडलें. कळावें ता० ९-४-१३ ई० मुक्काम आकोला दस्तूर विष्णू प्रभुराम आकोला

सही

नि० धाहादु वा। श्रावण माळी
रा० पेठ पातूरशेखबाबू याचे
हातची खुद

नो० नं० १४

## नोटीस

जगु बुगडाजी धनगर पोष्ट दानापूर तालुका आकोट मी नोटीसीनें कळविते कीं बाबाचे नांवें खरेदी असलेले घर गायवाड्यानजीकचे चार धारणी तीन आडे वर कवेलु आंगणचा दरवाजा दक्षीणेस घराचा वापर पुर्वेस तें आपण बापातुन विभक्त झाल्यावरून राहावयास दिले त्यात आमचें सामान आज किंमतीला शंभर रुपयाचें सागवान जोडणे खांब नाटा ताथकडी किलचा उथाळ खंडीभर तक्ते आपण अफरातफर केले व आमचे विरहीत बाबानें आपणास जागा खरेदी दिली ती आह्मांस ना मंजूर विकावयाची नाहीं तीन वर्षांचें भाडे सामानाची किंमत यासह हल्लीचे मानानें दिडशे रुपये देऊन जागा ताब्यांत द्यावी एक महिन्याचे आंत असें न केल्यास खरेदी खोटी कोर्टमार्फत ठरऊन तीन वर्षांचे भाडे घेतले जाईल. व तुमचे बाबाकडे आमचे पैशाबद्दल मागे नोटीस दिली कळावें तारीख

सही

सुर्यभान कृष्णाजी पाटील पोष्ट
दानापूर ता० आकोट

नो० नं० १५

## नोटीस

नोटीस बेशमी अमनदहुसेन वा। मीर आमन मुसलमान रा. हिवरखेड ता० आकोट यांस—

खालीं सही करणाराकडून कळविण्यांत येते कीं तुमचेकडे आमचे रोखयाचे रुपये व व्याज व चिल्हर खात्याचे रुपये व कपड्याचे रुपये व त्याचे व्याज घेणे आहेत ते नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत न दिल्यास कोर्टमार्फत फिर्याद करून कोर्टखर्च नोटीस खर्चासुद्धां रकम वसूल केली जाईल कळावें ही नोटीस दिली ता. ९ एप्रिल १९१३ ई.

सही

बुलीदान लादूराम द० छोगालाल

नो० नं० १६

## नोटीस

नोटीस बेशमी सपंत वा। पांडू लोहार रा० टाकरखेड पो० मोताळा ता० मलकापूर यांसः—

खालीं सही करणारा कडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी माझे मोहतराचे नवरे आहांत मोहतूर होताना असा करार झाला होता कीं मी लग्नाची बायको घरांत ठेवणार नाहीं. ह्मणून हे मोहतूर करणार. जर लग्नाची बायको घरांत ठेविन तर हिला (मला] दागीन्या सुद्धा आई बापानीं घेऊन जावें. आतां तुह्मी १ वर्षा पासून लग्नाची बायको घरीं आणली आहे ह्मणून माझे आईबापांनी १ वर्षा पासून मला घरीं आणले आहे तरी ही नोटीस पावल्या पासुन १५ दिवसांत माझी फारकती [मला ठेवण्याचा तुमचा बेत नसल्यास] माझे दागीने व माझी २ मुलें व माझा खाण्याचा १२ महिन्याचा खर्च सरासरी १०० रुपये हा आणून द्यावा आणि मला मोकळें करावे या संबधीं १५ दिवसांत तुमचे कडून कोणतीच तजवित न झाल्यास ही नोटीस फारकती समजून मी दुसरा घरठाव करीन. मग तुमचा मजवर नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं. आणि खर्चाबद्दल व दागीन्या बद्दल योग्य कोर्टात दावा आणून कोर्ट खर्च व नोटीस खर्च भरून घेण्यांत येईल तुह्मास वागविणे असल्यास लग्नाचे बायकोस फारकती देऊन मला दागीनें व कपडे खर्च देऊन वरील मुदतीत घेऊन जावे. ही नोटीस दिली आज ता० ८-४-१९१३ ई०

सही.

सहीची निशानी बजाबाई मर्द संपत
लोहार रा. मोताळा इची निशानी

नो० नं० १७ व आंगठा

## नोटीस

नोटीस बेशमी साऊ मर्द किसन कुणबी रा० वाघ खुर्द ता० आकोला पो० महान ईसः—

खालीं निशानी करणारा कडून कळविण्यांत येते कीं तुझा नवरा नामें किसन हा माझा चुलत भाऊ होता तो मैत होण्यास अजमास १५ महिने झाले त्याचे बद्दल मी तुझ्यापुढें वारस आहे. कारण माझे भावास संतती वगैरे कांहीं नाहीं. व खाण्याची मालकीन तूं पुर्ण आहेस. तूं तुझ्या हयातींत जिनगीचा उपभोग घ्यावा त्यांत आमचे लागणे नाहीं. परंतु सध्यां तूं वाईट लोकाचे नादीं लागु। कांहीं स्थावर जंगम जिनगींत अफरा तफर करणार असे समजले वरून कळवितो कीं तूं जोपर्यंत आमचे कुळांत राहशील तोपर्यंत तुझा बसून खाण्याचा अधिकार आहे. मात्र जिनगींत त्वां मुळीच अफरातफर करूंनये. केल्यास ते कायद्य प्रमाणें रद्द समजले जाईल. व त्याबद्दल सर्वपरी तुला जबाबदार धरलें जाईल. कळावे ही नोटीस दिली ता० ९ एप्रील सन १९१३ ई०

सहीची निशानी

जानजी सिदाजी कुणबी रा. वाघखुर्द
पो० महान यांची व आंगठा

नो० नं० १८

## नोटीस

नोटीस बेशमी मोहोनाजी वा॥ गुलाबसींग जात टाकोनकार रा० गोत्र तालुका आकोला जिल्हा मजकूर यांस--

खालीं सही करणार यांजकडून तुह्मांस या नोटीशीनें कळवितों कीं माझी बायको बनी ही तुमची मुलगी असून माझे घरीं गरोदर असल्यामुळें बाळांतपणाकरीतां तुह्मीं [illegible] घरीं पाठविण्या विषयीं मला व माझे [illegible] अनेक वेळां विनवणी केल्या वरून [illegible] घरीं बाळांतपणा करितां पाठविलें. बाळांतपण आटोपल्या नंतर मी व माझा बाप असें माझे बायकोला माझें घरीं घेऊन जाण्या करितां अनेक वेळां तुमचें घरीं आलों परंतु अनेक वेळां अनेक प्रकारच्या सबबी दाखविल्या आतां पर्यंत तुह्मी पाठविलें नाहीं व माझे बायकोला तुह्मी व तुमचें आप्तवर्ग वगैरे नांदण्यास माझे घरीं जाऊ नको असें सांगून माझे विषयीं दुष्ट बुद्धी तीचे मनांत भरून देऊन तीला वाईट रितीनें वागण्या विषयीं शिकवित [illegible] व तुह्मी रहात असलेल्या गांवांत [illegible] भाऊ अन्याजी हा जागल्या असल्यामुळें त्याचे बळावर तुह्मी मजला मारहाण करण्याचा विचार केला आहे. करितां या नोटीशीनें तुह्मास कळवितो कीं माझे घरांतून तुमची मुलगी तुमचे घरीं गेली तेव्हांपासून तीचें अन्नवस्त्राचा मी जबाबदार नाहीं माझे घरांतील मुल, बायका, पुरुष याचे व माझे जीवाची व तीचे स्वतःचे जिवाची व माझे जनावरांची जोखीम व इतर नुकसानीची जोखीम ह्या जोखमी तुह्मावर व तुमचे आप्तवर्गावर व तीचे स्वतःवर ठेऊन ती चांगल्या रीतीनें वागल्यास मी नांदविण्यास तयार आहे. ह्या जोखमी सर्व तुह्माला व तुमचे आप्तवर्गास व तीला कबूल असल्यास माझे घरीं १५ दिवसाचें आंत माझे डागीन्यासह आणून घालावे असें कबूल नसल्यास मोहतीराचा खर्च रुपये १५० व नुकसानी या नोटीशीचा खर्च असें मला आणून देऊन माझी पावती घेऊन दुसरा घरठाव करण्या करितां माझी फारकती घ्यावी. वरिल मुदतींत असें तुह्मी न केल्यास रीतीप्रमाणें वरील मोहतीराचा खर्च व नुकसानी नोटीस खर्च व कोर्ट खर्च व ईतर खर्च भरून घेतला जाईल. पावती व फारकती बनावट केल्यास गुन्ह्यास पात्र व्हाल. मग कोणतेही प्रकारें तक्रार ऐकली जाणार नाहीं. कळावें. तारीख ३।४।१९१३ इसवी दस्तुर यशवंत माधव पसारकर पी० रा० जिल्हा आकोला.

सही

भकुत्या वा॥ पुर्णाजी टाकोनकार
रा० गावंडगांव खुर्द तालुका
दर्यापूर हातची निशानी टाकी.

नो नं० १९

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस असे कळविले जात आहे कीं कसबे जळगाव जामोद येथें आमचा आजा नामे पांडूरंग रामचंद्र दलाल हा अजमास ४ महिन्यापासून मरणपावला असून त्याजला वारस मी व माझा धाकटा भाऊ वामनविष्णु दलाल असे दोघे नातु आहों या शिवाय दुसरे कोणीच वारस नाहीं फक्त त्याची विधवा स्त्री कृष्णाबाई ही जिवंत असून आंधळी आहे तिजला औरस संतती मुळीच नाहीं मयत व आह्मी एकत्र असून वाडिलोपार्जित स्थावर जंगम इस्टेट शेती घरें सोन्यचांदीचे डागीने वगैरे सुमारें अनामत जमेसुद्धां व शेतीचे लागवडीचे पैसे वगैरे मिळुन दोन हजार रुपयाचा माल कृष्णाबाईचे भाऊ रामकृष्ण व बापु बिन विठ्ठल बाहुळे यांनीं सर्व जंगम माल आपले बहीणीसह आमचे घरांतून तिजला मुलथाप देऊन मांडीवरतन वगैरे सुद्धां घेऊन गेले आहे व तिचे कडून राहिलेले स्थावर माल शेती वगैरे बद्दल खरेदी गहाण भाडेपट्टे दुसरें लोकांचे नावे करून देण्याचे विचारांत आहे त्याजप्रमाणें आह्मी वारस असतां आह्मास सोडून दुसरे कुळांतील कोणी दत्तक घेण्याचे विचारांत आहे तसेच मृत्युपत्र भावाचे नावे करण्याचे विचारांत आहे. करितां या नोटीशीवरुन त्यांना व इतर सेटसावकार व भाड्याने जमीन खेडू करणारे लोकांस असे कळविले जात आहे कीं ही नोटीस पावलेपासून व याचे अगोदर या इस्टेटी संबंधानें कोणीही आमचे परवानगीशिवाय या लोकांशी व्यवहार करूं नये जर यापुढें कोणि व्यवहार केल्यास आह्मी जबाबदार नाहीं आणि तिचे भावानी जो रुपये २००० चे जंगम इस्टेटी बद्दल अफरातफर केली आहे त्याचा त्यांनीं एक महिन्याचे आंत आह्मास हिशोब देऊन पावती घ्यावी तसे न केल्यास त्याचेवर रीतीप्रमाणें तजविज केली जाईल फक्त आमची आजी आंधळी असून तिचा या इस्टेटीवर कोणतेच प्रकारे आमचे परवानगीशिवाय व्यवहार करतां येत नसून हिंदुधर्मशास्त्र प्रमाणें तिजला अन्नवस्त्राशिवाय दुसरा कांहीं एक हक नाहीं व याप्रमाणें कबुल असल्यास आह्मी तिजला अन्न वस्त्र देण्यास कबुल आहोत अथवा तिजला दत्तक घेणें असल्यास माझा धाकटा भाऊ वामन याजला दत्तक घ्यावे दत्तक देण्यास कबुल आहों आमची तक्रार नाहीं यापुढे वरील तुमचे कडून कांहीं वर्तणूक न घडून आल्यास तुमचे बद्दल योग्य तजविज करून वारसाचा वरगडा केला जाईल हें पक्के समजावे कळावे तारीख २९-३-१३ इ.

सही

शंकर विष्णु दलाल द० खु०
नो० नं० २०

## नोटीस

नोटीस बेशमी रघुनाथ सदाशीव शिंपी रा. हिवरखेड रुपराव ता. आकोट यांस—

खालीं सही करणाराकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचेकडे आमचे रुपये घेणे आहेत ते मुद्दल रुपये व व्याज दोन्ही मिळून आठ दिवसाचे आंत ही नोटीस पावल्यापासून आमचेकडे आणून द्यावें. या मुदतींत न दिल्यास कोर्टखर्च व नोटीस खर्चासुद्धां कोर्टांत दावा आणून वसूल केले जातील ही नोटीस दिली ता. ९ एप्रिल सन १९१३

सही

बुधीदान लादूराम द० छागालाल
नो० नं० २१ रा० हिवरखेड

## नोटीस

चिखली इं. म. शाळेंतील पहिल्या तीन इयत्तांत अनुक्रमें १२, १३ व १९ विद्यार्थी घेण्यास नवीन नियमानुसार आज सवड आहे. येथें पाण्याची व रहाण्याची उत्तम सोय असून लवकरच बोर्डिंगही करण्याचा विचार चालू आहे. करितां ज्या विद्यार्थ्यांना येथें शिकण्यास यावयाचें असेल त्यानीं खालीं सही करणाराकडे शक्य तितक्या लवकर पूर्वींच्या शाळेंतील दाखले पाठवून अर्ज करावे. कळावें तारीख ६।४।१३ इ.

P. B. Chandekar
हेडमास्तर इं. म. शाळा
चिखली

नो० नं० २२

## नोटीस

नोटीस बेशमी विठोबा वल्द लालजी बारी रा. बाहदरपूर ता. बऱ्हाणपूर पो. बहादरपूर

खाली सही करणारी कडून नोटीस देण्यांत येतेकीं. तुम्ही माझे लग्नाचे नवरे असून लग्न होण्यास सरासरी २० वर्षें झालीं. पुढे मला १ मूल झालें व ते मृत झाले. त्यावर तुमचें मनास काय वाटले असेल ते सांगवत नाही तुम्ही गंधर्वाची दूसरी बायको केली व मला निष्कारण मारहाण वगैरे करीत होते त्यावर ती दुसरीं बायकोही वारली. तेव्हां पुन्हाः तुह्मी तिसरे गंधर्व केलें आणि मला इतका त्रास दिला कीं सुमारें २ वर्षापूर्वी माझ्या भावानें मला आपले घरी नेले त्यावर त्यानें २ दा मला तुमचे घरीं आणून घातले असतां आपण माझा स्विकार केला नाहीं. आतां २ वर्षां पासून मी माझें बापाचें घरीं आहे. तरी ही नोटीस पावल्या पासून १५ दिवसाचे आंत चांगलें तऱ्हेनें वागविण्या बद्दल पंचाची ग्वाही देऊन मला घेऊन जावें. या प्रमाणें वरील मुदतींत तुमचे कडून न झाल्यास ही नोटीस फारकती समजून मी दुसरा गंधर्वाचा नवरा करीन मग तुमचा मजवर नवरेपणाचा हक्क चालणार नाहीं कळावे ही नोटीस दिली ता. ९ एप्रील सन १९१३ ई.

सही

पार्वती मर्द विठोबा आडबालबारी
रा. खामगांव बरवारपुरा. हिचा
आंगठा व निशानी

नो० नं० २३

## नोटीस

नोटीस बेशमी छोटी मर्द पैसा जात बैरागीण रा० कसबे गहाण ता० दर्यापूर जिल्हा उमरावती इजला

खालीं सही करणार निधान वल्हद सुर्यभानजी काकड रा० मौजे सैदापूर ता० दर्यापूर जि० उमरावती याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं मजपाशीं ठेवलेली राख ह्मणून राहण्याचें कबूल केल्यावरून फूचर कोह्याबिटेशन बद्दल मी तुला सरासरी दोन अडीच महिन्या पूर्वी रकम रुपये ५०० पांचशेचा करारनामा तूं मजपाशीं दोन वर्षें स्वतंत्र रितीनें राहण्याचें कबूल केल्यावरून तुजला करून दिला. परंतु करारनामा करून दिल्यावर लागलेच एक महिन्यानंतर तूं मला सोडून देऊन दुसरीकडे स्वेच्छाचारानें राहण्यास गेलीस. व उलट मी करून दिलेल्या करारनाम्यावरून तूं मजवर दावा करण्याचे विचारांत आहेस. व त्या बद्दल मला धमकीही देत आहेस. वास्तवीक तो करारनामा कोणत्याही खऱ्या मोबदल्या बद्दल नसून दुष्कर्मा प्रित्यर्थ करून घेतला आहेस आणि ह्मणून तो बेकायदेशीर आहे सबब या नोटीसीनें तुला कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत माझा करारनामा मला वापस आणून द्यावा तसें तूं न केलें व उलट मजवर दावा करण्यास तयार झालीस तर तूं विनाकारण खर्चांत पडशील व माझेही खर्चाचा बोजा तुझेवर पडेल मग तुझी कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकिली जाणार नाहीं. सबब नोटिसीनें अगाऊ कळविलें आहे. ही नोटीस दिली तारीख ३ माहे एप्रील सन १९१३ इसवी

दस्तुर लक्ष्मण गंगाधर चितळे
रा० दर्यापूर

सही

निधान वल्हद सुर्यभान काकड
दस्तुर खुद

नो० नं० २४

## नोटीस

नोटीस बेशमी अबदुल राहिमान वा॥ हाफिज नूरमहमद व अबदुल करीम वा॥ हाफिज नूरमहमद रा० ताजनापेठ [illegible] दारपुरा आकोला यांसः-

खालीं निशानी करणारी कडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुह्मास कोर्टाचे व इतर सर्व काम करण्या करितां ४ वर्षांपासून जनरल मुखत्यारपत्र रजिष्टर करून दिलें होतें. परंतु तुमचे वागणुकींत सांप्रत फेर पडल्यानें व तुमची इच्छा चांगली नसल्यानें तें मुखत्त्यारपत्र मी आज तारखेस रद्द केलें आहे. या पुढें माझे स्थावर जंगम इस्टेटींत अफरातफर तुह्मी करूं नये. केल्यास त्या बद्दल तुह्मास जबाबदार धरलें जाईल. आज पर्यंत झालेला हिशेब मला दाखवावा व सर्व पैसे माझे मला द्यावें. नाहीं पेक्षां फिर्याद करून सर्व खर्चा सुद्धां ते वसूल केले जातील. या पुढें तुह्मी माझे नावें कोणतेंच काम करूं नये केल्यास त्याची जबाबदारी तुमचेवर असे हीं नोटीस दिली. ता० ६-४ १९१३ ई॥

सही

निशानी बनुबी मर्द शेख जंगू
रा० हातरुण तालुका बाळापूर
जि० आकोला ईचा
आंगठा असे

नो० नं० २५

वऱ्हाडसमाचार

शुद्ध ८ शके १८३५ प्रमादी

## जी वाङ्मयाचा परिणाम

ाल लोकांच्या वाचण्यांत येणाऱ्या
त्या लोकांच्या मानसिक स्थि-
आचारांशीं इतका निकट संबंध
त्या वाङ्मयाचा परिणाम त्या
व आचारावर निरनिराळ्या प्रकारें
डत असतो कीं त्या दोघांना
रणें हें मोठें दुर्घट काम आहे.
देशांत इंग्रजी भाषा समजणारें
थोडे शेकडा अडीच आहेत.
लागतांच इंग्रजी पुस्तकांला वा-
दुकान दाखविणारे व इंग्रजी वाङ्-
पूर्ण फारकत करून घेणारे यांतून
तले तर इंग्रजी वाङ्मय वाचणारे
दीड दोनापेक्षां अधिक नाहींत.
अल्पसंख्येशीं ज्या वाङ्मयाचा संबंध
ाच्या संबंधानें काय सांगण्यासारखें
चें आहे ? असें प्रथम दर्शनीं
साहजिक आहे. पण इंग्रजी वा-
इतक्या थोड्याच लोकांचा संबंध
येतो काय ! या प्रश्नाचें खरें
ह्मटलें ह्मणजे असें आहे—प्रत्यक्ष
प्रमाण शेकडा दीडदोन इतकेंच
पण अप्रत्यक्ष संबंध सगळ्या समा-
येतो. इंग्रजी वाङ्मयावर पुष्ट झा-
ामध्यें देशी वाङ्मय कांहीं थोडें
आमचीं वर्तमानपत्रें विलायती विचा-
अनुवाद करणारीं नसलीं तरी
ऱ्या व बातम्यांच्या संबंधांत इंग्रजी
ाची तीं ऋणी आहेत. शिवाय
ांचें शिक्षण बहुतेक इंग्रजी पद्ध-
झालें असल्यामुळें त्यांची विचार
ाची पद्धत व प्रतिपादनाची शैली
ग्रजांच्या अनुकरणाचीच फळें होत.
वाङ्मयाचा समाजांत विशेष प्रसार
व जे लोकांच्या चर्चेचे विषय
बसतात असे ग्रंथ ह्मणजे कादं-
व नाटकें होत. आमच्या मराठींतल्या
न्यांपैकीं शेकडा ९८ चा उगम
वाङ्मयाशीं प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष
आहे हें सहज दाखवितां येईल.
गोष्ट नाटकांची. आमच्या रंगभूमीवर
गाऱ्या चंद्रसेन, वीरसेन, जाधवराव,
का, विशाखा, दुर्गा, इ० भूमीका
आणि त्यांच्या तोंडावरचा पारदर्शक
काढून न्याहाळून पहा ह्मणजे
न तुह्मांला रोझालिंड, बसानियो,
ट, लेडी मार्गरेट, वगैरे विलायती
रुष प्रच्छन्नरूपानें आढळतील. आगगा-
होटेलें, आफिसें, वगैरे संस्थांशीं
च्या समाजाशीं संबंध येऊं लागल्या-
न त्यांच्या द्वारें ही पुष्कळ नवे नवे
र व प्रचार आमच्या समाजांत प्रविष्ट
. हे नवे विचार व प्रचार मुळचे
त्य समाजांतले अर्थात इंग्रजी वाङ्म-
होत. अशा रीतीनें इंग्रजी वाङ्म-
यानें आमच्या समाजावर चोहोंकडून हल्ला करून त्याला पादाक्रांत करून टाकिलें आहे.

इंग्रजी वाङ्मय हें एकंदर पृथ्वी व्यापणाऱ्या, कोट्यावधि लोकांवर प्रभुत्व गाजविणाऱ्या, कर्तृत्वाऐवजानें महशूर आणि पार्लमेंटसारख्या लोकसत्ताक संस्थांस प्रसवणाऱ्या प्रबळ राष्ट्राचें वाङ्मय आहे. या राष्ट्राला जें येवढें वैभव त्याच्या कर्तृत्वानें प्राप्त झालें त्याचें बीज त्या वाङ्मयांत मुळचें असलेलें पाहिजे यांत शंका नाहीं, आणि ह्मणूनच निबंधमालाकारासारख्या उज्वल लेखकानीं या वाङ्मयाला अर्थात् इंग्रजी शिक्षणाला ‘ वाघिणीचें दूध ’ अशी संज्ञा यथार्थ रीतीनें दिली होती. या इंग्रजी वाङ्मयाचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष असा पुष्कळ परिणाम आमच्या समाजावर होत आहे. इंग्रजी शिक्षण आमच्या इकडे सुरू होऊन अर्धशतक सहज होऊन गेलें येवढ्या अवधींत हा परिणाम निरनिराळ्या प्रकारें आमच्या समाजांत दिसूं लागला आहे. त्याचें पर्यालोचन करणें हें समाजाच्या कर्तव्याच्या व हिताच्या दृष्टीनें जसें अवश्य आहे तसें जिज्ञासूच्या दृष्टीनें ही तें लाभकारक आहे. ह्मणून पुढील अंकापासून या विषयाचें यत्किंचित् दिग्दर्शन करण्याचा विचार आहे. ज्यास्त विस्तार पूर्वक विचार करणें हें वर्तमानपत्राच्या संपादकाच्या कर्तव्यकक्षेंत येत नाहीं. तो समाजशास्त्रावरील ग्रंथकाराचा अधिकार आहे. ह्मणून याविषयाचें विवेचन सूत्रपद्धतीनेंच करण्याचा संकल्प आहे.

---

## एका शास्त्रज्ञाचे विचार

आमच्या देशांत शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार अतिशय मंद गतीनें होत आला आहे. इंग्रजी पेहराव, इंग्रजी खाद्यपेय सेवन, इंग्रजी नाटकें कादंबऱ्यांचें अनुकरण, इंग्रजी धार्मिक व सामाजिक संस्थाची हुबेहुब नक्कल उठविणें वगैरे बाबतींत आह्मी सर्व तऱ्हेनें पुढें असतां शास्त्रीय शिक्षणाचे बाबतींतच आमचा देश इतका मागें कसा हा एक विचार करण्या सारखा प्रश्न आहे. या प्रश्नाचें उत्तर कलकत्त्याचे प्रसिद्ध शास्त्रज्ञ डा० पि० सी० राय हे असें देतात कीं शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार करणें ही गोष्ट एक तर इंग्रजी नाटकें कादंबऱ्यांचा अनुवाद करण्या इतकी किंवा इंग्रजांचा चवचालपणा आपणास कितपत साधतो हें अजमावून पाहण्या इतकी सोपी नाहीं. शिवाय दुसरी गोष्ट ती सद्यःफलदायी ही नाहीं. शास्त्रीय विद्या अर्थकरी होते; पण केव्हां! तर तिच्या आराधनेंत तपेंची तपें चालविल्या नंतर पण या पुढच्या अशेवर तिची एकनिष्ठ सेवा करण्यास फारच थोडे लोक तयार असतात. विश्वविद्यालयांतून दरसाल शेकडो बी० एस. सी० व एम० एस० सी० असे शास्त्रीय पदवीधर बाहेर पडतात खरे, पण टेटच्या नकली हिऱ्यासारखे हे आमच्या युनिव्हर्सिटीचे नकली अलंकार होत. आमच्या लोकांत उद्योग धंद्यांची वाढ होईल तेव्हां हे लोक कांहीं कामास आले तर येतील. पण औद्योगिक उत्कर्षाचा काळ येण्यास शास्त्रीय शोधासाठीं जीवाचा ही बळी देण्यास तयार असे लोक पाश्चात्याप्रमाणें आमच्या देशांत निघाले पाहिजेत. कार्यं वासाधयेयम् देहं वा पातयेयम् अशा कृत निश्चयाचीं माणसें निघाल्याशिवाय उद्योगधंद्याच्या तीव्र स्पर्धेत आमचा टिकाव लागणार नाहीं. इंग्लंडच्या लोक शिक्षणांत कोण कोणत्या विषयांचा समावेश व्हावयास पाहिजे या संबंधानें हर्बर्ट स्पेन्सर यांनीं एक टांचण प्रसिद्ध केलें आहे त्यांत शिक्षणाचे विषय त्यांच्या महत्वाच्या अनुक्रमानें दिले आहेत. ते असे:— आरोग्यविद्या, ( मानसिक व शारीरिक असे दोन्ही प्रकारचें आरोग्य या शद्बांत गर्भित आहे. ) दुसरें शिल्प शिक्षण, व याच्या मागून ललितकला वगैरे शिल्प शिक्षणाला अर्थात शास्त्रीय शिक्षणाला स्पेन्सर साहेबांनीं अग्रपूजेचा मान दिला आहे तो यथायोग्यच आहे. आपल्या देशांत आज पर्यंत जें कांहीं थोडेबहुत शास्त्रीय शिक्षण मिळत गेलें तेंही फलदायी झालें नाहीं याचीं कारणें डा० राय यांच्या मतें तीन आहेत. पहिलें कारण, सरकारच्या शास्त्रीय खात्यांत काळ्या लोकांचा प्रवेशच झाला नाहीं, अर्थात जीर्णमंत्रे सुभाषितम, या ह्मणी प्रमाणें प्राप्त करून घेतलेलें शास्त्रीय ज्ञान त्याचीं परिक्षा पाहण्याच्या प्रसंगाच्या अभावीं अगांतल्या अंगांतच जिरलें. दुसरें कारण देशी भाषेच्या द्वारें शिक्षण देण्याच्या पद्धतिचा अभाव. इंग्रजींतून शिक्षण दिल्यामुळें तें संकुचित पात्रांत राहिलें. त्याचा विकास व प्रसार झाला नाहीं. तिसरें कारण, आमच्या भाषाशिक्षणामुळें विद्यार्थ्यांच्या अंगीं पडलेली एक प्रकारची विचार सरणी. भाषा शिक्षणांत स्मरण शक्तिची वाढ ही मुख्य गोष्ट असते. अवलोकनाचें प्रयोजनच नसतें. तीच संवय बालपणापासून आमच्या विद्यार्थ्यांना जडल्यावर त्यांचे अंगीं अवलोकन शक्ति येणार कशी? डा. राय यांनीं ही दिलेलीं कारणें योग्य नाहींत असें कोण ह्मणेल?

---

## बुद्धिमत्तेचें प्रमाण.

‘ मॉडर्न रिव्ह्यू’च्या एप्रिलच्या अंकांत निरनिराळ्या देशांतल्या लोकांच्या बुद्धिमत्ते संबंधानें एक अत्यंत परिशीलनपूर्वक लिहिलेला लेख आलेला आहे. मि० जॉन ग्रे यांनीं जगांतल्या निरनिराळ्या युनिव्हर्सिट्यांची माहिती एकत्र करून शास्त्र, कला, राजनिति, वाङ्मय, ई० विषयांतल्या प्रावीण्यावरून व लोकसंख्येच्या मानानें शेंकडा किती लोकांना शिक्षण मिळत आहे त्यावरून त्या देशच्या एकंदर लोकांच्या बुद्धिमत्तेचे प्रमाण ठरविलें आहे. बुद्धिमत्तेचे दोन भाग त्यांनीं केले आहेत. ह्मणजे नैसर्गिक बुद्धिमत्ता व ती वाढविण्याचे प्रसंग दहा हजार लोक संख्या घेतली तर त्यांतून युनिव्हर्सिट्यांतून शिकणारांची संख्या निरनिराळ्या देशांत येणें प्रमाणें आहे. अमेरिका ११०, स्वित्झर्लंड १००, फ्रान्स ७२, जर्मनी ४७, ब्रिटन ४७, आस्ट्रिया ४६, हिंदुस्थान ४६, हॉलंड ३४, बेल्जयम ३०, हिंदुस्थानांत कॉलेजाची तर काय, पण शाळांची सुद्धां संख्या इतकी अल्प आहे कीं जेथें एकही शाळा नाहीं अशी खेडीं इकडे अनेक आहेत. असें असून आह्मी बुद्धिमत्तेचें प्रमाण बरेंच उच्च राखिले आहे हें ध्यानांत घेण्यासारखें आहे. आमच्या इकडे इतर कित्येक देशाप्रमाणें शिक्षणाची साधनें भरपूर व मुफत असतीं तर या बाबतींत हिंदुस्थानचा नंबर सर्वांच्या वर निःसंशय लागला असता. आतां बुद्धिमत्ता वाढविण्याचें प्रसंग इतर देशांचे मानानें आह्मास किती मिळतात तें पाहूं. पुढील आंकडे एक हजार लोकसंख्येच्या मानानें युनिव्हर्सिट्या व शाळा यांतील विद्यार्थ्यांचें प्रमाण किती आहे त्या बद्दलचे आहेत:- अमेरिका २९४, बेल्जयम २१६, स्वित्झर्लंड १९९, ब्रिटन १८२, हॉलंड १८१, स्पेन १२७, इटली १०४, पोर्तुगाल ३३, व हिंदुस्थान २२. यावरून हिंदुस्थानच्या लोकांना बुद्धिमत्ता वाढविण्याचें अनुकूळ प्रसंग साऱ्या जगांतल्या लोकांपेक्षां कमी येतात हें उघड झालें. असें असून हिंदुस्थानच्या लोकांच्या बुद्धिमत्तेचें प्रमाण वर सांगितल्या प्रमाणें उच्च आहे ही आश्चर्य करण्या सारखी गोष्ट नाहीं काय ! पण असल्या कौतुक आह्मी स्वतःच करावें तेव्हां !

---

## हिंदुलोकांचा छळ.

दक्षिण आफ्रिकेंतल्या हिंदी लोकांचें दुष्टचर्य अजून संपलें नाहीं असें दिसतें. ना० गोखले यांच्या सफरीपासून होणारा सुपरिणाम केव्हां दिसूं लागेल तो लागो, पण अजून तरी हिंदी लोकांचा छळ करण्याच्या नानाप्रकारांत दिवसानुदिवस भर पडत आहे. हिंदी लोकांच्या बायकांना इकडून तिकडे जाऊं देत नाहींत. पण तेथल्या तेथें सुद्धां कायदेशीर रीतीनें झालेला विवाह कोर्ट मान्य करील कीं नाहीं अशी शंका घेण्यास नुकतेंच कारण झालें आहे. हिंदी लोक बहुपत्नीकत्वाच्या विरुद्ध नाहींत, येवढ्याच कारणावरून त्यांचा विवाह कोर्टानें अमान्य केल्याचें एक उदाहरण नुकतेंच घडलें आहे. हिंदी ह्मणून मग तो हिंदु असो किंवा मुसलमान असो, त्याच्या स्थितीचा विचार स्थानिक कायद्यानें न करतां हिंदुधर्मशास्त्र किंवा मुसलमानी धर्मशास्त्राच्या दृष्टीनें करावयाचा असतो. हें कायद्याचें सर्वमान्य तत्व बाजूला ठेवून हिंदी माणसाला ख्रिस्ती राष्ट्राचा धर्मविषयक कायदा लागूं करणें ही ढोबळ चूक आहे. ही चूक वेळींच दुरुस्त न केल्या आफ्रिकेंतल्या सगळ्या हिंदी रहिवाशांचे विवाह घेनाच्या एका फटकाऱ्या सरसे बेकायदेशीर ठरण्याचा संभव आहे. नवीन येणारें बहुपत्नीक असल्यास त्यांना हवें तर न येऊं देण्याविषयींचा नियम करा, पण जे आज कित्येक वर्षे येऊन स्थाईक झाले आहेत ते ख्रिस्ती धर्मी नसतां त्यांना ख्रिस्तीधर्मशास्त्राचें तत्त्व लागूं करूं पाहणें व त्या तत्वाच्या कसोटीला ते न उतरल्यास त्यांना शिक्षेला पात्र ठरविणें हा न्याय कोठचा ?

---

## बंगीय साहित्य परिषद

ही संस्था आज अनेक वर्षांच्या अनुभवानें चांगली कर्तृत्ववान झाली असून लोकप्रियता व सरकारची मर्जी दोन्ही संपादण्यांत तिनें पूर्ण यश मिळविलें आहे. तिची स्वतःची भव्य ईमारत, तिचा दांडगा ग्रंथसंग्रह, व ग्रंथप्रकाशनाचा उद्योग, व सभासदाची मोठी संख्या ही पाहिल्यानी अनुकूळता दर्शवितात, तसें अधिकाऱ्यांच्या तोंडून वेळोवेळीं निघणारें प्रशंसोद्गार व त्यांच्या हातें होणारें द्रव्यसाह्य हीं दुसऱ्यांचा निदर्शक होत. या परिषदेच्या ग्रंथ प्रकाशनास व त्रैमासिकास मदत ह्मणून बंगाल सरकारनें वार्षिक १२०० रुपयांची वृत्ती या संस्थेला नुकतीच दिली आहे. साहित्योन्नतीच्या कामीं साह्य करण्यास सरकार नेहमीं उत्सुक असतें. योग्य मार्गानें तें मिळविण्याची खटपट मात्र केली पाहिजे व आस्था दाखविली पाहिजे ह्मणजे तें मिळतें. मुंबई सरकार कडून रा. ब. पारसनिसांच्या 'इतिहास संग्रहा'ला व प्रो. रानडे यांच्या इंग्रजी—मराठी कोशाला बरीच चांगली मदत झाली आहे. बंगाल सरकारनें तर कित्येक चांगल्या प्रतिभासंपन्न व उद्योगशाली ग्रंथकर्त्यांना वर्षासनें करून दिलीं आहेत आमच्या वऱ्हाड प्रांतांत इतके पदविधर विद्वान असतां सगळे द्रव्यार्जनाच्या नादीं लागावे व साहित्यसेवेला एकनिष्ठपणें लागले का एकही विद्वान दिसूनये ही खेदाची गोष्ट आहे. पण असा एखादा, साहित्य—सेवक निघाला तर त्याला सरकारी साह्याची वाण पडणार नाहीं अशा आमची खात्री आहे.

---

## हिंदुस्थानांतला साखरेचा धंदा.

हिंदुस्थानांत साखरेची पैदास व आयात हीं दोन्ही अपूर्व आहेत. सरकारी अंदाजपत्रकांवरुन असें कळतें कीं दरसालपेक्षां यंदाचे वर्षी साखरेची पैदास १ लक्षटन अधिक होईल. गेल्या पांच सालांचे आंकडे पाहिले तर या मुदतींत ही पैदास शेंकडा २० या प्रमाणानें वाढली आहे. शुभवार्ता आहे यांत शंका नाहीं. सरकारी अधिकाऱ्यांचें व शेतकऱ्यांचें लक्ष उसांची लागवड सुधारण्याकडे विशेष लागलें आहे ही संतोषाची गोष्ट आहे. आश्चर्य हें आहे कीं साखरेची पैदास यंदा आमच्याच देशांत वाढली आहे असें नाहीं. तर फ्रान्स, जर्मनी, मॉरिशस बेटें व वेस्ट इंडिज बेटें, सगळ्याच ठिकाणीं ही वाढ आहे. जर्मनींत तर हें वाढीचें प्रमाण बरोबर दुप्पट झालें आहे. तेव्हां अशा स्थितींत आमच्या देशांत उत्पन्न होणारी साखर परदेशी साखरेच्या स्वस्तपणा पुढें कशीकाय टिकाव धरते ही एक काळजी करण्यासारखीच गोष्ट ह्मटली पाहिजे - परदेशी मालावर जकात बसविल्याखेरीज आमच्या देशी साखरेच्या उद्योगाला कधीं उत्तेजन यावयाचें नाहीं ही गोष्ट रोजच्या व्यवहारावरून सिद्ध होत आहे व रा. सहस्त्रबुद्धे यांचे सारखे परदेशीं जाऊन तेथील व्यापारी स्थिति सुक्ष्मपणें निरखून आलेल्यांचे ही तेंच ह्मणणें आहे. थोडीशी झीज सोसून ही देशी मालाला उत्तेजन देण्याचे व्रत कागदावर मांडण्याला मोठे गोड आणि मोहक आहे. पण प्रत्यक्ष व्यवहारांत तें अगदीं कुचकामाचें ठरलें आहे - पण जर सरकार परदेशी साखरेवर जकात बसविण्यास तयार नसेल तर देशी साखरेचा धंदा जिवंत ठेवण्यासाठीं वरील अव्यवहार्य व्रताला दृढ निश्चयाच्या पाठबळानें व्यवहारिक स्वरूप देणें हें हिंदुस्थानच्या हितचिंतकांनीं एक अवश्य कर्तव्य मानिलें पाहिजे.

---

## हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकार

हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकार यांच्यांतले सध्याचे संबंध फिरवून कांहीं कांहीं बाबतींत प्रांतिक सरकारांना पूर्ण स्वतंत्र अधिकार प्राप्त झाल्यावांचून राज्य कारभारांतल्या कित्येक अगदीं जरूरीच्या सुधारणा होणार नाहींत असें लक्षण दिसते. शिक्षणाचीच गोष्ट घ्या. या कामासाठीं हिंदुस्थानसरकार भरपूर पैसा देत आहे. पण या देणग्या अशाच दरसाल उदार हस्तानें मिळतील असा भरंवसा नसल्यानें प्रांतिक सरकार शिक्षणाच्या बाबतींतला कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर आखून घेण्यास धजत नाहींत. बरें, हिंदुस्थानसरकारनें तो आखून द्यावा तर त्यांना प्रत्येक प्रांताच्या विशेष गरजा माहीत नाहींत. यामुळें शिक्षणाच्या सुधारणेसारखें महत्त्वानें कार्य अडल्यासारखें झालें आहे. हिंदुस्थानसरकारानें मेहेरबान होऊन देणग्या देण्याच्या पद्धतीपेक्षां अमुक कार्यासाठीं अमक्या बाबीचें उत्पन्न अशी उत्पन्नें प्रांतिक सरकारांना तोडून दिली, व तेवढ्या बाबतींत ठरलेल्या रकमेच्या आंत हवा तसा खर्च करण्याची जबाबदारी त्यांच्या अंगावर टाकली तर पुष्कळ अधिक कार्य होईल. प्रांतिक सरकारी अधिकाऱ्यांना हिंदुस्थान सरकारच्या तोंडाकडे सालोसाल पहावें लागणार नाहीं, व हिंदुस्थान सरकारला ही कोणी कार्यक्रम मागितल्या बरोबर भांबावून जाण्याचें कारण पडणार नाहीं.

---

## पत्रव्यवहार.

### उदार मतांचा प्रसार

### आमचें चुकतें तें हेंच

आजकाल सर्व सुधारलेल्या राष्ट्रांतून, बहुतेक उदार मत वाद्यांचीच सरशी होत आहे हें निरनिराळ्या राष्ट्रांच्या घडामोडीचा प्रस्तुत इतिहास वाचून व मासिकांतून आणि वर्तमानपत्रांतून तद्विषयक होणाऱ्या उहापोहावरून साधारण वाचकांस देखील कबूल करणें भाग आहे. असल्या सर्वमान्य मताचे जनन प्रथमतः सुधारणेचें व स्वातंत्र्याचें माहेरघर जें इंग्लंड तेथेंच झालें असें तद्देशीयांचे ह्मणणें आहे. रानिमीड येथें जॉन राजास म्याग्नाकार्टाचें साखळदंडानें बद्ध करण्याऱ्या ब्यारन्सना अथवा पहिल्या चार्लसास फाशावर चढविणाऱ्या राऊंड हेडास किंवा दुसऱ्या जेम्स राजास हाकून देऊन तिसऱ्या विल्यमास तक्तनशीन करणाऱ्या व्हिग लोकांस ही उदार मत वादांचीं तत्वें समजलीं होती किंवा नाहीं याची वानवाच आहे. तरी इंग्लंडच्या उत्कृष्ट राज्य रचनेची ( Constitution ) इमारत उदार तत्वाच्या [ liberalism ] भक्कम पायावर प्रथम पासूनच उभारली आहे असें ह्मणणारांचें तोंडास आळा कोणी घालावा! तें कांहींही असो परंतु एवढें मात्र खरें आहे कीं ज्या तत्वाच्या जोरावर आज स्पेन सारख्या व चीन सारख्या जुनाट राष्ट्रांच्या राज्य पद्धतीनें एका दिवसांत रुपांतर केलें असल्या त्या जोरदार तत्वांना सन १८३२ सा नंतर लवकरच इंग्लंड देशांत मूर्त स्वरूप मिळालें होतें. व्हीगपक्षाच्या लोकांनीं पार्लमेंट रचनेची सुधारणा करून जेव्हां धिटाइनें अत्यंत उदार होऊन हलक्या दर्जाच्या लोकांस देखील राज्य व्यवस्थेंत ढवळाढवळ करण्याची मुभा दिली, तेव्हां त्यांचे प्रती पक्षी जे टोरी मंडळ त्यांनीं ही खवळून जाऊन फ्याक्टरी बिलचें रुपानें मजूरवर्गास उचलून धरलें व तेव्हां पासून इंग्लंडांत खरें स्वातंत्र्य प्रगट झालें व तेव्हां पासूनच असल्या स्वातंत्र्याचें समर्थन करणाऱ्या उदार मत वाद्यांच्या उत्कर्षास सुरुवात झाली. तसेच ह्या मताचें उत्तरोत्तर पाऊल पुढेंपुढेंच पडत गेलें आहे हें आपणास नंतर पार्लमेंट पुढें येणाऱ्या एकएका बीलाचें स्वरूप वरून समजून येईल. आज पर्यंत असल्या सुधारणेनें इंग्लंडचा एक सारखा उत्कर्षच होत गेल्या मुळें त्या सुधारणेचें जें मूळ उदार मत ( liberalism ) तें ग्राह्य व सर्वतोपरी हितावहच असलें पाहिजे यांत शंका नाहीं.

उदारमत उदारमत ह्मणजे काय व ते आह्मीहि मान्य कां केलें पाहिजे हें येथें सांगणें जरूर आहे. सुधारणा आणि प्रगती ही उदार मत वाद्यांचीं दोन मुख्य कर्तव्यें होत. पुरातन तेवढें चांगलें असें ह्मणणारांस जगांत भाग्यदशा कधींही येणार नाहीं. तसेंच जेथें पुराण मार्ग चुकत असेल तेथें लागलीच सुधारणा करून हितकरनें पुढल्या पायरीवर पाऊल टाकण्यास तयार असलें पाहिजे नाहींतर नुस्ते जुनें तेवढें सुधारून त्यांत जर त्यानें नवीन गरजांची भर घातली नाहीं तर पुढें चाललेल्या जगाच्या तो मागेंच रहाणार व त्याची स्थिती 'अंतराळे त्रिशंकुरिव' होऊन तो जुन्यांस व नव्यांस दोघांसही मुकेल उदार नीती आपणास असें शिकवितें कीं राज्यव्यवस्था साधारण लोकांच्या हातींच असली पाहिजे. तीचा लक्ष्मी पुत्राचे हातांत असल्यानें दुरुपयोग होतो व न्याय राहत नाहीं. गर्भ श्रीमंताना अनायासानें व सहज मिळालेलें हक्क गैरवाजवी सबब अप्रशस्त होत ह्मणुन तें त्यांचेपासून काढून घेऊन त्यांची साधारण लोकांत वाटणी करावी व अशा तऱ्हेनें सर्वांस सारखेंच सुख मिळावें आतां आपणास अशा तऱ्हेचें मत पसंत असले पाहिजे. नव्हे काय? कारण जर आपण आपल्या जुन्यारीतीस सोडलें नाहीं व केवळ गतानुगतिक होऊन आपल्या पूर्वी होऊन गेलेल्या लोकांचीच जर आपण री ओढली तर त्यांनीं जें केलें तेंच आपण करूं. त्यानीं आपणास ह्मणजे त्यांच्या पुढल्या पिढीस पारतंत्र्याच्या गुलामगीरीच्या सुवर्णाच्या कां होईना परंतु शृंखलांनीं आपल्या हातानें बद्ध केलें आहे व आपण जर आपल्या पूर्व गामी लोकांचें अनुकरण करूं तर आपणही आपल्या पश्चात् येणाऱ्या पिढीचें नुकसान करणार नाहीं काय? सारांश कायकी आपल्या जेथें चुका झाल्या आहेत त्या शोधून काढा आणि त्या सुधारण्यास मागें पुढें पाहूं नका. आंग्लकवी लॉंगफेलो ह्मणतो—

Let us be up and donig
With a heart for any fate
Still a chieving still pursuing
Learn to labonr and to wait.

उदार नीतीचें जें दुसरें तत्व कीं श्रीमंतांचें हक्क आज साधारण लोकांनीं आपल्या हातांत घ्यावें हेंही बरोबर आहे. आज आपणावर जे अधीकारी आहेत ते फार थोर लोक आहेत तरी पण त्यांचे पदवीस आपण आपल्या कृतीनें पोहोंचावें अशी आकांक्षा आपण आपले मनांत बाळगावयास नको काय? अधीकाराचा मक्ता एका विशिष्ट प्रकारचें वर्गाकडे राहिल्यास त्या पासून देशाचें अनहित होईल. तेंच जर ज्यांच्यावर अधीकार चालवावयाचा त्यांच्याच पैकीं कांहीं लोकांनी तो अधीकार कांहीं नियामित मुदतीपुरता आपले हातांत घेतला तर त्यांस त्या अधिकारांतील दोष अधिक माहीत असल्याकारणानें ते काढून टाकून ज्यास्त चांगल्या तऱ्हेनें तो अधीकार बजावतां येईल हें कोणाही सूज्ञ मनुष्यास सहज समजणार आहे. सारांश कायकीं आपणास सरकारपासून उपारिनिर्दिष्ट असें पुष्कळ हक्क मिळवावयाचे आहेत व ह्मणूनच आपण उदारमतांचा अवलंब केला पाहिजे. असो येथवर आह्मी उदार मतांचा प्रादुर्भाव इंग्लंड देशांत कसा झाला व तो लवकरच सर्व मान्य होण्यांस त्यांच्या मुळाशीं असलेल्या सुधारणा व प्रगति अशीं बळवत्तर दोन गूढतत्वांनीं त्यांस कशी मदत केली ह्याचें विवेचन केलें. आतां प्रस्तुतच्या लेखांत ह्या उदार मतांचा व्यवहारांत उपयोग करतांना आपण कोठें चुकतों हें आपण पाहूं.

सांप्रतकाळीं पाश्चात्यांची सुधारणा हाच आपल्या इकडे होणाऱ्या सुधारणेचा कित्ता असल्यामुळें आपण त्याची पूर्ण सुधारणा होण्या पूर्वीच्या त्यांच्या इतिहासाचें बारकाईनें मनन केलें पाहिजे. राज्यव्यवस्थेसारख्या नाजूक रवीनें जवळ जवळ दोन शतकें पर्यंत राष्ट्रोदधी मंथन करून उदारमतरूपी नवनीत गोळा करण्यां पूर्वी सुधारणा व स्वातंत्र्यप्रीय इंग्लंड देशातील जहाल व मवाळ पक्षांना अनेक वेळा अडवे तिडवे वळसे घ्यावे लागले, ही गोष्ट आपण विसरतां कामा नये. जेथें सुधारणेच्या व प्रगतीच्या बाबतींत इतर सर्व राष्ट्रांना मागें टाकणाऱ्या इंग्लंड देशासारख्या बलाढ्य राष्ट्राची ही स्थिती, तेथें नानाविध दोषानीं परिपुरित व व ह्मणून मागसलेल्या अनेक परचक्रांनीं जर्जर झालेल्या व शतकांची शतकें पारतंत्र्यांत मग्न असलेल्या आमच्या हिंदुस्थान देशाची गोष्ट बोलावयासच नको. 'पुढच्यास ठेंच मागचा शहाणा;' दुसऱ्यांनीं केलेल्या चुकांनी आपण पुनरावृत्ती करणें शहाणपणाचें

र नाहीं. आतां एवढें मात्र खरें कीं ड देश तो इंग्लंड देश, कारण तेथल्या ळ ( whigs ) आणि मवाळ ( Tory ) त दोन शतकें पर्यंत टिकणाऱ्या बंदकीच्या वादांतून अखेर तत्वबोध । परंतु आपल्या हिंदुस्थान देशाची स्थिती निराळी आहे. दोन शतका नंतर होईना परंतु जहाल व मवाळ ह्या पक्षाचें एकमत झाल्याबरोबर त्या ऱ्या विस्तारावर कधीही न मावळणाऱ्या ारायणाचें तेज अधीकच झळकूं लागलें.

आमच्या देशाची स्थीती पहा. पराक्रमी ा साम्राज्याचा हिंदुस्थानांत सर्वत्र प्रवेश न जेव्हां आमच्या गैर समजुती व ची बेबंदशाही, त्या पुण्यश्लोक पाश्चा- ी आमच्या दैनावस्थेची कीव करून यत्नानें हाणून पाडली, आणि जेव्हां चें सर्वतोपरी कल्याण करण्याच्या तीव्र नेनें प्रेरित होऊन आह्मांस आपले कडील क्षणांचा लाभ करून दिला तेव्हां त्यांच्या आधिभौतिक सुधारणेनें थक्क आमच्यांतील अठरापगड विद्वान, च स्थापन करून दिलेल्या राष्ट्रीय ा मंडपांत एकत्र जमूं लागले. थोड सांगावयाचें ह्मणजे इंग्रेज लोक च्या पायावर उभें राहावयास प्रथम नच शिकले व आह्मी अद्यापीही दुस- या ओंजळीनेंच पाणी पिणारे आहोंत . राष्ट्रीय सभेच्या वीस बावीस बैठका न देखील सरकार आपणास अद्यापी व्यवस्थेच्या हलक्या सलक्या अधिकाराची आपलें हातीं घेण्यास आह्मी अपात्र ांत असें ह्मणतें ह्मणून आमच्यांतील अधीक ही व अधीक उद्योगी लोकांचे मन झालें व त्यांनीं राष्ट्रीय सभेच्या केवी- ऱ्या पोकळ विनवण्या करून सरकार ही तुष्ट होणार नाहीं असें ठरविलें लोकजागृती करून उद्योगधंदे वाढवून ची भरभराट केल्यानें सरकारास आपल्या ागारीचा दाखला पटेल व नंतर सरकार णास इच्छित हक्क आनंदानें देईल असें मनानें घेतले. त्यांनीं दयाळु सरका- पोकळ विनवण्या करण्याचा व निसत्व ना करण्याचा असा मुळमुळींत मार्ग न देऊन वर दाखविल्या प्रमाणें स्वा- नाचा व लोकाश्रयाचा जोरदार मार्ग ा ह्मणून त्यांस जहाल नांव प्राप्त . एवंच काय कीं आमच्या देशांतील य प्रगती करणाऱ्या जहाल व मवाळ दोघांही पक्षांचे अंतिमसाध्य एकच न केवळ साधनभिन्नत्वात् त्यांचें दोन झाले आहेत. जों पर्यंत या दोन्ही चे लोक आपपर हा भाव न ठेवतां जहाल व हा मवाळ हा भेद मनांत आणतां आणि एक जुटीनें काम करीत तों पर्यंत आमच्या राष्ट्राची सुधारणा प्रगती ही दोन्ही आता इतकीच नेट नें ळीं होती शिवाय आपसांत तंटेबखेड्यांचे ण नव्हतें. एवढें मात्र खरें आहे कीं, ल मंडळी, आपल्या सहकारी मवाळ पासून भिन्न राहावयास लागल्या न सामान्य लोकांत देखील एक प्रका- जागृती उत्पन्न झाली व तेही आपल्या मेंदूच्या शक्तीच्या बाहेरचें काम अनूनही राष्ट्रप्रगती व राष्ट्र सुधारणा करावयास झटूं लागलें.

लोकांत जागृती उत्पन्न व्हावी व तेणें करून देशाची सांपत्तिक व औद्योगीक दृष्ट्या भरभराट व्हावी हें कोणाही समंजस मनुष्यास इष्टच वाटेल. इतकेंच नव्हे तर लोक जागृतीचें मुख्य साधन जें लोक शिक्षण तें देखील राष्ट्रप्रगती व राष्ट्रसुधा- रणा यास हितावह होईल अशाच धोरणानें दिलें जावें हेंही वाजवी होय. असल्या तऱ्हेच्या शिक्षणाचें बाळकडू राष्ट्राची भावी पीढी अज्ञ दशेंत असतांच तीस पाजण्याचें राष्ट्रांतील समंजस व सुशिक्षित लोकांचें कर्तव्य होय सारांश काय कीं लोकजागृती झाल्यानंतर उदारमतवाद्यांच्या उच्च तत्वानुरूप सामान्य जनांनीं देखील राष्ट्रप्रगती व राष्ट्रसुधारणा या सारखीं महत्वाचीं कृत्यें आपले हातांत घ्यावीं परंतु त्यांस आधी उदारमताचें मर्म समजून घ्यावयास नको काय? व हें मर्म समजावयास त्यांची शिक्षण द्वारा प्रथम पासून पूर्व तयारी करावयास नको काय?

परंतु असल्या पूर्व तयारीचें अभावीं उदारमताचें खरें मर्मन समजल्यामुळें जहालांनी ज्वलज्जहाल बनून मवाळास त्रिज्ञत मवाळ करून त्यांच्यावर शिव्या शापांचा अद्वातद्वा भडि- मार केल्यानें राष्ट्र सुधारणा व राष्ट्र प्रगती न होता राष्ट्राचे भरभराटीस कारणीभूत अशा कित्येक संस्थांचा आजपर्यंत अल्पस- मजुतीनें नायनाट झाला आहे व अशीच स्थिती राहिल्यास ह्या ज्वलज्जहालांच्या व विक्षत मवाळाच्या परस्पर मोहिमा मध्यें सर्व राष्ट्रहित लयाला जाईल हें आह्मीं सांगावयास पाहिजे असें नाहीं.

उदार चरिताचा मक्ता आपणाकडे घेऊन आमच्यांतील माथेफिरु ज्वलज्जहाल व निःसत्व मवाळ हे एकमेकास सारखे पाण्यांत पहात असतात व आमचे चुकतें तें हेंच कीं आह्मी ह्या माथेफिरु ज्वलज्जहालास तत्वानु- संधान तत्पर जहाल समजतों आणि ह्या निःसत्व मवाळाची खऱ्या राष्ट्रहित तत्पर मवाळांमध्यें गणना करतों. अर्थातच असल्या माथेफिरु व निःसत्व लोकांसच चुकीच्या भावनेनें प्रेरित होऊन चित्तभ्रम झालेले आह्मी व आमचें सरकार उदारमतानुरूप राष्ट्रहित साधणाऱ्या निरंकुश व सत्यप्रतिज्ञ अशा जहाल व मवाळांचें उच्च पदवीस चढवितों, तेणेंकरून त्या उच्चास्थानापन्न असलेल्या सत्वशील उज्वळ लोकांच्या, खऱ्या 'राष्ट्रहि- तकर्तीचें नामधारी अज्ञ वर्गबंधूंच्या सहवासानें किती हिडिस रूपान्तर आपणास दाखवि- ण्यांत येतें, व असें झाल्यानें त्या वदान्य आणि राष्ट्रहिततत्पर लोकांचें सरकारांत तेज कसें पडत नाहीं हें आपण आज वर पहात आलों आहोंत.

आतां या ज्वलज्जहाल व निःसत्व मवाळाचें कंपूत बहुधा अज्ञ जनाचीच भरती असतें हें आपणास दिसून येईल. राष्ट्रहित साधण्यास अथवा राज्यव्यवस्थेचा उहापोह करण्यास ते सर्वथैव अपात्र अस- तात. केवळ उदारतत्वांच्या जोरावर अस- ल्या सामान्य जनसमूहानें राष्ट्रप्रगती व राष्ट्रसुधारणेसारख्या नाजूक विषयांत दवळा- ढवळ करण्याचा हक्क मिळवूं पहाणें कीती धोक्याचें आहे बरें! इंग्लंडांत फक्त प्रति- ष्ठित लोकांच्याच हातांच असलेले पूर्वींचे अधीकार आतां सामान्य जनसमूहानें आपले हातांत घेतले आहेत इतकेंच नव्हे तर आता त्या प्रतिष्ठित लोकांचे मंडळाचा लोप होण्याची वेळ अगदीं समीप आली आहे हेंही खरें परंतु अशी स्थीती होण्या- पूर्वीं इंग्लडांतल्या सामान्य लोकांनीं कोण- कोणत्या बाबतींत आपली प्रथम सुधारणा करून घेतली होती हें आपण पहाणें अवश्य होय. त्या देशांतील सामान्य जनांस मिळणारें राष्ट्रीय शिक्षण आज आमचें देशांतील सामान्य लोकास मिळत नाहीं. त्या देशांतील सामान्य लोकांत असणारा परस्पराविषयींचा विश्वास व प्रेम हें आज आमच्या लोकांत येणें शक्य नाहीं. त्या लोकांत वसत असलेल्या राष्ट्रीय बाण्याचा (nationality) एक सहस्रांश देखील आमचे हिंदुस्थानवासीयाचें ठायीं दिसत नाहीं असें नानाप्रकारचें दोष आमच्या सामान्य लोकांत असतानाच त्यांनीं जर त्या देशांतील सामान्य लोकांनीं जशी आपली उन्नती करून घेतली तशी आह्मीही करूं व त्या लोकाप्रमाणें आह्मीही उदारमतांचा अव- लंब करून प्रतीष्ठित लोकांचे हक्क मिळवूं असें ह्मणून, त्याप्रमाणें खटपट करावयास लागणें, ह्मणजे तें मुंगळ्यानें गुळाची भेली उचलण्याच्या प्रयत्नाप्रमाणें साहसाचे व हास्यास्पद कृत्य होईल. येवढ्याकरितां प्रातीष्ठित लोकाचें हातांतून विशिष्ठ प्रकारचे हक्क जर सामान्यजनास आपलें हातीं खरोखर घेणें असेल तर त्यांनीं प्रथमतः हक्का- खेरीज इतर बाबतींत त्या प्रतीष्ठित लोकाची बरोबरी केली पाहिजे व असें झाल्यावर प्रतिष्ठित लोकांस आपण होऊन सामान्य जनाचे हातात आपली सत्ता देणें भाग पडेल असे इंग्लंडचे इतीहासावरून स्पष्ट दिसत आहे. परंतु तेच जर सामा- न्यजन दंडेलीनें व पक्षपातानें तसले हक्क हिरावूं पाहातील तर हिंदुस्थान देशासारख्या जर्जरीभूत राष्ट्रांत सामान्यजन व प्रतिष्ठित दोघेही खालीं पडतील हें आपणास अधीक स्पष्ट करण्याचें कारण नाहीं.

जहाल व मवाळ दोन्ही पक्षांचें अंतिमसाध्य एकच असल्या मुळें ते एकमेकाचें मित्रच होत. त्यांच्या साध्याचे साधनमार्ग मात्र भिन्न आहेत. आणि ह्या भिन्न मार्गावरून कां होईना पण ते जर एक निष्ठेनें आपल्या अंतिमध्येयाकडे जात असले तर त्यांत खात्रीनें देशाचें हितच होईल परंतु भिन्न मार्गावरून ते जाणार ह्मणून जर त्याच्यांत एकमेकाविषयीं मत्सर उत्पन्न झाला तर ते एकमेकाचे कट्टे शत्रु होऊन आपल्या सुविचारानें रेखांकित केलेल्या मार्गापासून अलग होऊन भोंवतालच्या घोरतर अवनती गर्तांत, एकमेकांस खेचून नेऊन व देशां तील कार्यकारी मंडळी येणें प्रमाणें नष्ट करून राष्ट्रांचे मोठें नुकसान करणार आहेत हें त्यांनीं विसरूं नये. आमच्या जहाल व मवाळ बंधूंना, एकमेकापासून विभक्तपणें आपआपल्या मार्गी धुमसत राहून कधीही देशोन्नती करतां येणार नाहीं. राष्ट्रोन्नतीस राष्ट्रांतील निरनिराळ्या पक्षांत होईल तितकी एकजूट पाहिजेच आहे. युक्त जर त्यांनीं देशहितैषी सभाभरून जोराची व्याख्यानें दिलीं व ऐक्किलीं किंवा त्यांनीं कितीही अरण्यरुदन केलें तरी त्या पासून तिळभरही फायदा होणें नाहीं.

पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांत अपरिहार्य नीचो- च्चता भिन्न भिन्न स्वरूपानें असतेच. समाज घटनेपूर्वीं मनुष्यमात्राची जन्मसिद्धसमता अगदीं कांटेतोल असतें, असें जरी कोणी मानलें, तरी समाज घटनें नंतर व्यवहारांतल्या सांपत्तिक विषमतेनें व मनुष्याच्या गुणकर्म- भेदानें ती समता टिकत नाहीं. व्यवहा- राच्या रंगभूमीवर मनुष्य एकदा नाचूं लागला कीं, त्यास दुसऱ्या सहकारी नटाची व आपली समता आहे, ही भावना सोडून देऊन प्राप्त झालेल्या भूमिकेचें काम निमु- टपणें करावें लागतें. त्यानें तूं राजा कां व मी हुजऱ्या कां हा शुष्कवाद उपस्थित करून भांडत बसूं नये.

एका ग्रंथकारानें लिहून ठेविले आहे, कीं, " वस्तु विषयीं प्रेम, लोभ. अभिमान संग्रहवासना व रक्षण ह्या गोष्टी त्या वस्तूच्या सुखोत्पादकतेच्या ज्ञानानें होत असतात. तें ज्ञान नसतां नुसतें एखाद्या वस्तूस पोपटा सारखें दुसऱ्याच्या शिकवणी वरून माझी माझी ह्मटल्यानें वरती सांगितलेल्या गोष्टी होणार नाहीत. जनरूढीनें लोकांस माझें कुटुंब, माझा गांव व माझा देश, अशी माझे माझे ह्मणण्याची पोपटपंची शिकविली आहे. तिचा उच्चार मात्र लोक करितात. पण त्यांस ज्ञानाच्या नांवानें आवळ्या एवढें शुन्यच असतें. लोकांस ग्रामव्यवस्थेचे व तज्जनित सुखांचें पूर्ण ज्ञान असतें तर, शेजारी पाजारी एकमेकाचा प्राण घेण्यास उठलें नसते व देशव्यवस्थेचें खरेज्ञान असतें व ते व्यक्तीमात्राच्या सुखास कारणीभूत कसे असते, हे लोकांस सुक्ष्मतेनें कळतें तर स्वदेश हितास आमच्या प्रसंगीं कोणीच उदासीन न राहता कर्तृत्वाच्या नांवानें पुरे औदासिन्य व सभेंतून व चवाठ्यावर पोकळ बडबडीचा जो जिकडे तिकडे गर्गशा ऐकूं येतो, त्याचें कारण ह्यासंबंधाचे लोकांस अगदीं त्रोटक व भ्रामक ज्ञान आहे. हें होय.

ज्या उदार तत्वांचा इन्लंडांत एक सारखा उत्कर्षच होत गेला. व जीं उदार तत्वें तेथें सर्वमान्य झालीं त्याच उदात्त तत्वास हिंदुस्थानांत विद्याविभूषित प्रतिष्ठा कडून कां वीरोध होतो हे आतांच वर दिलेल्या उताऱ्या वरून कोणासही सहज समजणार आहे. तें कारण ह्मणजे देश हिताविषयीं बडबड करणारांचे खऱ्या रा- ष्ट्र कळकळीविषयींचें त्रोटक व भ्रामक ज्ञान हें होय. असलें त्रोटक व भ्रामक ज्ञान हें पुष्कळ अज्ञानापेक्षाही घातक असते अज्ञानानें लोक समुदाय फारच अदूरदर्शी झालाआहे. आपली बायको व मुलें ह्यांच्या पलीकडे आपलें असें कांहीं तरी आहे हें आपण विसरतां कामा नये. देश हित करावयाचें ह्मणजे संसार सोडून देउन विरक्त बनावयाचें नाहीं तरी पण संसारी जनांनीं डोळस होऊन दूर- दृष्टीनें दूरदूरचे हितसंबंध ध्यानीं आणून

Applicant mus
petent to carry o
dence and must b
and energ
nce will

...वाळ असे पक्ष ...नें निरापाड मेहनत ... करीत राहिलें पाहिजे. ...च पंक्तांत स्वतः रुतले त्यांनीं उदारपणानें धाऊन येऊन उद्धारकरणाऱ्या आपल्या धारोदात्त ज्ञानी बांधवास आपल्या पंक्तींत निर्वृणपणें ओढून घेऊन उदार तत्वांच्या जोरावर समान हक्काची मागणी करणाऱ्याची चूक कोठें होते हें वरील विवेचनावरून स्पष्ट होणार आहे कळावें

आपला
त्र्यंबक ओक

---

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान;—** गर्भावळीचे मेघ चैत्र शुद्ध १ पासून आज पर्यंत भावी पर्जन्याची समृद्धि ध्वनीत करीत आहेत. आकाश वारंवार येते ह्मणून उकाडा होऊं लागला आहे. यंदाचा उन्हाळा फार कडक दिसतो. पाण्याची हाकाटी सर्वत्र आहे. या सालीं सरकारी व सार्वजनिक विहिरी अधिक खोदण्याचा प्रयत्न अवश्य व्हावयाला पाहिजे. रोगराई विशेष नमूद करण्या सारखी कोणतीच नाहीं.

रा० रा० महादेव अंबादास उमरावतीकर सबजज्ज वाशीम यास तेथून कामठी येथें बदललें.

रा० रा० नरहर काशिनाथ मेडगांवकर यांस कामठी हून वाशीमास सबजज्ज नेमण्यांत आलें.

रा० रा० गोपीकृष्ण अगरवाला मुनसफ यांस उमरेडाहून मलकापूर येथें बदलण्यांत आलें.

रा० रा० विश्वनाथ लक्ष्मण खेर. मुनसफ मलकापूर यांस दारव्हा कोर्टावर नेमण्यांत आलें.

व्हाइसराय कायेद कौंसिलांत वऱ्हाडतर्फे कौंसिलदार अद्याप नेमण्यांत आलेला नाहीं तर स्थानिक सरकार थोडी उचल करून रावबहादूर रंगनाथ नरसिंह मुधोळकर यांस पुनः नेमतील तर त्यांच्या लोकसेवेचें पारितोषक ह्मणून लोक या नेमणुकीचा गौरव करितील.

इटारसी—नागपूर रेलवेच्या उत्तर भागांत ह्मणजे इटारसी पासून बदनूर पर्यंत लवकर रहदारी सुरू होईल आणि दक्षिण भागाचें काम लवकर पूर्ण करण्याकडे सर्व लक्ष देण्यात येईल असें कळतें.

इंडियन बलभीम प्रोफेसर राममूर्ती यांचे येथें ५ खेळ झाले. कसरतीचे खेळ चांगले होतात पण प्रेक्षक समूह प्रोफेसरांच्या अद्भुत शक्तीचे प्रयोगासाठीं मुद्दाम जमत असतो मोटारगाडी थांबविण्यासंबंधानें लोकांची इच्छा पुरी होत नाहीं. बाकी हत्ती छातीवर उभा करणें आणि ४० मणाचा दगड छातीवर घेणें या दोन्ही गोष्टी विलक्षण आहेत. लोकाश्रय पुष्कळ मिळाला पण याच्या पासून लोकांस कांहींच तादृश फायदा होत नाहीं.

आजच्या अंका सोबत रा. मोरमकर यांचे बुका बदल पुरवणी वाटली जात आहे. तिकडे वाचकांनी अवश्य लक्ष द्यावें.

रा० रा० रामचंद्र सदाशिव लेले बी० ए० असिस्टंट इनस्पेक्टर, शाळा खातें, वऱ्हाड यांस गेल्या सोमवारीं उमरावती येथें हळद्या रोगामुळें देवाज्ञा झाली हें कळवितांना त्यांच्या सारखें सहृदय काव्यज्ञान, नैसर्गिक कवित्व इंग्लिश व संस्कृत काव्यांचीं मराठींत सरस रूपांतरें करण्याचें कौशल्य तीव्र बुद्धिचीं आपल्या सरकारी कर्तव्यांत निमग्नता इत्यादि सद्गुण आठवून आठवून मनाला विषाद फार वाटतो. स्नेहाला विशेष प्रेमळ गृहस्थ असून मुक्तेश्वर त्यांचा मोठा आवडता कवी होता. शरीरप्रकृतीनें सदृढ असल्यामुळें वयाच्या ५० च्या सुमाराला त्यांस स्वल्पकालांत मृत्युंगत व्हावें लागेल अशी कल्पनाही नव्हती. यांचे विचार वेदान्तपर असून चिकित्सकपणा कटाक्षाचा होता. या गृहस्थांच्या निधनानें सरकारचा एक उत्कृष्ठ शिक्षक व परीक्षक हरपला !

दुसरा मृत्यु रा. रा. भगवानदयाळ येथील डिपुटी कमिशनरचे हेडक्लार्क यांचा काल रोजीं कफक्षयामुळें झाला. हे गृहस्थ ४५ वयाचे असून सरकारी चाकरींत अतिशय काम करून करून मृत्युला सन्निध करण्याकडे त्यांनीं मोठी चूक केली. गृहस्थ अगदीं साधा, पापभीरु व फार दक्ष असा असे. वृद्ध मातापितर, पत्नी, मुलेंबाळें वगैरे परिवार मोठा आहे.

तिसरा मृत्यु रा. रा. विठूजी नारायण गालफाडे पेनशनर तहशीलदार, अकोला यांचा खानदेशांत या आठवड्यांत झाला हें कळवितांना मनाला आराम वाटतो. पुत्रशोकानें विव्हळ झालेल्या आत्म्यास वयाच्या ७-७२ व्या वर्षाच्या सुमाराला ही ईश्वरदत्त शांति अवश्य पाहिजे होती; आणि त्या शांतीचा अनुभव बहुगुणीत करण्यासाठीं त्यांचें आप्तमित्र धनश्रीचा उपयोग धर्मकृत्याकडे विशेष करितील असा भरंवसा आहे. यांनीं स्वपराक्रमानें श्रीमंती संपादली ! आणि आपल्या नापिकवृत्तीला उद्देशून हे पुष्कळ विनोदाच्या गोष्टी करीत असत. स्वभाव शांत, मनामिळाऊ दरबारी वळणाचा होता.


## WANTED

A Secretary for the Khamgaon Municipal Committee in the Buldana District, on Rs 70/-p. m.

Applicant must be thoroughly com petent to carry on English correspondence and must be of a good charactor active, and energetic.

Preference will be given to those who have passed the Matriculation or School Final Examination and possess--ing Engineering Qualifications.

The selected candidate will have to serve for 6 months on probation.

Applications with testimonials should reach the undersigned on or before the 31st May 1 913.

D, Chisholm
Khamgaon Chairman.
The 11 April 1913. M. C. Khamgaon.
No N. 30

## WANTED

Applications are invited for the post of a cashier in the Khamgaon Municipal Committee on Rs 20/- P. m. Preference will be given to those who have got some experience of account work.

Applications stating qualifications, age, &c. accompanied with original testimonials, or certified copies thereof, must reach the undersigned on before the 15th of May 1913.

D, Chisholm
Khamgaon.
the 11 April 1913. Chairman.
Municipal Committee
No N. 31 Khamgaon.


---

## कापूस- तक्ता- साप्ताहिक- ५ एप्रिल १९१३ पर्यंत

| जिल्हा. | वर्ष | काटन मार्केट — आयात — कापसाच्या गाड्यांची संख्या | | काटन मार्केट — आयात — रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या | | गठ्ठे बांधण्याचे प्रेस — बांधलेली गठ्ठी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ता. ५।४।१३ पर्यंतचा आठवडा | १।१०।१२ पासून | ता. ५।४।१३ पर्यंतचा आठवडा | १।१०।१२ पासून | ता० ५।४।१३ पर्यंतचा आठवडा | ता. १।१०।[illegible] पासून आज तागाईत |
| उमरावती | चालू साल | २,८९० | १४०३६१ | ९९१ | १९,३५० | ३,९८७ | १३६,१२२ |
| | गुदस्त | ३,२३८ | २३११२६ | ९८६ | २२६०६ | .... | .... |
| | तिगस्त | ३,३२४ | ९१,६९७ | ७०६ | ९,५५१ | .... | .... |
| यवतमाळ | चालू साल | ४७५ | १३१२९५ | ८८४ | १४,५१३ | ११९५ | ७५,६९५ |
| | गुदस्त | ५७६ | १४०५३४ | ८११ | १०,३२० | .... | .... |
| | तिगस्त | ५६९ | ३९,१९८ | ५४१ | १९,५०८ | .... | .... |
| आकोला | चालू साल | २,२४५ | १३९६३६ | १,५९६ | ३४७५६ | ३,४८४ | १५०८,१० |
| | गुदस्त | १,६५७ | १७४६३३ | १.४९७ | ४१८३२ | .... | .... |
| | तिगस्त | २,५५७ | ८९,६३१ | १,१९६ | १७३५८ | .... | .... |
| बुलढाणा | चालू साल | १०४८ | ८७,१३५ | ९७७ | ८,४१० | २,३१८ | १०३,७९२ |
| | गदस्त | ४५९ | ११९१६९ | २२६ | ७,९०२ | .... | .... |
| | तिगस्त | २,४७५ | ११०५१८ | २४१ | ४,९३० | .... | .... |
| एकूण वऱ्हाड | चालू साल | ६,६५८ | ४९८४२७ | ४,४५२ | ७३,०२९ | १०,५८४ | ४११,३७९ |
| | गुदस्त | ५,९३० | ६६५०६२ | ३,५२० | ८२,६६० | .... | .... |
| | तिगस्त | ८,९२५ | ३३१२०४ | २,६८४ | ४३,३४७ | .... | .... |

टीप—चालूं सालाच्या बरोबरीचे साल गुदस्त व तिगस्त सालचे आठवडे ६ एप्रिल १९१२ व ८ एप्रिल १९११ पावेतों होते

पत्रकें धाडणारे
मार्केट प्रेस
१३ ९७

सी. यू. वीस्स.
डायरेक्टर आफ आग्रिकलचर
इंडस्ट्रीन—मध्यप्रांत

## एकाच वस्तूपासून तीन देणग्या

सौंदर्य

आरोग्य

थोडा खर्च

व्हां तुमचें रक्त दूषित होतें तेव्हां ह्या तिन्ही सुखाना मुकावें लागतें.

रक्तदोषापासून पुष्कळ प्रकारचे घाणेरे भयंकर रोग होतातः—काळे डाग, संधिवात वांतव्रण पीनस, नाकसडणें, रक्तपिती, सर्वांगठणकणें, सुनभैरी मेहरी, बद, फोड, चट्टे, गाची आग, तोंडाला दुर्गंध, अजीर्ण, कंडू व कडकीपासून इतर रोग.

तर स्वतःचाच राजवैद्य बनून

रोग नष्ट करणें बरें नव्हें काय?

—डा. गोखले एम्. ए. एम्. डी यांच्या प्रख्यात—

## आयोडाईझड सार्सापरिलानें

ते निखालस बरे होतात.

फक्त उत्तम वनस्पतींचा बनविलेला आयोडाईझड.

——अनुभवतरपहा.——

किं. १ रु. पो. ख. ०४ आ. उत्तमगुणास, ४ बाटल्यांची पो. ख. सह किं. ४ रु.

बालामृत हें काय आहे?

— अस्सल बालामृत हें —

मुलाना आरोग्य देणारें आहे तें पुढील रोगावर अमोलिक उपाय आहे

क्षय, खोकला, दम, अपचन, मोठें पोट, काड्यांसारखीं ...र्डें, ओकारी, शौचाला घाण, वाईट दुधानें होणारें रोग, कंडू, आंकडी वगैरे. डा० गोखले एम्. ए. एम्. डी यांनीं पुष्कळ वर्षांच्या अनुभवानें प्रथम तयार केलेलें. इतर सर्व बालामृतें याच्या रंगीत नकला! रंगीत साखरेचे पाक पाजून नसते रोग मुलांना विकत घेऊ नका.

किं. १८२ आणे पो. ख. ०४ पूर्ण गुणास ३ बाटल्यांची किं. पो. ख. सह २८९

पत्ताः-- हिंदु फ्यामिली मेडिकल हॉल माधवबाग मुंबई नं. ४ नं. २६



## जाहीरात.

!!! डाक्टर जी. बी. यांची सुवासिक औषधी तपकीर !!!

!! मागवा व खात्री करून घ्या !!

ह्या तपकीरीचा शेंकडों लोकांनीं अनुभव घेऊन सर्टिफिकीटें दिलीं आहेत.

REGISTERED TRADE MARK



शिवाय वैद्य व डाक्टर लोकांचीं या तपकीरीच्या स्वच्छते बद्दल व गुणाबद्दल अनुकूल मतें आह्माकडे आलेली आहेत. ही तपकीर पिनस. अर्धाशिशी, डोके दुखणें व डोक्यांतील मेंदुचे इतर सर्व रोग तसेंच पडसें वगैरे विकारांवर फार वस्ताद आहे. ही ओढल्यानें मेंदुतील दूषित धातु पातळ होऊन नेत्रद्वारें व नाकांतून बाहेर निघून जाते व मस्तकांतील मेंदु स्वच्छ होऊन बुद्धी व ज्ञान तीव्र व वृद्धिंगत होतात. मज्जेसंबंधीं रोग दूर करणारें या सारखें सुलभ साधन दुसरें नाहीं. साधी तपकीर दहा वीस वेळां ओढून जो उपयोग होतो तो गूण आमची ही सुवासिक तपकीर फक्त दोन तीन वेळ ओढल्यानें करते. एक पैशाच्या साध्या तपकीरींत आमच्या सुवासिक तपकिरीच्या दोन चिमटी मिळविल्या असतां सर्व तपकीर सुगंधी होते. शेंकडों लोक ही तपकीर आपल्या कुटुंबांत नित्य लागणाऱ्या औषधाप्रमाणें संग्रही ठेवतात साध्या तपकीरी प्रमाणें ह्या आमच्या तपकीरींतील सुवास व तीव्रता एकदोन दिवसांत नष्ट होत नाहींत हे गूण आमच्या तपकीरींत एक वर्षपर्यंत कायम रहातात ही तपकीर आह्मीं मोठ्या श्रमानें व वैद्यलोकांच्या सहायानें तयार करविली आहे एक वेळ अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी. एक आण्याचीं तिकिटें पाठविल असतां नमुन्याची बाटली पाठवूं. सर्वांस घेण्यास सुलभ पडावी ह्मणून हिची किंमत आह्मीं फायद्याकडे न पहातां फारच माफक ठेविली आहे.



एक बाटलीस ४ आणे व वंगी टपाल व व्ही. पी. खर्च १ दां राजकीय, सामाजिक,
डजन बाटल्यास रु. २-८ " " " ६ आर्थिक व वाङ्मय
सूचना ] पत्र लिहिणारांनीं इंग्रजींत अथवा बालबोध लिपींत आमचेवर द परिवर्तन घडलें करून लिहीणें कळावें. तपकीर मिळण्याचें ठिकाणः— ...हे. या

गुरुबसवा आणि कंपनी,

नो. नं. २७ सावकार पेठ, मद्रास



"बादशाही याकुती" बनविण्याचा हक्क प्रसिद्ध डॉक्टर चांदलीआ ह्यांनाच आहे.

## नामर्दाईवर "बादशाही याकुती"

आमच्या खऱ्या "बादशाही याकुतीचा" सरकारी रजिस्टर नंबर २२० आहे. ह्याच याकुतीनें सर्व प्रकारचे धातु विकार दूर होऊन नपुंसकत्वपणाचा पूर्णपणें नाश होतो व हमेश टिकेल अशी युवावस्था प्राप्त होते. हेंच औषध हिंदुस्थान युरोप व आफ्रिकेंत प्रसिद्ध आहे. किंमत रुपये १०.

**कमजोरीवर** "पुरुषार्थ लेप" गुप्त अगाच्या कमजोरीचा नाश करून पुर्ण तरतरी आणणारा प्रख्यात गुणकारी लेप. किंमत २१ रु.

## पुपरम्यावर वस्ताद प्रमेहांतक.

लघ्वीची आग, पू ठणके हटकून बंद करणारा जगप्रसिद्ध "प्रमेहांतक" किंमत रुपये २ रोग बरा करूं इच्छिणाऱ्यांनीं हेंच औषध घ्यावें.

जास्त माहितीसाठीं क्याटलॉग मागवा.

पत्ता--चांदलीआ कंपनी काळबादेवी रोड पोपटवाडी मुंबई.

नं० नं० २८



## Oriental Government security LIFE ASSURANCE COMPANy Limited

ESTABLISHED IN 1874.
R. Paterson, Brown, Manager,
HEAD OFFICE—BOMBAY

**FUNDS Exceed 4 crores**

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES
IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up to treating thier clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested:—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Seauritie and lodged with the Government Official Trustee of Bombay in terme of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employinn portion of their annual income or profits in effecting life policies, at oncg create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application to

M. DESOUZA,
CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH No. No 29


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

...रा अधिकच ...शी करून सभा उचडली आहे. प्राच्य ...स्थित रीतीनें प्रारंभ झाला ...क प्रचाराची


वर्ष ४७ ]

...ल्य.

वर्गणी ... माणसाच्या ...पा कृपेनें

आकोल्यांतील लोकांस...... पूर्णपणें
बाहेरगांवीं ट हां. ........ ...
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठुवें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.



## जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी पासून ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यांपैकी मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची भी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक / G. A. Phillips.
आकोला ९।९।०९ ( एजंट
नं १

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां ...न तपास करावा.

एका चिपचें वजन २६३/८ तोळे असतें. ... भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत ...वार ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक ( G. A. Phillips.
आकोला २१-९-१० ( एजंट
नं० नं० २


पद्धतीविषयीं काय तो वाद आहे. या बाबतींत हिंदी लोकांच्या हिताच्या विरुद्ध असा जो काहीं पुरावा कमिशनपुढें आलेला आहे तो इतका अल्प आहे कीं तो उपेक्षणीय मानला पाहिजे पब्लिक सर्व्हिस कमिशनमुळें वर्णभेद जास्त तीव्र होण्याचा संभव आहे अशी जो टीका कित्येक वर्तमानपत्रांनी केली आहे तिलाही त्यांनीं यावेळीं उत्तर दिलें. ते ह्मणाले कीं कमिशन वर्णभेद तीव्र करीत नसून उलट तो काढून टाकून सर्व वर्णीना समदृष्टीनें कसें वागवितां येईल या प्रश्नाचा विचार करीत आहे, पण आपलें वर्चस्व जाईल अशी ज्यांना भीती वाटत आहे ते ... आरोप करून कमिशनच्या


हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें मागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ विकार ताबडतोब दूर होतात. किं रु. १४८

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली खरूज याचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ३

## माझा मला पाहिजे

तुह्मीं कांहीं ही ह्मणा पण मी कांहीं हा माझा नांगर तुह्मांस देणार नाहीं हा नऊ नंबरचा नांगर आहे व तो माझा मला पाहिजे आणि तुह्मांला ही तसलाच पाहिजे असल्यास तुह्मी किर्लोस्करबंधु किर्लोस्करवाडी (जिल्हा सातारा) यांना लिहा ह्मणजे ते तुह्मांला पाठवून देतील. मी त्याला एकुणचाळीस रुपये दिले आहेत.

**किर्लोस्कर बंधु**
**पोस्ट किर्लोस्कर वाडी.**
जि० सातारा ( सं. औंध. )
नो० नं० ४

## —सीतागीत—किं. २ आणे

शाळा खात्यानें मंजूर केलेलें, मनोरंजन, केसरी, आनंद वगैरेनीं उत्तम अभिप्राय दिलेलें, मुद्दाम स्त्रियांकरितां सोप्या व चटकदार चालीवर रचलेलें.

आडीच आण्याची तिकिटें पाठवून मागवा
कर्ताः--- गणेश दिनकर आठवले
मास्तर हायस्कूल
नो० नं० ५ आकोला [ वऱ्हाड ]


## सामाजिक परिषद

आमचा पुण्याचा बातमीदार कळवितो कीं मुंबई इलाख्याच्या सामाजिक परिषदेची पुढची बैठक पुणें येथें १९१४ च्या वसंत ऋतुंत करावी असा तेथील प्रमुख सुधारक मंडळीचा विचार चालला आहे. १८९१ सालीं बऱ्याच मारामाऱ्या झाल्या नंतर निराळा मंडप उभारून त्यांत जी सामाजिक परिषदेची बैठक झाली त्या नंतर पुनः कोणतीच बैठक तेथें झाली नाहीं. त्या काळच्या स्थितींत व आतांच्या स्थितींत जमीन अस्मानचें अंतर पडलें आहे. तेव्हां विरोधीपक्ष जोरांत होता. आतां त्यांच्या नांग्या पडल्या आहेत. त्या वेळीं सुधारक पक्षांत ही तरुणपणाचें रक्त ... अज्ञान बुद्धा... नें थंडावत चाललें

येते कीं ज्या ज्या ज्ञातींत पुनरविवाहाची वहिवाट नाहीं त्या त्या ज्ञातींत वैधव्याचें प्रमाण दिवसें दिवस वाढत चाललें आहे यामुळें गर्भपात बालहत्यादी पातकें कशीं होतात व त्यांचा परीणाम पातकी व त्यांचे संसर्गी लोकांस कसा भोगावा लागतो व सदरील संबंधानें अनीवार्य संकटांत पडल्यामुळें त्यांना किती दुःखें सोसावीं लागतात. ते तपशीलवार लिहिण्यास अशक्य आहे. ...री थोडक्यांत त्याचा परीणाम इतकाच आहे कीं ईश्वरापुढें पातकी, सरकारपुढें गुन्हेगार, व आपआपल्या ज्ञातींत अनेक प्रकारच्या दोषास पात्र व घरांतील आस वर्गास स्वतः डोळ्यावर झांकण टाकून कानाडोळा कसा होतो याचा विचार प्रत्येकांनी स्वतःच करावा. या सर्व गोष्टीविषयीं जगनियंत्या परमेश्वरानें माझे मनांत संचार केल्यामुळें वर दर्शविलेल्या संकटांतून निभावण्याकरितां आकोला ताजनापेठेंत हनुमान वस्तींत मारुतीचें देवळाजवळ **निराश्रित बालरक्षण गृह** स्थापन केलें आहे. भाड्यानें घेतलेलें घर केव्हां सोडावें लागेल याचा निश्चय नसतो या करितां मुद्दाम विकत घेतलेलें घर या कामीं अर्पण केलें व वर दर्शविलेल्या नांवाची फळी त्या ठिकाणीं लावलेली आहे. या कामीं संचार करणारा व प्रत्यक्ष हातानी करविणारा व अशा कार्मी सर्व प्रकारें निरंतर यश देणारा जगनियंता परमेश्वरच समर्थ आहे.

आपलें अज्ञान बालक जी. श्रीमंतातर्फे
मॅनेजर विष्णु प्रभुराम पेन्शनर
हायकोर्ट पिटिशनरायटर
ता० १६-३-१२ आकोला वऱ्हाड
नो. नं. ६


## वऱ्हाडांत खात्रीची उत्तम नवीन सोय.

## खरे गारेचे थंडचष्मे

आह्मीं मुद्दाम वऱ्हाडच्या लोकाकरितां डोळे तपासून सर्व तऱ्हेच्या फ्रेमीसहित खरे गारेचे थंड चष्मे माफक दरानें विकण्याचें दुकान काढलें आहे. मुंबई वगैरे मोठ्या ठिकाणच्या भपक्यावर मंडळी कशी फसतात हें सर्वाना श्रुतच आहे सर्व गरजूनी अनुभव घेवून पहावा.

**गोपाळ पांडुरंग आणि कंपनी**
नो० नं० ७ आकोला


मुद्दां राजकीय, सामाजिक, धार्मिक, औद्योगिक व वाङ्मय विषयक स्थितींत जें परिवर्तन घडलें आहे तें अत्यंत आश्चर्यकारक आहे. या काळचा इतिहास राष्ट्राच्या उन्नतीच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाचा असला पाहिजे. राज्य कर्त्यांना व प्रजा जनांना सुधारणा वाल्यांना व पुराणमताभिमान्यांना कारखानदारांना व कुटुंबवत्सलांना, धर्म वीरांना व साहित्य सेवकांना सर्वानांच अशा इतिहासाचे अत्यंत महत्व वाटत आहे. असा इतिहास उपलब्ध नसल्यामुळेंच पुष्कळ वेळां लेखकांच्या हातून सरकाराविषयीं व समाजासंबंधानें लोकांचे भलभलते ग्रह करून देण्यात येत असतात, हें अत्यंत गैर आहे. पण ही अनर्थपात्ती टाळण्यास एकच जो उपाय ...हे तो करण्यास अजून कोणी तयार ... आश्चर्य आहे. १८९७

डि. ... राव

नो० नं० ८


## LEUCODERMA.

10,000 Packets Free.

It has now been arranged to distribute about 10,000 sample packets of PANDIT KRIPARAM'S infallible cure for LEUCODERMA or WHITE LEPROSY to prove its efficacy and to show that the disease is not incurable as supposed. It never fails. The sample packet will be enough to produce wonders in only one inch spot. write for it atonce per V. P. P. for As. 3 to meet the cost of its transmission, to

PANDIT KRIPARAM,
8, NANDIBAGAN LANE,
P. O. Salkea, Dist. Howrah.

P. S.—Pandit Kriparam's deeply interesting volume on Leprosy, its causation and treatment, etc., etc., can be had only at As. 8 per copy (V. P. P. charges As. 3). Every leper and sufferer from a tough kind of skin disease should read the volume—in both English and Bengalee. Please write the address legibly.

No. N. 9

## *WANTED*

A Secretary for the Khamgaon Municipal Committee in the Buldana District, on Rs 70/-p. m.

Applicant must be thoroughly competent to carry on English correspondence and must be of a good charactor active, and energetic.

Preference will be given to those who have passed the Matriculation or School Final Examination and possessing Engineering Qualifications.

The selected candidate will have to serve for 6 months on probation.

Applications with testimonials should reach the undersigned on or before the 31st May 1 913.

D, Chi-holm
Khamgaon Chairman.
The 11 April 1913. M. C. Khamgaon.
No N.10

## *WANTED*

Applications are invited for the post of a cashier in the Khamgaon Municipal Committee on Rs 20/- P. m. Preference will be given to those who have got some experience of account work.

Applications stating qualifications, age, &c. accompanied with original testimonials, or certified copies thereof, must reach the undersigned on before the 15th of May 1913.

D, Chisholm
Khamgaon.
the 11 April 1913. Chairman.
Municipal Committee
No N· 11 Khamgaon.

करण्याचें कामीं ही संकटपरंपरा अधिकच लांब असणार. पण ती नाहींशी करून चीननें इतक्या लवकर पार्लमेंट सभा उघडली हें त्यास खरोखर भूषणावह आहे. प्राच्य राष्ट्रांत प्रजासत्ताक राज्य सुव्यवस्थित रीतीनें चालविण्याच्या प्रयोगाला हा प्रारंभ झाला आहे. हा यशस्वी होवो अशी प्रत्येक प्रजेची इच्छा असणें स्वाभाविक आहे.

## लेडी हार्डिंज यांचें वात्सल्य.

लॉर्ड हॉर्डिंज यांचे आततायी माणसाच्या दुष्टपणाच्या प्रयत्नापासून परमेश्वराच्या कृपेनें संरक्षण झाले व ते दुखण्यांतून पूर्णपणें बरे झाले याबद्दल आनंदित होऊन हिंदुस्थानच्या धानिक वर्गानें जो द्रव्यनिधि लेडी हार्डिंज यांच्या स्वाधिन केला त्याचा विनियोग लहान मुलांना आनंदित करणाऱ्या एखाद्या स्वरूपानें करण्याचा त्यांचा [illegible] त्यांनीं ठरव[illegible]

पद्धतीविषयीं काय तो वाद आहे. या बाबतींत हिंदी लोकांच्या हिताच्या विरुद्ध असा जो काहीं पुरावा कमिशनपुढें आलेला आहे तो इतका अल्प आहे कीं तो उपेक्षणीय मानला पाहिजे पब्लिक सर्व्हिस कमिशनमुळें वर्णभेद जास्त तीव्र होण्याचा संभव आहे अशी जो टीका कित्येक वर्तमानपत्रांनी केलें आहे तिलाही त्यांनीं यावेळीं उत्तर दिलें. ते ह्मणाले कीं कमिशन वर्णभेद तीव्र करीत नसून उलट तो काढून टाकून सर्व वर्णीना समदृष्टीनें कसें वागवितां येईल या प्रश्नाचा विचार करीत आहे, पण आपलें वर्चस्व जाईल अशी ज्यांना भीती वाटत आहे ते कमिशनवर हा आरोप करून कमिशनच्या या स्तुत्य प्रयत्नाला नांवें ठेवित आहेत. मि. मॅकडोनल्ड यांच्या भाषणावरून कमिशननें आतां[illegible]

## सामाजिक परिषद

आमचा पुण्याचा बातमीदार कळवितो कीं मुंबई इलाख्याच्या सामाजिक परिषदेची पुढची बैठक पुणें येथें १९१४ च्या वसंत ऋतूंत करावी असा तेथील प्रमुख सुधारक मंडळीचा विचार चालला आहे. १८९९ सालीं बऱ्याच मारामाऱ्या झाल्या नंतर निराळा मंडप उभारून त्यांत जी सामाजिक परिषदेची बैठक झाली त्या नंतर पुनः कोणतीच बैठक तेथें झाली नाहीं. त्या काळच्या स्थितींत व आतांच्या स्थितींत जमीन अस्मानचें अंतर पडलें आहे. तेव्हां विरोधी पक्ष जोरांत होता. आतां त्यांच्या नांग्या पडल्या आहेत. त्या वेळीं सुधारक पक्षांत ही तरुणपणाचें रक्त खेळत होतें. आतां तें थंडावत चा[illegible] आहे तथापि

इ[illegible]दा होत नाहींत. म[illegible]या झाडांच्या मेलेल्या व[illegible] दिलेल्या, झाडावर प[illegible]जीवी वनस्पति वाढ- लागलेली अशी स्थिति [illegible]ाडाचा मोहोर लागला [illegible]ळून पडावा, किंवा [illegible]री यांत आश्चर्य नाहीं. [illegible] वतिला जपण्याची आहे ज्या जमिनींत [illegible]त्रावयाची तींत प्रथम [illegible] वगैरेचें पीक काढून मग पावसाळ्यापूर्वी नांगरून ठेवावी. मे महिन्यांत झाडें लावण्यासाठीं वीस वीस फुटांच्या अंतरावर खड्डे खणावे त्यांच्या तळाशीं चांगलें शेणखत घालावें, आणि मग झाड लावावें. झाड उगवल्यावरही त्याची वाढ जोरानें व्हावी ह्मणून करडईच्या पेंडीचें खत घालणें चांगलें. उन्हाळ्यांत झाडांना पाणी दिलें पाहिजे. फळाच्या आकाराची पूर्ण वाढ झाल्यावर मात्र पाणी देऊं नये आंबराई खालीं वाळलेल्या फांद्या, बांडगुळें वगैरेचा उकिरडा साचूं देऊं नये. त्याची छाटाछाट वेळोवेळीं करीत गेलें पाहिजे. झाडावर बुरसा किंवा तांबोरा चढूं देऊं नये. हे रोग आहेत. ते सालीवरून खरडून काढावे. तसे न निघतील तर थोडी आंच लावावी. किड्यांनीं खाल्लेलीं पडलेलीं फळें उचलून दुसरीकडे खड्डयांत पुरून टाकावी. हीं तशींच राहूं दिल्यानें कीड पसरते. कांहींवेळां फवाऱ्यानें अथवा पिचकारीनें गढूळ राकेलतेलाचें मिश्रण उडविल्यापासून कीड मरते असा अनुभव आहे. सारांश, अशा शास्त्रीय पद्धतीनें आंबराईची लागवड व जोपासना केल्यास आंब्याचीं फळें सरस जातीचीं व विपूल येतील. ही मशागत करणें खर्चाचें व मेहनतीचें काम आहे खरें, पण फळांचें पीक उत्कृष्ट येण्यानें त्या श्रमांचें व खर्चाचें साफल्य झाल्या शिवाय राहणार नाहीं.

[illegible] आपल्या अंजनवेल [illegible]वीं श्री वेणूगोपाळाचें फार प्राचीन [illegible]ालय आहे. त्यावर गेल्या पावसाळ्यांत [illegible]चें मार्गें जी दरड आहे त्यांत असल्या मोठ्या धोंडीपैकीं एक धोंड पडून [illegible]ठाचें बरेंच नुकसान झालें. सुदैवानें [illegible]ाची मूर्ती शाबूत राहिली. ग्रामस्थ [illegible]वृंदांनीं देवास चिठ्या टाकून मूर्ती [illegible] गणपतीचे देवळांत आणिली व हल्लीं [illegible]थें पुजा होत असते. व गेल्या कार्तीकेचा [illegible]र्षिक उत्साह तेथेंच झाला.

[illegible]वळास अपघात झाला नसता, ह्मणजे [illegible]ांहींच विचार करण्याचें कारण नसतें, [illegible]ण अलीकडील गांवची स्थिती मनांत [illegible]णून सहजी आलेल्या योगामुळें देऊळ [illegible]ालीं असल्यानें सर्वस्वी सोईचें होईल, [illegible]सा पुष्कळांचा विचार होऊन (आपलें [illegible] सदर्हू विचारास मत मिळेल अशी आशा आहे.) श्री गणपतीचें देवळांतच फेरफार करून व ते वाढवून तेथें श्री वेणूगोपाळाचे पृथक देवालय असावें असें ठरलें आहे. पुर्वींच्या देवळाच्या सभामंडपाचे सामान उपयोगी पडेल. सदर्हू कामांत आजच्या अदमासाप्रमाणें ५०० पांचशे रुपये खर्च लागेल गांवांत नेहमी राहणाऱ्या ब्रह्मवृंदांनीं २०० रुपये वर्गणी जमविण्याचें अश्वासन दिलें आहे. बाहेर ठिकाणीं आपल्या गांवची जी ब्राह्मण मंडळी आहे, त्यांत वकील, नोकर, व पेनशनर आहेत. व त्यांजकडून ३०० रुपये वर्गणी मिळेल, असा अंदाजा केला आहे. आपणाकडून या कामीं निदान रुपये मिळावें, अशी आशा आहे. तरी सदर्हू रक्कम, अथवा याहून जास्त यावीशी वाटल्यास मनीआर्डरीनें रा० रा० बळवंत रुद्राजी गोळे यांचें नांवें अंजनवेल येथें पाठविण्याची कृपा व्हावी. जितकी लौकर वर्गणी येईल तितक्या त्वरेनें दुरुस्तीस लागणारें सामान वगैरे घेण्यास ठीक पडेल पुरातन देऊळ पुर्वींचेंच ठिकाणीं असणें बरें, हें कित्येकानें सुचविलें पण आजपर्यंतच्या अनुभवावरून लोकांस दर्शनास जाण्यास, व उत्साहांत कीर्तनांस जाणें फार त्रासदायक होतें. खालीं देव आणून ठेवल्यापासून गांवांतील सर्व लोकांस रोज दर्शनाचा लाभ होत आहे. वर्गणीबद्दल पुन सुचनेची वाट पाहूं नये कळावें लोभ असावा ही विनंती.

आपला

मु० अंजनवेल ता० १९ मार्च सन १९१३ } ग्रामस्थ ब्रह्मवृंदांचे तर्फे श्रीधर बाळाजी वैद्य.

[illegible] कलकत्त्यात व न्या. मु रानडे यांचा पुतळा मुंबईत सर सी. एच हिल यांच्या हस्तें उघडण्यांत आला. कर्झन व रानडे यांच्यांत कोणत्याही प्रकारचें साम्य नव्हतें. कर्झन जेवढे अहंमन्य तेवढे रानडे विनम्र आणि निरहंकारी होते. कर्झन साहेबांनीं हिंदुस्थानच्या पायांतल्या शृंखला अधिक निगडित करण्यासाठीं अटोकाट यत्न केले; रानड्यांचें धोरण नेहमीं रूढीच्या दास्यांतून समाजाला सोडविण्याचें, आणि लोकांच्या वृत्ति अधिक उदार व व्यापक करण्याकडे असे. कर्झन हे साम्राज्यवादी होते. रानडे यांचा देशाभिमान आकुंचित नव्हता, तरी महाराष्ट्र व त्यांत ही पुणें शहर यांचे विषयीं त्यांचे ठायीं निरतिशय प्रेम व वात्सल्य होतें. कर्झन साहेबांनीं हिंदुस्थानचा कारभार एका केंद्रांत आणून सगळ्या सार्वजनिक संस्था सरकारी तंत्राला वश करण्याचा प्रयत्न ठेविला होता. रानड्यांचें धोरण केंद्रापसरणाच्या द्वारें प्रत्येक अवयवाला स्वतः वरची जबाबदारी ओळखण्यास लावण्याचें होतें. या व इतर अनेक बाबतींत जरी या दोघांची विसदृशता असली तरी दोघे ही थोर पुरुष होते यांत शंका नाहीं. यावरून दोघांचे ही पुतळे लोकांनीं सारख्याच भक्तिभावानें उभारले असतील असें अनुमान काढणें मात्र चुकीचें होईल. कर्झनचा पुतळा उभारणें हें अधिकारापुढें आह्मी लोक कसे माना वाकवितों त्याचें निदर्शक आहे रानड्यांचा पुतळा हा त्यांच्या गुणानीं आमच्या अंतःकरणांत कसें अढळ स्थान मिळविलें आहे त्याचें प्रतिबिंब दाखविणारा आहे. दोघेही आपआपल्या परी थोर असले तरी भययुक्त आदर आणि भक्ति यांच्यामधलें अंतर हे दोन पुतळे नेहमीं दाखवीत राहतील. कर्झन साहेबांच्या अंगीं कर्तृत्वशक्ति, उद्योगपरता, महत्त्वाकांक्षा इ. गुण अतिशयानें वास्तव्य करीत आहेत ही गोष्ट हिंदुस्थानानें कधींही नाकबूल केली नाहीं, आणि कर्झन साहेबाच्या पुतळ्याच्या दर्शनानें हे गुण तरुण हिंदी माणसाच्या मनांत संचरूं लागल्यास तो पुतळा उभारल्याचा उद्देश सफळ होईल. पण रानड्यांच्या पुतळ्याची गोष्ट निराळी आहे, त्यांच्या अंगच्या गुणांचें आकलन साकल्यानें त्यांच्या हयातींत कोणींच केलें नाहीं. सरकारनें त्यांना व्हाइसचान्सेलर नेमिलें नाहीं. युनिव्हर्सिटीनें त्यांना एल एल डी. केलें नाहीं. त्यांच्या देशबांधवांनीं 'लोकमान्य' तेचा शिक्का त्यांच्यावर मारला नाहीं. तथापि त्यांच्या [illegible] बुद्धीचा विशालता, दूर दृष्टी व्यापक विचार शीलता, प्रज्वलित आशावाद, कडकडीत कर्तव्यनिष्ठा, अप्रतिम व्यासंग उत्कृष्ट शील, उदार अंतःकरण, निरहंकारता, उज्वल देशप्रीति, अढळधर्मश्रद्धा, इ. गुणांचें सम्यक् आलोकन एका लेखांत करणें हें अत्यंत दुर्घट काम आहे. पण रानड्यांच्या तोडीच्या योग्यतेचा कोणी चरित्रकार निर्माण होऊन तो रानड्यांच्या चरित्राच्या निरनिराळ्या बाजू योग्य प्रमाणांत व योग्य रितीनें लोकांपुढें मांडीपर्यंत हें काम कशाबशारीतीनें कां होईना, पण वर्तमानपत्रांच्या संपादकांनीं करणें प्राप्त आहे.

## मोत्याच्या मूर्ति

सोन्याचांदीच्या व स्फटिकाच्या देवाच्या मूर्ति पुष्कळ प्राचीन काळापासून आपल्या हिंदुस्थानदेशांत होत आल्या आहेत. पण मोत्यांची मूर्ति करणें हा कौशल्याचा अपूर्व प्रकार फक्त चीन देशांतच पाहण्यास सांपडतो. ते लोक प्रथम तांब्याची अंगुष्ठमात्र बुद्धाची मूर्ति करून ती मोत्याच्या शिंपल्यांत घालतात, आणि तो शिंपला समुद्रांत सोडून देतात. कालक्रमानें शिंपल्यांतला किडा मूर्तीच्या आकाराचें मोतीं तयार करतो. ह्मणजे त्या किड्याच्या अंगातून निघणाऱ्या रसांचीं पुटें त्या मूर्तीवर बसतात. मग हळूंच ती तांब्याची मूर्ति खालच्या बाजूनें काढून घेतात. अशा रीतानें देवांच्या मूर्ति व कंकणादि अलंकार सगळे मोत्याचे करणें हा तिकडे एक धंदाच होऊन बसला आहे.

## आंबराईची मशागत.

सरकारच्या शेतकी खात्याकडून वेळोवेळीं माहितीचीं अनेक पत्रकें निघत असतात. पण त्यांचा गरीब निरक्षर शेतकऱ्यांना उपयोग करून घेतां येत नाहीं. अलीकडे काहीं थोडे सुशिक्षित शेतकीच्या धंद्यांत पडूं लागले आहेत त्यांना आंबराई सारख्या विषयावरील पत्रकांत दिलेल्या माहितीचा पुष्कळ उपयोग करून घेतां येण्यासारखा आहे. आंबे हिंदुस्थानांतल्या बहुतेक सगळ्या प्रांतांतून होतात. पण जेथें जमीन मध्यम भुसभुशीत किंवा चुनखडीची आहे अशा ठिकाणीं आंब्याचा विपुलता दिसते. आंब्यांच्या झाडांची मशागत ती काय करावयाची आहे? तीं निसर्गतःच वाढतात अशी बहुतेकांची समजूत आहे, आणि ह्मणूनच आमच्या इकडे हापूस, पायरी-

## पहिलें चिनी पार्लमेंट.

चीन देशांत प्रजासत्ताक राज्य स्थापन होऊन एक वर्ष होऊन गेलें, तरी परकीय विशेषतः युरोपियन राष्ट्रांनीं झालेल्याक्रांतीला आपली मान्यता अद्याप दिली नाहीं. याचें कारण त्या प्रजासत्ताक राज्याचा पाया अद्याप व्हावा तसा मजबूत झालेला नाहीं. अद्याप देशांतली अस्वस्थता साफ मोडलेली नाहीं तथापि तेथें नुकतेंच पार्लमेंट उघडलें गेलें अशी खबर तारेनें आली आहे; यावरून चिनी मुत्सद्यांना प्रजासत्ताक राज्य भक्कम पायावर बसविण्याची उमेद वाटूं लागली आहे असें ह्मटलें पाहिजे. मध्यंतरीं इंग्रजी वर्तमानपत्रांच्या बातमीदारांनीं या प्रजासत्ताक राज्याविषयीं नानाप्रकारच्या अशुभ वार्ता पसरविल्या होत्या. पण पार्लमेंट उघडण्याचे वेळीं लोकांनीं मोठा उत्सव केला यावरून झालेली क्रांती लोकांना खरोखर प्रिय आहे असा तर्क केल्यास तो चुकीचा होणार नाहीं. राज्यक्रांति ह्मटली ह्मणजे ती संकटापन्न असावयाचीच. चीनसारख्या जुन्यापुराण्या देशांत अगदीं नव्या पद्धतीची राजसत्ता स्थापित

करण्याचें कामीं ही संकटपरंपरा अधिकच लांब असणार. पण ती नाहींशी करून चीननें इतक्या लवकर पार्लमेंट सभा उघडली हें त्यास खरोखर भूषणावह आहे. प्राच्य राष्ट्रांत प्रजासत्तक राज्य सुव्यवस्थित रीतीनें चालविण्याच्या प्रयोगाला हा प्रारंभ झाला आहे. हा यशस्वी होवो अशी प्रत्येक प्रच्याची इच्छा असणें स्वाभाविक आहे.

## लेडी हार्डिंज यांचें वात्सल्य.

लॉर्ड हॉर्डिंज यांचे आततायी माणसाच्या दुष्टपणाच्या प्रयत्नापासून परमेश्वराच्या कृपेनें संरक्षण झालें व ते दुखण्यांतून पूर्णपणें बरे झाले याबद्दल आनंदित होऊन हिंदुस्थानच्या धनिक वर्गानें जो द्रव्यनिधि लेडी हार्डिंज यांच्या स्वाधिन केला त्याचा विनियोग लहान मुलांना आनंदित करणाऱ्या एखाद्या स्वरूपानें करण्याचा त्यांचा विचार त्यांनीं नुकताच जाहिर केला आहे. लेडी हार्डिंज यांनीं दिसेंबर महिन्यांत अत्याचार घडला ते वेळीं मनाचा जो खंबीरपणा दाखविला त्याला अधिक खुलविणारा असा त्यांच्या अंगचा हा वात्सल्य गुण आहे. या आनंदाचे वाटेकरी देशांतल्या प्रत्येक मुलानें व्हावें ह्मणजे त्यांचा आनंद पाहून आपणास आपल्या दुःखाचा विसर पडेल व हर्ष दुणावेल ही लेडी हार्डिंज यांची इच्छा येशू ख्रिस्त किंवा गौतमबुद्ध यांच्या सारख्या साधूच्या चरित्राची आठवण करून देते या लहान मुलांना दुसरें कांहीं नाहीं तरी निदान एक दिवस – ता० २९ जूनला व्हाइसराय साहेबांच्या वाढ दिवशीं – सुट्टी मिळावी अशी तजवीज करण्यांत येणार आहे. आनंदाचे प्रसंग मोठालीं माणसें नाना प्रकारें साजरा करतात, पण अशा प्रसंगीं लहान मुलांची आठवण ठेवून त्यांना आनंद होईल तें करणें व त्यांत आपला आनंद मानणें हें खरें वात्सल्य होय. खऱ्या प्रेमळ आणि सहृदय मातेच्याच तें वाटतें. लेडी हार्डिंज सारख्या पाश्चात्य सुधारणेंत वाढलेल्या स्त्रीच्या अंगांत प्राच्य वात्सल्य इतकें उत्कट वसत आहे ही खरोखर फार समाधानाची गोष्ट आहे. या लहान अर्भकांच्या शिक्षणाच्या अधिक सुखदायक तजविजी सरकार कडून होण्याचे कामीं लेडी हार्डिंज वात्सल्यानें प्रेरित होऊन कांहीं खटपट करतील तर त्या आपलें नांव आबाल वृद्धांचे तोंडीं ठेवून जातील यांत शंका नाहीं.

## मि० रॅमसे म्याकडॉनल्ड.

मि० रॅमसे मॅकडोनल्ड हे एक हिंदुस्थानचे हितचिंतक मित्र आहेत. पब्लिक-सर्व्हिस कमिशन पंजाबांत गेलें असतां लाहोरच्या पंजाब असोसिएशन क्लबांत त्यांना मेजवानी देण्यांत आली त्यावेळीं त्यांनीं बोलून दाखविलें कीं हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत हिंदी लोकांना मोठाल्या व विश्वासाच्या जागा अधिक देण्याचा प्रश्न ह्या कमिशनपुढें प्रमुखत्वानें आहे पण त्यांत सुद्धां प्रगति दिसून येते. अधिक जागा द्याव्या किंवा नाहीं हा प्रश्न आतां नसून त्या कशा द्याव्या याबद्दल काय तो वाद आहे. ह्मणजे तत्त्व मान्य झालें असून पद्धतीविषयीं काय तो वाद आहे. या बाबतींत हिंदी लोकांच्या हिताच्या विरुद्ध असा जो कांहीं पुरावा कमिशनपुढें आलेला आहे तो इतका अल्प आहे कीं तो उपेक्षणीय मानला पाहिजे पब्लिक सर्व्हिस कमिशनमुळें वर्णभेद जास्त तीव्र होण्याचा संभव आहे अशी जी टीका कित्येक वर्तमानपत्रांनी केली आहे तिलाही त्यांनीं यावेळीं उत्तर दिलें. ते ह्मणाले कीं कमिशन वर्णभेद तीव्र करीत नसून उलट तो काढून टाकून सर्व वर्णांना समदृष्टीनें कसें वागवितां येईल या प्रश्नाचा विचार करीत आहे, पण आपलें वर्चस्व जाईल अशी ज्यांना भीती वाटत आहे ते कमिशनवर हा आरोप करून कमिशनच्या या स्तुत्य प्रयत्नाला नांवें ठेवित आहेत. मि. मॅकडोनल्ड यांच्या भाषणावरून कमिशननें आतांपर्यंत केलेलें काम हिंदुस्थानच्या हिताला साधक न झालें तरी बाधक तरी खास होणार नाहीं अशी उमेद वाटते.

## चळवळ झाली पाहिजे.

न्यायखातें व अंमलबजावणी खातें हीं अगदीं स्वतंत्र असल्याशिवाय ब्रिटिश न्यायाच्या शुद्धतेविषयीं हिंदुस्थानच्या लोकांच्या मनांत जो आदर व जी श्रद्धा असावयास पाहिजे ती राहणार नाहींत असें आजपर्यंत पुष्कळ बडे बडे लोक ह्मणत आले आहेत. सरकारनें सुद्धां पांचसात वर्षांपूर्वीं हें तत्व मान्य करून कोणत्या रीतीनें ही दोन्हीं कामें निराळीं करतां येतील याचा विचार करण्यासाठी तें प्रकरण तहकूब ठेवलें होतें. पण या बाबतींत अलीकडे हिंदुस्थानसरकारच्या धोरणांत परावर्तन झालेलें दिसून येत आहे ही शोचनीय गोष्ट आहे. नुकत्या वरिष्ठ कौंसिलांत झालेल्या प्रश्नोत्तरांवरून या प्रश्नाच्या मुळाशीं असलेली गोष्ट सरकारला तत्त्वतः सुद्धां मान्य नाहीं असें स्पष्ट दिसतें व होतीमर्दानच्या नबाबाच्या खटल्यांत मुंबई हायकोर्टाच्या, आणि अलीकडे झालेल्या त्या एका खटल्यांत कलकत्ता हायकोर्टाच्या निकालावर टीका करून त्या निकालाचें महत्व कमी करण्याचा जो प्रयत्न हिंदुस्थानसरकार चालून देत आहे त्यामुळें हायकोर्टाच्या सत्तेविषयीं आणि न्यायाच्या श्रेष्ठतेविषयीं लोकांच्या मनांत असलेली अश्रद्धा लवकरच पार उडून जाईल अशी भीती वाटत आहे. अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याच्या हातांत सत्ता येऊन न्यायखात्याशीं तिचा विरोध येणें या सारखी हानिकारक गोष्ट दुसरी कोणतीही नाहीं. तेव्हां हा अनर्थकारक प्रसंग टळावा ह्मणून लोकांनीं वेळींच जागे होऊन आरडाओरड करावी व अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांचा हा वरचढपणा आवरून घेण्याचा यत्न हाणून पाडावा हें लोकांचें अतिशय जरूरीचें कर्तव्य आहे. कलकत्त्यानें या बाबतींत प्रशंसनीय उदाहरण घालून दिलें आहे. मुंबईची प्रेसिडेन्सी असोसिएशन मद्रासची महाजनसभा, वगैरे सार्वजनिक संस्थांनीं या वेळीं जागृत होणें अवश्य आहे.

## सामाजिक परिषद

आमचा पुण्याचा बातमीदार कळवितो कीं मुंबई इलाख्याच्या सामाजिक परिषदेची पुढची बैठक पुणें येथें १९१४ च्या वसंत ऋतूंत करावी असा तेथील प्रमुख सुधारक मंडळीचा विचार चालला आहे. १८९५ सालीं बऱ्याच मारामाऱ्या झाल्या नंतर निराळा मंडप उभारून त्यांत जी सामाजिक परिषदेची बैठक झाली त्या नंतर पुनः कोणतीच बैठक तेथें झाली नाहीं. त्या काळच्या स्थितींत व आतांच्या स्थितींत जमीन अस्मानचें अंतर पडलें आहे. तेव्हां विरोधीपक्ष जोरांत होता. आतां त्यांच्या नांग्या पडल्या आहेत. त्या वेळीं सुधारक पक्षांत ही तरुणपणाचें रक्त खेळत होतें. आतां तें थंडावत चाललें आहे. तथापि त्या थंडपणा बरोबर सुधारकांच्या अंगीं जो पोक्तपणा यावयास पाहिजे होता तो मात्र आला नाहीं असें प्रो० भाटे यांच्या नुकत्या झालेल्या विवाहा सारख्या प्रसंगावरून ह्मणण्यास आह्मांस फार खेद वाटतो.

## वजनें व मापें

हिंदुस्थानांतल्या निरनिराळ्या प्रांतांत— प्रांतांतच काय पण निरनिराळ्या गावांत सुद्धां—निरनिराळीं वजनें व मापें चालू असल्यामुळें व्यापार करणारास वारंवार फार अडचणी येतात. व सामान्य माणसास घोटाळ्याचे हिशेब समजत नाहींत. ही अडचण दूर व्हावी ह्मणून सर्व हिंदुस्थानांत एक जातीचीं वजनें व मापें करण्यांत यावीं अशी मागणी बऱ्याच वर्षांपासून लोकांकडून करण्यांत येत आहे. कांहीं संस्थानांतून अशी व्यवस्था करण्यांत आलीही आहे. व तिच्या पासून लोकांची चांगली सोय झाली आहे असें कळतें. कांहीं कांहीं बाबतींत आमचीं देशी संस्थानें सुधारणेच्या कामीं ब्रिटिश सरकारवर कशी आघाडी मारतात त्याचें हें एक उदाहरण आहे. ब्रिटिशसरकारालाही लोकांची ही अडचण कळून चुकली आहे परंतु ब्रिटिशसरकारच्या राज्यपद्धतींत क्षुल्लक बाबतींतही सुधारणा करावयाची झाली तरी कमिट्या, रिपोर्ट, ठराव, कमिशनें वगैरे अवडंबरें घालून नंतर ती कधीं काळीं झाल्यास होणार अशा पद्धतीमुळें लोकांच्या सोईचे अनेक प्रश्न वर्षानुवर्ष मागें पडून राहिले आहेत. वजनें व मापें याच्याबद्दलचा प्रश्नही अशाच कारणामुळें इतकीं वर्षें पडून राहिला होता. पण आतां असें कळतें कीं सरकार या प्रश्नाला धक्का देऊन लवकरच पुढें चरकांत ढकलणार आहे. या प्रश्नांचा विचार करण्यासाठीं एक कमेटी नेमण्याचा सरकारचा विचार आहे, व यासंबंधीं हिंदुस्थान सरकाराकडून सुटणाऱ्या हुकमाची वाट लोक मोठ्या उत्सुकतेनें पहात आहेत.

## १८५७ च्या बंडा नंतर

हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास छापाव्यानें वाढत आहे. १८५८ सालीं महाराणी व्हिक्टोरिया सरकारनें हिंदुस्थानचीं राजसूत्रें घेतल्याला ७५ शें वर्षें झालीं राष्ट्राच्या इतिहासांत ७५ शें वर्षांचा काळ ह्मणजे कांहींच नाहीं, तथापि या स्वल्प काळांत सुद्धां राजकीय, सामाजिक, धार्मिक, औद्योगिक व वाङ्मय विषयक स्थितींत जें परिवर्तन घडलें आहे तें अत्यंत आश्चर्यकारक आहे. या काळचा इतिहास राष्ट्राच्या उन्नतीच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाचा असला पाहिजे. राज्य कर्त्यांना व प्रजा जनांना सुधारणा वाद्यांना व पुराणमताभिमान्यांना कारखानदारांना व कुटुंबवत्सलांना, धर्म वीरांना व साहित्य सेवकांना सर्वांनांच अशा इतिहासाचे अत्यंत महत्व वाटत आहे. असा इतिहास उपलब्ध नसल्यामुळेंच पुष्कळ वेळां लेखकांच्या हातून सरकाराविषयीं व समाजासंबंधानें लोकांचे भलभलते ग्रह करून देण्यांत येत असतात, हें अत्यंत गैर आहे. पण ही अनर्थपत्ति टाळण्यास एकच जो उपाय आहे तो करण्यास अजून कोणीं तयार होत नाहीं हें आश्चर्य आहे. १८५७ सालच्या बंडा पासून ह्मणते राणीसरकारच्या जाहिरनाम्याच्या काळा पासून तों १९११ च्या दिल्ली दरबारापर्यंत ज्या राजकीय सामाजिक धार्मिक इत्यादि बडा मोडी झाल्या त्यांचें निष्पक्षपात दृष्टया विवेचन निदान नुसते दिग्दर्शन अथवा टांचण जरी कोणीं केलें तरी ते मोठें देश कार्य होईल. टिकाकारांना माहितीच्या अभावीं केवळ कल्पनेवर विसंबून लेख ल्याहावे लागतात तसें न होतां त्यांची टिका साधार व मुद्देसूद होईल व सुधारणेच्या मार्गांत हिंदुस्थानानें गेल्या पाऊणशे वर्षांत किती निरनिराळ्या दिशांतीं किती पुढें पाऊल टाकलें आहे याचा नक्की अंदाज करतां येईल. साहित्य परिषदे सारख्या संस्था राष्ट्रीय सुधारणेच्या अंगापैकीं एखादे तरी स्वल्पसें अंग घेऊन त्या संबंधानें यथाशक्ति माहिती मिळवून लहानसाच कां होईना, पण एखादा ग्रंथ मराठी भाषेंत तयार करील तर तिनें मराठी साहित्यास बरीच पुष्टी दिल्या सारखें होईल.

## आमचें दारिद्र्य.

अमेरिका, युरोप वगैरे खंडांतील देशांत साधारण मजुरांना सुद्धां सुखाचीं जीं साधनें अनुकूल असतात, व संसाराचा खर्च भागून ते जी थोडी बहुत शिल्लक मागें टाकतांत त्यांच्याशीं आमच्या देशांतल्या मध्यम वर्गाची ही तुलना होऊं शकत नाहीं. पाश्चात्य देशांतला मजूर घेत.. तर त्याच्या प्राप्तींतला कितवा अंश, कोण..त्या कामीं खर्च होत असतो हें पुढील आंकड्यावरून कळून येईल. वर्षाची १०० रुपये प्राप्ती होते अशी कल्पना केली तर त्यांतले ६२ रुपये खाण्यापिण्यासाठीं, ?.६ वस्त्र प्रावरणाकरितां, १२ घराचें भाडें ५ सर्पण व दिवाबत्ती या करितां २ मुलांचे शिक्षण व धर्मादाय या कामीं, १ सरकार देणें ह्मणून, १ औषधपाण्याकरितां व १ दिवाळी खुशाली वगैरे चैनीच्या गोष्टीकरितां खर्च होत असतात. तीच आमच्या इकडच्या मजुराची स्थिती पहा. त्याचीहि शंभर रुपये प्राप्ती धरली तर त्यांतलें जवळजवळ ९५ रुपये कांदा भाकर, मीठ मिरची वगैरे खाद्य सामग्री

ांत खर्च होतात यांतच लग्न-
ा किंवा शेतकी साठीं कर्ज काढ-
्कमेबद्दल सावकारास द्यावें लागणारें
धरलें आहे बाकीच्या पांच रुपयां-
रुपयाचें वस्त्र १ रुपया धार्मिक
ाठ आणें ख्याली खुशाली व आठ
औषधपाणी यांत खर्च होतात. मु-
शिक्षणासाठीं खर्च करण्यास व
ाचें मुद्दल फेडण्यास त्याला सवडच
नाहीं. विलायतेंतल्या मजुराची स्थिति
मच्या इकडल्या मजुराची स्थिति
ें हे अंतर विचारणीय आहे

## श्री सयाबाई रुग्णमंदीर.

्या चैत्रशुद्ध १० सकाळीं ८ वाजतां
रा० बी० पी० स्टांडन कमिशनर
यशस्वी हातानें शेगांव येथील
सयाबाई रुग्णमंदिरा 'चा वास्तु-मा-
करण्यांत आला हें कळविण्यास मोठा
वाटतो. या शुभकार्यानिमित्त
, उमरावती, आकोला, बाळापूर,
ांव, बुलडाणा, वगैरे ठिकाणाहून
ठी मंडळी मुद्दाम गेली होती. रा०
काशीनाथ श्रीराम जठार आफि०
कमिशनर यांनीं प्रास्ताविक लेखी
न वाचून दाखविलें आणि या नव्या
ा पूर्व इतिहास सांगितला. शेगांवचे
नागरिक रा० रा० नीळकंठ गोविंद
यांच्या मनांत महिला—रुग्णालय
ण्याची सुंदर कल्पना प्रथम उत्पन्न
. त्या संस्थेला लागणारा खर्च कर-
ीही त्यांनीं उदार मनानें कंबर बांधली.
या कल्पनेला मूर्त स्वरूप देण्याचें
र्य रा० रा० बापुसाहेब जठार यांनीं
ा हौसेने आपल्या अंगावर घेतलें.
ळ भवति न भवति झाली आणि
रा० स्लाय साहेब यांनीं कमिशनर
ांनाच सर्व गोष्टी सुरळीत क्रमाला
न दिल्या आणि या सर्व प्रयत्नांचें
गत रूप ह्मणजे प्रस्तुतचें भव्य व रमणीय
गमंदिर होय. एकंदर या दवाखान्या
र्थ आजपर्यंत सुमारें २२ हजार रुपये
पडले आहेत. आणि पुनः या
र्याच्या जरूरी साठीं लागणाऱ्या इमारती-
रा० रा० नीळकंठराव मोटे हें
गखी ४ हजार रुपये लावण्याला उद्युक्त
ेत. सध्यां या दवाखान्यांत आजारी दोन
बाया राहण्या इतकी सोय केलेली
. निदान ६ बिछाने पुढें ठेवण्यांत
ल अशी योजना करण्याचा संकेत
पासूनच आहे. या दवाखान्यावर असि०
नच्या हुद्यावर मुंबईच्या श्री० कुमारी
ो एल० एम० आणि एस या अनुभवी
्टरीणबाई मिळालेल्या आहेत. त्यांस
महा १५० रुपये पगार आहे व त्या
ाय आणखी एक डाक्टरीण त्यांच्या
ाखालीं देण्यांत येईल. प्रस्तुतच्या या
णमंदिराला सालिना खर्च ३२०० रुपया
त येईल असा अंदाजा आहे. या संस्थे-
ंधानें राजश्री जठार व रा० रा० स्टांडन
ंनीं फार अनुकूल अभिप्राय दिलेले आहेत.
णि कायमचे खर्च चालविण्या साठीं लेडी
फरीन फंड, मुनसिपालिटी, जिल्हा बोर्ड,
्यादिकांच्या उदार आश्रयाकडे अर्थात्
पहावें लागणार आहे आणि सुखवस्तु उदार धनिक लोक या संस्थेला पूर्णपणें द्रव्याश्रय देतील असा पूर्ण भरंवसा आहे. पश्चिम वऱ्हाडांत ही पहिलीच संस्था आहे आणि या उपयुक्त व अवश्यक धर्मार्थ दवाखान्याचा स्त्रीसमुदायास चांगलाच लाभ होईल.

रा० रा० स्टांडन यांनीं राजश्री मोटे यांचे आभार मानतांना त्यांचे मातुःश्रींची विशेष धन्यता गाइली. मातृदैवताहून श्रेष्ट दैवत नाहीं. ही आप्त मंडळी तीर्थरूप होत ह्मणजे स्वतां तीर्थोदका प्रमाणें मंगल असून त्यांच्या मध्यें विलक्षण पावन क्रिया आहे. रा० रा० निळकंठराव मोटे हे परम मातृभक्त होत आणि त्यांच्या मातुःश्री सयाबाई या कैलासवासी झाल्यानंतर ही आपल्या चिरंजीवास उत्कृष्ट स्फूर्ती, कल्याणप्रद प्रेरणा आणि उदार कार्यशक्ति देत आहेत हें विद्यमान महिला रुग्णमंदिर आपल्या मुग्ध वक्तृत्वानें सर्वश्रुत करीत आहेत. श्री सयाबाई महिला रुग्णमंदीर नेहमीं त्या धन्य माऊलीची आठवण देत जाईल आणि अशा सत्कृतींनीं पुण्यशील सद्गृहस्थ कृतकृत्य व चिरंजीव होतील. या संस्थेचा वास्तुसंकल्प ह्मणतांना राजश्री स्टांडन यांनीं आपली गुणग्राहकता व्यक्त करून सर्व प्रकारचा आश्रय सरकारांतून मिळेल असें साजन्यानें कळविलें. व लोकांस अशा संस्थेचा अभिमान धरण्या विषयीं विनंती केली. सर्व समारंभ आनंदोत्सवांनीं परिपूर्ण भरलेला होता आणि आमंत्रित बहुजनांनीं आपलें सत्कार्यप्रेम आपल्या आगमनानें व्यक्त केलें ह्मणून त्यांचें आदरातिथ्य मंगल सूचक गोष्टींनीं नानाविध प्रकारें करण्यांत आलें.

## वेदशाला

रा. रा, स्टांडन साहेब शेगांव येथें श्रीमहादेवाच्या देवस्थाना लागून जोडलेली वेदशाला पाहण्यास मुद्दाम गेले होते आणि त्यांनीं या धर्मकृत्याबद्दल राजश्री निळकंठराव मोटे यांचें मोठें कौतुक केलें. ही वेदशाळा याच गृहस्थांनीं स्थापलेली आहे; आणि त्या निमित्त २५ हजार रुपये खर्चून कायमचें उत्पन्न ह्मणून निराळी शेती त्यांनीं तोडून दिलेली आहे. या शाळेवर एक गुरू नेमलेले असून १०-२० विद्यार्थी वेदविद्या शिकत असतात.

## वऱ्हाडवृत्त

हवामान—ऊन प्रखर होत चाललें असून तीव्र व कठोर उन्हाळ्याची पूर्व रूपें अनुभवास येऊं लागलीं आहेत. पाण्याच्या दुर्मिळते मुळें लोकांचे फार हाल होतात. रोगराई उष्णतेच्या मानानें फारशी नाहीं.

रा. रा. सी. ब्राऊन असि. कमिशनर, आकोला हे १८ महिन्याच्या रजेवर गेल्या सोमवारी विलायतेला गेले. हे गृहस्थ विद्वान, कार्यदक्ष व चौकसवृत्तीचे आहेत. आमच्या डिपुटी कमिशनर साहेबांचे हे उजवा हात होते व त्या मुळें सर्वविध कामांत ह्यांचें लक्ष नेहमीं असे. मुनिसिपल व जिल्हा बोर्ड यांची कामें अधिक यशस्वी करण्याचें काम यांच्याकडे विशेषतः होते.

आमच्या विद्याखात्याच्या अधिकाऱ्यांनीं आमच्या विनंतीला मान देऊन या वर्गावर्गांच्या प्रसंगीं प्रत्येक वर्गांतील विद्यार्थ्यांची संख्या ३० पेक्षां थोडी वाढवून सर्व विद्यार्थ्यांची सोय केली आहे हें कळविण्यास आनंद वाटतो.

बुलढाणा जिल्ह्याकरितां जें सरकारी हायस्कूल होणार आहे त्याची स्थापना खामगावांस करण्याचा विचार चालू आहे. बुलढाण्यापेक्षां खामगांव हें गांव लोकांस विशेष सोयीचें होईल.

अग्निकोप— अलिकडे आगी अधिकाधीक लागतात. गेल्या शुक्रवारीं येथील 'आकोला इंडिया मिल्'मध्यें आग लागून थोडे नुकसान झालें. यंदा अग्नीपासून मालमत्तेचें संरक्षण करण्याचा विशेष तजवीजी मुनिसिपालिटीनें अंमलांत आणिल्या पाहिजेत. या कार्यांत जेवढी खबरदारी घेण्यांत येईल तेवढी थोडीच होय.

रा० रा० दत्तात्रय विनायक गोखले सब रजिस्ट्रार. आकोला यांस पूर्व वऱ्हाडचे नोंदणी इन्स्पेक्टर नेमण्यांत आलें. व त्यांच्या जागीं रा० रा० एकनाथ नारायण तारे यांस मलकापुराहून बदलण्यांत आलें

रा० रा० गुलाम हुसेन खान नायब तहशीलदार मुर्तिजापूर यांची बदली उमरावतीस झाल्या अन्वयें ते तिकडे दाखल झाले. हे गृहस्थ आपल्या सुस्वभावानें निस्पृह कार्यक्रमानें व प्रेमळ वर्तनाने सर्व तालुक्यांत लोकप्रिय झाले होते.

मुर्तिजापुरच्या नायब तहशीलदारीवर रा० रा० अमिरुद्दीन खान यांस उमरावतीहून बदलण्यांत आलें.

'ललितकलादर्श संगीत' मंडळीनें परवां रात्रौ सौभद्राचा प्रयोग फार नामी करून दाखविला. सुभद्रेच्या भूमिकेचें काम वर्णनीय झालें, येत्या बुधवारीं मुद्रिकेचा प्रयोग होणार आहे.

रा० रा० रंगनाथ श्रीराम जठार डिपुटी सुपरिन्टेंडेंट आफ पोलीस यांस पुनः १२ महिन्यांची रजा देण्यांत आली,

रा० रा० डी० क्लैस्टन डिपुटी डायरेक्टर, शेतीखाते यांस ६ महिन्यांची रजा देण्यांत आली.

यवतमाळचे सिव्हील सर्जन ले० राबर्टसन यांस नरसिंगपुरास बदलुन तेथें नरसिंगपुरचें असि० सर्जन पेड्रो यांस बदलण्यांत आलें.

पुणें येथील 'आनंद कार्यालयां'त विक्रीस असलेल्या पुस्तकांची माहिती आमच्या अंकाबरोबर वाटल्या जाणाऱ्या पुरवणींत मिळेल. विद्यार्थी मंडळींनीं ही पुस्तकें अवश्य संग्रह करण्यासारखीं आहेत.

येथील श्रीराम मंदिरांत गिरधारीलालच्या मंदिरांत व खोलेश्वराचे देवळांत अशा तीन ठिकाणीं रामजन्माचे महोत्सव उत्कृष्ट झाले. गेल्या बुधवारची श्रीराम मंदिरापासून हरिहराच्या देवालया पर्यंतची मिरवणुक मोठ्या मौजेची होती.

**जठार-विहीर—** बुलढाण्यास असलेला पाण्याचा दुष्काळ दूर करण्याची एक उत्तम योजना रा० रा० काशिनाथ श्रीराम जठार यांनीं काढली असून सांतगांव येथील एका जुन्या विहिरीचें पाणी बुलडाण्यास तुर्तातुर्त नेण्याची सोय केलेली आहे. या चांगल्या कृती बद्दल त्या विहिरीला जठारविहीर अशी संज्ञा लोकांनीं आनंदानें दिलेली आहे.

## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | ९९॥।≡ |
| सोनें | | २४८=॥ |
| चांदी | | ७५ |
| जवारी नवी | ८८ ते | ९० |
| गहुं काठे | १०८ | ११० |
| गहुं बन्शी | ११५ | १२० |
| चणे | ४॥ | ४॥- |
| तेल | | ८॥। |
| सरकी | | ८।= |
| तुप | १७॥ | १८ |
| कापुस | ६४ | ६५ |
| रुई आकोला जीन | | ९० |


## जाहिर नोटीस

सर्वत्र शेटसावकार व इतर गांवकरी यास खालीं सही करणार ईजकडून नोटीसीनें कळविण्यांत येते की माझा मुलगा नामें भावजी वा॥ भरतारी हा वाईट चालिचा निघाला पैसे देत नसल्यामुळे मजला मारहाण करित असतो मी घरी नस्ताना मनास वाटेल तोसामान घेऊन जाऊन विकतो ह्मणून मी त्यानला घराबाहेर काढुन दिले अहे तूं असा बोलतोसकीं अता थोडे मारिलें यापुढें ज्यास्त मारिन तरी कळविण्यांत येते कीं तूं आपली चालचलन सुधारावी व मारहाण करणे सोडुन द्यावे तसे न केल्यास कायद्याप्रमाणे तजविज केली जाईल व माझे जिनगिवर कोणाचें कर्ज वगैरे काढुनये व इस्टेट कोणास गहाण खरेदी बक्षीस पत्र वगैरे देऊं नये व कोणी घेउ नये कोणी दिल्यास तें रद्द समजले जाईल. मी व माझी ईस्टेट तुझे कर्जास जबाबदार नाही कळवे ता॥ २५ । ३ । १३ ई॥

सहीची निशानी

सावित्री बाई जवजे भरतारी कुणबीन रा० पारखेड

नो० नं० २२

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस जाहिर करण्यांत येतें कीं माझे तीर्थरूप परशराम मानाजी पाटील यांची बुद्धी चळली आहे त्यांस फसवुन जे लोक त्यांच्याशी जिन्नगिचा व्यवहार करतिल ते माझ्या हिश्या संबंधानें रद्द होतील इतकेच नांहीं तर त्याची जोखिम जिन्नगीवर राहणार नाहीं ज्याचा तो जबाबदार राहील कळवें ता॥ १६ । ४ । १३ ई॥

सही

सीताराम वा॥ परशराम पाटील रा॥ हिंगणे (उंबे)ता॥ खामगाव

निशानी

नो० नं० ३०

## नोटीस

भागाई मर्दे कुकाजी घेत्रे कुणबी रा० मैाजे दीग्रस बु॥ ता० बाळापूर ईस खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यात येते कीं तूं माझी गंधर्वाची बायको असुन तुझी वागणुक बरोबर नसल्यामुळे माझे घरून तू पंधरा तीन हप्त्यापासुन गांवातच आपले आई बापाचे घरी गेली· त्यावेळेस तुझे आंगावर डागीने तोडे चांदीचे तोळे ८० व गुंडवाळ्या जोड १ तोळे५० व दंडवळ्या जोड १ तोळे ५० व कोपरवाळ्या जोड १ तोळे ३० नथ तोळा १ सोन्याची व एक तोळयाच्या बाळ्या व एक तोळ्याच्या मुरक्या साहापुतळ्या व एक पदक आं० तोळे २ व गोफ व कंठी चांदीची वजन तोळे २२ कडीपाटल्या चांदीच्या अंदाज तोळे ३० येणेप्रमाणे माल सामान सुद्धा घेऊन गेली. त्यामुळें मी दुसरी गंधर्वाची बायको केली आहे. तरी तुजला मी वागवीण्यास तयार आहे. परंतु तूं लोकांचे सांगण्यावरुन लोकांचे कर्ज वगैरे करणार आहेस असे समजते तरी त्या कर्जाचा जबाबदार मी नाही- मात्र आई बापाचे घरी राहून खाण्यास देणार नाही तरी वरील लीहीलेले माझे डागीने नेलेले आणून द्यावे व माझे घरी मनोदयाप्रमाणें वागावें. ही नोटीस दीली सही ता० १०।४।१३ इ. दस्तुर यज्ञेश्वर सदाशिव०

सही

कुकाजी व॥ तुकाराम घेत्रे कुणबी राहणार दीग्रस बु॥ नि. हातची असे

नो० नं० २९

---

## नोटीस

नोटीस बेशमी रंभाबाई मर्दे उदाराम रजपुत रा० बेटवद ता० जामेनेर जिल्हा भुसावळ नोटीस देणार किसन वल्द सुरतसिंग रा० कसबे अडगांव ता० आकोट जिल्हा आकोला नोटीस देण्यांत येते कीं तुझी मुलगी देऊ मर्दे किसन इचेसी माझे लग्न झाल्यापासून एक वेळ माझे येथें पाठविली होती नंतर तुझे येथें तिला दहापांच वेळां नेण्याकारितां आलों असतां तूं तिला लोकाचे घरीं लपून ठेवली. आणखी लोकांच्या हातीं निरोप पठविला कीं तूं फारकत दे नाहींतर लोंकाचे घर निघेन करितां तुला नोटिसींनें कळविण्यांत येते कीं माझे बायकोचे अंगावरचे डागीने ३०० रुपयाचे व लग्नाचे वेळीं घेतलेले ४०० रुपये आहे ते व माझी बायकोस नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत पाठवावे. न पाठाविल्यास कायद्या प्रमाणें तजवीज केली जाईल व कोर्ट खर्च या नोटिसी सुद्धां भरून घेतला जाईल. कळावे

सही

किसन वा॥ सुरतसिंग रजपुत नि० खु०

नो० नं० २६

---

## नोटीस

बापुलाल चुनीलाल अ. पा. क. चुनीलाल पुजमल माटे साहू दुकान आकोला यांसी: —

नोटीस देणार मदेखां वल्द पैकूखां मुसलमान आकोला आज तारीख ९·४-१३ कारण नोटीस देतों कीं वि. अ. डि. जज्ज साहेब यांचे फैला वरील कि. मुकदमा नंबर २९ सन १९१२ यामध्यें अ. डि. जजसाहेब यांनीं मजला नादार ठरविलें आहे. त्यानंतर तारीख ४-११-१२ रोजीं तुह्मी मजला नोकर ठेविलें; पण तारीख १८-३-१३ चे सुमारास तुमचे मनांत बेमानी येऊन तुह्मी मजला घरीं बसविलें. माझा हिशेब तुह्मी बरोबर करीत नाहीं व मजला नोकरीवर ठेवित नाहीं. तरी या नोटीशीनें मी तुह्मांस कळवितों कीं. आजपासून आठ दिवसाचें आंत माझा सर्व हिशेब कोणत्याही दोन तिऱ्हाईत इज्जतदार बेपाऱ्याच्या समोर नक्की करावा; ह्मणजे तुमचा व्यवहार चोख राहील. असें न केल्यास मी तुह्मांस कोणतेही रीतीनें जबाबदार रहाणार नाहीं मी आजपासून आठ दिवसांनीं उमरखां वल्द दाऊतखां सौदागर कपड्याचा व्यापारी रा. आकोला यांचे येथें महिन्यानें नोकरीस राहणार आहे तरी तुह्मांस जी तारीख हिशेबाकरितां पसंत असेल ती तुह्मी उमरखा मजकूर यांस कळवावी याप्रमाणें तुह्मांस स्पष्ट कळविलें आहे. मात्र मी उमरखां मजकूर यांचे कापड विकण्यांत गुंतलो असतां किंवा त्याचेकरितां फिरतीवर गेलो असतां हिशेबाची तारीख काढूं नये. दोघास सोईस्कर अशी तारीख उमरखा मजकूर यांचे सल्यानें ठरावी कळावें तारीख २१-४-१३

मु० आकोला } सही
ता० ९ ४-१३ } मदेखां वा॥ पैकुखां नशानी

हातकी खुद कट्यार

दस्तुर खुद हबीबउल्लाखां

नो नं. २७

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं, आज सरासरी ९—९॥ वर्षें झालीं मला व माझे पालन कर्ते आजीला ( बापाची आई ) माझा बाप ति० मांगो व॥ खुशाल पाटील राहणार मैाजे डिडोळे खुर्द प्रगणे वडनेर ता० मलकापूर जि० बुलढाणें हा पालन पोषण करीत नसून त्यांनीं आपली वडिलोपार्जित स्थावर जंगम इस्टेट विकून टाकिली आहे शिवाय नादार ही झाला आहे हल्लीं माझे व माझे आजिचें पालनपोशन माझी आजी गंताबाई ही मोलमजुरी करून करीत आहे व माझे सोयरे हेही मजवर व माझे आजीवर मुलाप्रमाणें लक्ष देत आहे. तरी माझे बापाचे कर्जाबद्दल मजजवळ वडिलोपार्जित इस्टेट मुळींच नसल्यामुळें व शिवाय अलीकडेस त्याचे कडून आमचे पालनही होत नसल्यामुळें मजवर कोणतेही प्रकारची जबाबदारी नाहीं व मी होऊही शकत नाहीं. हे सर्वत्र लोकांस जाहीर कळावें ह्मणून मुद्दाम जाहीरनोटीस दिली आहे. कळावे तारीख सही

१ चांगो वा॥ मांगो पाटील
अज्ञान पालन करणार आजी
गंताबाई मर्दे खुशाल पाटील
राहणार मैाजे डिडोळे
खुर्द नि० बांगडी

नो० नं०

---

## कापूस– तक्ता– साप्ताहिक– १२ एप्रिल १९१३ पर्यंत

| जिल्हा. | वर्ष | काटन मार्केट — आयात — कापसाच्या गाड्यांची संख्या — ता. १२।४।१३ पर्यंतचा आठवडा | काटन मार्केट — आयात — कापसाच्या गाड्यांची संख्या — १।१०।१२ पासून | काटन मार्केट — आयात — रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या — ता. १२।४।१३ पर्यंतचा आठवडा | काटन मार्केट — आयात — रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या — १।१०।१२ पासून | गठ्ठे बांधण्याचे प्रेस — बांधलेली गठ्ठी. — ता० १२।४।१३ पर्यंतचा आठवडा | गठ्ठे बांधण्याचे प्रेस — बांधलेली गठ्ठी. — ता. १।१[illegible] पासून आज तागाईत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उमरावती | चालूं साल | ४,३७० | १४४७३१ | १०८९ | १६,४३९ | २,७९३ | १३९,१८८ |
| | गुदस्त | ४,०१६ | २३९१४२ | १०४४ | २३६९० | .... | .... |
| | तिगस्त | २,८७० | ९४,९२७ | ४६२ | १००१४ | .... | .... |
| यवतमाळ | चालूं साल | ३८७ | १३१८९७ | ११४४ | १९,६७३ | १६६९ | ७७,८९० |
| | गुदस्त | २०४ | १४०७३८ | ९९२ | १०,८७२ | .... | .... |
| | तिगस्त | २७९ | ३९,४७३ | ४९१ | ११,९९९ | .... | .... |
| आकोला | चालूं साल | ३,९४२ | १४३९७८ | २,९२९ | ३७२८४ | २,४९३ | १९३,९१९ |
| | गुदस्त | २,३८८ | १७६६२१ | २ ३६८ | ४४२०३ | .... | .... |
| | तिगस्त | १,१९९ | ९०,८३० | १,२०८ | १८९६७ | .... | .... |
| बुलढाणा | चालुं साल | २१०८ | ८९,२४३ | ३८६ | ८१,९७ | २,८७८ | १०६,६७० |
| | गदस्त | ९४२ | ११९६६१ | ३०२ | ८,२०९ | .... | .... |
| | तिगस्त | १,६०१ | ११२११९ | २६९ | ९,१९६ | .... | .... |
| एकूण वऱ्हाड | चालू साल | १०,८०७ | ९०९४०९ | ९,१४० | ७७,९८९ | ९,७४९ | ४७७,२१३ |
| | गुदस्त | ७,१०० | ६७२१६२ | ४,२६६ | ८६,९३० | .... | .... |
| | तिगस्त | ९,९०९ | ३३६९४९ | २,३८६ | ४९,७३६ | .... | .... |

टीप—चालूं सालाच्या बरोबरीचे साल गुदस्त व तिगस्त सालचे आठवडे १३ एप्रिल १९१२ व १९ एप्रिल १९११ पावेतों होते

पत्रकें धाडणारे
मॉर्केट प्रेस
२८ ८२

सी. यू. वील्स.
डायरेक्टर आफ आग्रिकल्चर
इंडस्ट्रीज—मध्यप्रांत

# एकाच वस्तूपासून तीन देणग्या

## सौंदर्य

## आरोग्य

## थोडा खर्च

जेव्हां तुमचें रक्त दूषित होतें तेव्हां ह्या तिन्ही सुखाना मुकावें लागतें.

रक्तदोषापासून पुष्कळ प्रकारचे घाणेरे भयंकर रोग होतातः—काळे डाग, संधिवात घशांतव्रण पीनस, नाकसडणें, रक्तपिती, सर्वांगठणकणें, सुनभेरी मेहरी, बद, फोड, चट्टे, आंगाची आग, तोंडाला दुर्गंध, अजीर्ण, कंडू व कडकीपासून इतर रोग.

**तर स्वतःचाच राजवैद्य बनून**

रोग नष्ट करणें बरें नव्हें काय ?

**—डा. गोखले एम्. ए. एम्. डी यांच्या प्रख्यात—**

# आयोडाईझड सार्सापरिलानें

**ते निखालस बरे होतात.**

फक्त उत्तम वनस्पतींचा बनविलेला आयोडाईझड.

**——अनुभवदरपहा. ——**

किं. १ रु. पो. ख. ०४ आ. उत्तमगुणास, ४ बाटल्यांची पो. ख. सह किं. ४ रु.

## बालामृत हें काय आहे ?

**— अस्सल बालामृत हें —**

**मुलाना आरोग्य देणारें आहे तें पुढील रोगावर अमोलिक उपाय आहे**

क्षय, खोकला, दम, अपचन, मोठें पोट, काड्यांसारखीं हाडें, ओकारी, शौचाला घाण, वाईट दुधानें होणारें रोग, कंडू, आंकडी वगैरे. डा० गोखले एम्. ए. एम्. डी यांनीं पुष्कळ वर्षांच्या अनुभवानें प्रथम तयार केलेलें. इतर सर्व बालामृतें याच्या रंगीत नकला ! रंगीत साखरेचे पाक पाजून नसते रोग मुलांना विकत घेऊ नका.

कि. १०२ आणे पो. ख. ०४ पूर्ण गुणास ३ बाटल्यांची किं. पो. ख. सह २०९

**पत्ताः-- हिंदु फ्यामिली मेडिकल हॉल माधवबाग मुंबई नं. ४** नं. २०



# जाहीरात.

**!!! डाक्टर जी. बी. यांची सुवासिक औषधी तपकीर !!!**

**!! मागवा व खात्री करून घ्या !!**

ह्या तपकीरीचा शेंकडों लोकांनीं अनुभव घेऊन सर्टिफिकीटें दिलीं आहेत.



REGISTERED TRADE MARK

शिवाय वैद्य व डाक्टर लोकांचीं या तपकीरीच्या स्वच्छते बद्दल व गुणाबद्दल अनुकूल मतें आह्माकडे आलेली आहेत. ही तपकीर पिनस. अर्धशिशी, डोके दुखणें व डोक्यांतील मेंदुचे इतर सर्व रोग तसेंच पडसें वगैरे विकारांवर फार वस्ताद आहे. ही ओढल्यानें मेंदुतील दूषित धातु पातळ होऊन नेत्रद्वारें व नाकांतून बाहेर निघून जाते व मस्तकांतील मेंदु स्वच्छ होऊन बुद्धी व ज्ञान तीव्र व वृद्धिंगत होतात. मज्जेसंबंधीं रोग दूर करणारें या सारखें सुलभ साधन दुसरें नाहीं. साधी तपकीर दहा वीस वेळां ओढून जो उपयोग होतो तो गुण आमची ही सुवासिक तपकीर फक्त दोन तीन वेळ ओढल्यानें करते. एक पैशाच्या साध्या तपकीरींत आमच्या सुवासिक तपकीरीच्या दोन चिमटी मिळविल्या असतां सर्व तपकीर सुगंधी होते. शेंकडों लोक ही तपकीर आपल्या कुटुंबांत नित्य लागणाऱ्या औषधाप्रमाणें संग्रही ठेवतात साध्या तपकीरी प्रमाणें ह्या आमच्या तपकीरींतील सुवास व तीव्रता एकदोन दिवसांत नष्ट होत नाहींत हे गुण आमच्या तपकीरींत एक वर्षपर्यंत कायम रहातात ही तपकीर आह्मीं मोठ्या श्रमानें व वैद्यलोकांच्या सहायानें तयार करविली आहे एक वेळ अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी. एक आण्याचीं तिकीटें पाठविल असतां नमुन्याची बाटली पाठवूं. सर्वांस घेण्यास सुलभ पडावी ह्मणून हिची किंमत आह्मीं फायद्याकडे न पहातां फारच माफक ठेविली आहे.

एक बाटलीस ४ आणे व बंगी टपाल व्हीं. पी. खर्च ३ आणे

डजन बाटल्यास रु. २-८ " " " ६ आणे

सूचना ] पत्र लिहिणारांनीं इंग्रजींत अथवा बालबोध लिपींत आमचेवर दया करून लिहीणें कळावें. तपकीर मिळण्याचें ठिकाणः—

गुरुबसवा आणि कंपनी,

नो. नं. २१ सावकार पेठ, मद्रास



**"बादशाही याकुती" बनविण्याचा हक्क प्रसिद्ध डॉक्टर चांदलीआ ह्यांनाच आहे.**

# नामर्दाईवर "बादशाही याकुती"

आमच्या खऱ्या **"बादशाही याकुतीचा"** सरकारी रजिस्टर नंबर २२० आहे. ह्याच याकुतीनें सर्व प्रकारचे धातु विकार दूर होऊन नपुंसकत्वपणाचा पूर्णपणें नाश होतो व हमेश टिकेल अशी युवावस्था प्राप्त होते. हेंच औषध हिंदुस्थान युरोप व आफ्रिकेंत प्रसिद्ध आहे. किंमत रुपये १०.

**कमजोरीवर** "पुरुषार्थ लेप" गुप्त अंगाच्या कमजोरीचा नाश करून पुर्ण तरतरी आणणारा प्रख्यात गुणकारी लेप. किंमत २५ रु.

# पुपरम्यावर वस्ताद प्रमेहांतक.

लघ्वीची आग, पू ठणके हटकून बंद करणारा जगप्रसिद्ध "प्रमेहांतक किंमत रुपये २ रोग बरा करूं इच्छिणाऱ्यांनीं हेंच औषध घ्यावें.

जास्त माहितीसाठीं क्याटलॉग मागवा.

**पत्ता—चांदलीआ कंपनी** काळबादेवी रोड पोपटवाडी मुंबई.

नो० नं० २२



# Oriental Government security LIFE ASSURANCE COMPANy Limited

ESTABLISHED IN 1874.

R. Paterson, Brown, Manager.

HEAD OFFICE—BOMBAY

**FUNDS Exceed 4 crores**

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up to, treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested:—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securitie and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application to

M. DESOUZA,

CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH No. No 23


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

## सुमती पत्राच्या वर्गणीदारास एक सवलत.

## प्रतिभा.

वरील नांवाची कादंबरी श्रीयुत बाबू अवीनाशचंद्रदास एम० ए० बी० एल० यांची बंग सहित्यांत अत्यंत श्रेष्ठ पद पावलेल्या 'कुमारी' नामक कादंबरीचा अनुवाद आहे, एवढें सांगितले असतां ही कादंबरी किती मनोहर आहे हें निराळें सांगण्याची कांहीं आवश्यकता नाहीं. प्रस्तुत कादंबरी सुमती पत्राचे एप्रील अखेर वर्गणीदार होणारास निम्या (॥१०) किंमतींत देण्याचें योजिले आहे. प्रती बेताच्याच काढावयाच्या असल्यामुळें या सवलतीचा फायदा घेऊं इच्छिणारांनीं खालील पत्यावर नांवें नोंदविण्याची त्वरा करावी. इतरांस एप्रील अखेरपर्यंत नांव नोंदविल्यास ट० ख० सह १।०४ सवा रुपया.

सुमती हें पत्र दर सोमवारीं प्रसिद्ध होत असून यांत निबंधक लेख, वर्तमानसार, मनोरंजक आणि आश्चर्य कारक गोष्टी येत असून चालू सालच्या जानेवारी महिन्या पासून 'अंजनासुंदरी' नांवची एक चटकदार कादंबरी चालू आहे. वार्षीक वर्गणी ट० हा० सह २ रु० तरी 'एक पंथ दो काज' या ह्मणी प्रमाणें या पत्रास वर्गणीदार होऊन वरील सवलतीचा फायदा घेण्याची वाचकांनीं कृपा करावी.

म्यानेजर-सुमति वर्धा. (सी. पी.)

नो. नं. १२

## नोटीस

रा० बळीराम वल्लद सुर्यभानजी काळे राहणार काळगव्हाण तालूके दर्यापूर जि० उमरावती यांसः—

खालीं सही करणार इनकडून नोटीस देण्यांत येते कीं मी अज्ञान दोन वर्षांची असतांना माझे बापानें तुमचे समागमें माझें लग्न करून दिलें आहे पण त्यावेळीं माझा बाप भ्रमिष्ट झाला होता व त्यास कोणत्याही तऱ्हेनी शुद्ध नव्हती अशा स्थितींत तुह्मी त्यास भुलथापा देऊन मजबरोबर लग्न करून घेतल पुढें थोड्याच दिवसांनीं माझा बाप मरण पावला. त्यावेळेस माझा भाऊही अल्पवयी होता हल्लीं माझा भाऊ व मी दोघेही सज्ञान झलों असून तुमच्या बद्दल माहीती मिळविली असतां तुह्मी आमच्या जातीचे नाहीं असें समजलें कारण तुमच्या जातीचें कोणी आमचे जातवाला पाणीही पीत नाहीं मग अन्नखाणे तर दुरच राहीलें व लग्न झाले दिवसापासून तुह्मी आपले घरीं कधींही मला नेलें नाहीं १२-१३ वर्षें मी आपले भावाचे घरींच राहत असुन माझे खाण्याचे खर्चाबद्दल माझे भावास ६०० रुपये लोकांचे देणें झाले आहे करितां या नोटिशीनें कळवितें कीं ही नोटीस पावल्या पासून १५ दिवसाचे आंत तुह्मी आमचे जातीचे आहां अशा बद्दल तुह्मी राहत असलेल्या गांवातील व अजूबाजूचे गांवातील सभ्य लोकाचा लेख माझे भावास दाखवून माझे बद्दल त्यास झालेलें कर्ज ६०० रुपये देऊन मला घेऊन जावें व असे न केल्यास तुह्मी माझे जातीचे नाहीं सबब हीच फारकती समजून व तुह्मी माझे बापा फसवून मजबरोबर आपलें लग्न लावून घेतले ही ठकबाजी केली अशा बद्दल तुमचे वर फौजदारींत काम चालवून मी दुसरा घरठाव आपले जातवाल्याशीं करीन कळावे तारीख १९ माहे एप्रील सन १९१३ इ दस्तुर मोरो गंगाधर सही.

सहीची निशाणी अलोकी मर्द बळीराम इचे हातची असें राहणार सातेगांव ता० दर्यापुर दस्तूर

नो. नं. १३ मोरोगंगधर पेंडसे

## नोटीस

चि० गणुसींग वा॥ अजबसींग रजपुत रा० यवतमाळ यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीशीचे उत्तर देण्यांत येतें कीं तुह्मी ता० २२-२-१३ इ० नोटीस वऱ्हाडसमाचार छापखान्यांतुन माझा जावई नामे दत्तुसींग उर्फ किसनसींग रजपुत याजला दिली त्याची १ प्रत मजला तुह्मी पाठविली त्याचे उत्तर हे कीं नोटीशींत जो मजकूर लिहिला आहे तो सर्व खोटा आहे. कारण स० नंबर ३४ हा माझे मुलीचा असून तो तीचे ताब्यांत १७।१८ वर्षापासून आहे. व स० नं० ५६ आहे तो माझे स्वतःचे मालकीचा आहे. घर हें मी स्वतःचे पैशानीं घेऊन माझे सासुचे नांवानी खरेदी दिलें होतें. ते तीनें आपले नातीस ह्मणजे माझी मुलगी गेंदाबाईस बक्षीस देऊन तांचा ताबा आहे. व मजजवळ स्थावर जंगम जीनगी आहे ती वडिलोपार्जित नसून माझे स्वतःचे कमाईची आहे. त्याजवर हक्क माझे मुलीचा आहे. तुमचा कांहीं एक नाहीं. तुह्मी आज ३० वर्षापासून नोकरीवर आहां त्याचे मालक तुह्मी आहां तुह्मी नोटीशींत लिहिले कीं ढोर बछडे तुमचे जवळ आहेत ते तुह्मी मजला खरेदी देऊन त्याचे पैसे तुह्मास दिले आहे. तुमचा मजजवळ कांहींच माल वगैरे नसून माझे इस्टेटीवर तुमचा हक्क नाहीं तुह्मी लिहितां कीं मी भ्रमिष्ट आहे हे खोटें आहे. मी हे जे वरील लिहिले आहे तें शुद्धीवर लिहिलें आहे. व ता० ९-४-१३ इ० रोजी वडिलोपार्जित घर, कारंजा येथील दि० मु० नं० ४२० सन १९१२ इ० फैसल झाला त्यांतही तुमचा हक्क नाहीं आणि तुह्मी मजजवळून ३०० रुपये नेले. व कागद लिहून दिला. ते बुडवावे अशा हेतुनें वाटेल तशी नोटीस देत आहा तेव्हां ते रुपये ८ दिवसांत द्यावे. नाहीं तर फिर्याद करून रुपये भरून घेतले जातील. व दत्तुसिंग यांस भाडे मागतां व खावटी मागता हेही खोटे आहे कारण तो आपले घरांत राहतो. व तो आपले खातो. तुमचे पगाराचें रुपये कांहीं खात नाहीं. तेव्हां हेंही मागणें खोटें आहे कळावें. ता० १०-४-१३ इ० दस्तुर यज्ञेश्वर सदासिव. सही

मुरतासिंग अजबसिंग रजपुत रा० कव्हळ ता० दारव्हा पोष्ट दारव्हा.

नो० नं० १४



## नोटीस

नोटीस बेशमी सीवनारायण अग्यारामजी मयत वारस पुत्र लक्ष्मीचंद सीवनारायण मारवाडी रा॥ दुकान वाहळ बु॥ तलुके बाळापुर जि॥ आकोला यांस खालीं सही करणार हीरा कडून नोटीस देण्यांत येते कीं माझ्या नवऱ्यानें तुमचे कर्ज घेऊन तुह्मास गहाणखत करून दिले त्या गहाणाचे एकंदर रुपये व्याज मुद्दल सुद्धां सुमारें २० २५ दीवस झाले चार मंडळी समक्ष चुक्ते केले त्यावेळीं गहाणखत परत मागितले असता खामगावीं असल्याचे सांगितले व त्यानंतरही सदरहु कागद तुह्मास १० ५ वेळ मागितला असतां तुह्मी मजला आज देतो उद्या देतो असें सांगितले करिता या नोटीसीनें तुह्मास कळविण्यात येते कीं तुह्मी नोटीस पावल्यापसुन ८ दिवसाचे आंत माझे गहाणखत परत करावे तसे न केल्यास वरिल कर्जा बदल मी अगर गहाण ईस्टेट जबाबदार नाहीं कळावे ता॥ १६।४।१३ ई॥

सही

गया मर्द नामा रा॥ वहाळ खुर्द द॥ बळवंत हिरामण वा॥ आकोला

नो० नं० १५

## नाटीस

नोटिस माध्या वल्लद जान्या माहार रा. टाकळी खोजबोळ ता. बाळापूर यांस

खालीं सहीकिरणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी १-१-१९१२ रोजीं साल खत लिहून दिले त्यापैकीं तुह्मी १०॥ महिने नोकरी करून नंतर ऐन हंगामाच्या वेळींच गैरहजर राहिला त्या एकमाहिना ११ दिवसा बदल दस्ताऐवजांतील शर्ती प्रमाणें दररोज ।. आणे प्रमाणें. नुकसान रुपये १८। व या नोटीसीचा खर्च ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांत मला देऊन पावती घ्यावी. तसे नकेल्यास कोर्टांत दावा करून सर्व रकम भरून घेईन कळावें तारीख १२ ४ १३ इ

सही

झाबुजी वल्द विठोबा पाटील रा. टाकळी खोजबोळ.

नो० नं० १६

## जाहिर नोटीस

सर्वत्रांस सविनय कळविण्यांत येतें कीं, आमच्या मालकीच्या दोन हवेल्या (पुला जवळची व ढेमन पुऱ्यांत असलेली) व एक चाळ श्री शिवचरण बोवाच्या समाधी जवळ असलेली विक्रीस काढल्या आहेत. ज्यांची इच्छा असेल त्यांनीं खालील पत्यावर पत्रव्यवहार करावा. कळावे.

सही

पंढरीनाथ रंगो तारे सिताबर्डी नागपूर

नो० नं० १७

## नोटीस

रा० रा० पंढरी विठोबा पाटील [illegible]णार वडशिंगी ता० जळगांव [illegible] बुलडणा यांसः

खालीं सही करणारा कडून नोटीस [illegible] जाते कीं,- माझा तुमचे दुकानीं अस[illegible] आज पर्यंतचा सर्व हिशेब माग[illegible] करितां मी ६-४ वेळां आलों अ[illegible] तुह्मी देत नाहीं. प्रत्येक वेळां कांहीं सबब सांगता. आपल्या हिशेबांत ब[illegible] घोटाळा आहे. वास्तवीक देण्यापेक्षां [illegible] पासून तुह्मास जास्त पैसा मिळाला अ[illegible] शिवाय गहाणखत, हुकूमनामा वगैरे मा[illegible] आजारी पणांत करून घेतलीं आहे[illegible] तुमची कोणतीही पावती विश्वासामु[illegible] मला मिळाली नाहीं. आणखी लोकाकडू[illegible] सोडविलेलीं गहाणपत्रकें आणखी काग[illegible] विश्वासामुळेंच तुह्माजवळ आहेत. तुह्म[illegible] मजकडून गहाणा पैकीं तुमच्याकडे राहिले[illegible] २०० रुपये मिळाले, आणि कापू[illegible] विकून ७०० रुपये परभारे दिले. मिळ[illegible] ९०० आणि त्याच प्रमाणें १००० रु[illegible] मागें आपणास दिले. त्या पैशाची पावती मला मिळाली नाहीं. शिवा[illegible] तुमच्याच ह्मणण्या प्रमाणे ४०० रुपयां[illegible] गहाणखत ही लिहून दिलें. हे स[illegible] आपण काय कशा हिशेबा प्रमाणें घेत[illegible] तो सर्व हिशेब ही नोटीस पावल्यापासू[illegible] १५ दिवसाचे आंत मला येथें येऊ[illegible] समजून द्यावा ह्मणजे आपले जर आणखी कांहीं पैसे निघतील तर मी देईन; माझे निघत असल्यास मला द्यावेत. असें न झाल्यास व आपण विनाकारण फिर्याद केल्यास कोर्टखर्च मी भरणार नाहीं आणि माझ्या जास्त पैशाबद्दल मी फिर्याद केल्यास आपणास खर्च द्यावा लागेल तरी मुदतीपलीकडे गोष्ट न जावी गेल्यास योग्य तजवीज केली जाईल कळावे.

सही

यादव तुकाराम बाजारी निमगांव

नो० नं० १८

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं माझी बायको नामें भागाई मर्द कुकाजी घेत्रे कुणबी राहणार मौजे दिग्रस बु॥ तालुका बाळापूर ही गंधर्वाची असून ती माझे मनोदया प्रमाणें वागत नाहीं. ती हल्लीं गांवांतच आपले आई बापाचे घरीं राहते तिजला मी वागविण्यास तयार असून तिची वागणुक बरोबर नाहीं. करून ती आपले बापाचे घरीं राहते तरी तिजला कोणी कर्ज वगैरे देऊं नये. दिल्यास त्याची जबाबदारि मजवर नाहीं. त्याची देण्याची जबाबदारी तिचेवर आहे. करितां तिजला कोणी कांहीं पैसा वगैरे देऊं नये. करितां जाहीरखबर दिली आहे. कळावे ता० १०-४-१३ ई०

दस्तुर यज्ञेश्वर सदाशिव

सही

कुकाजी तुकाराम घेत्रे कुणबी निशानी खुद्द हातची रे[illegible] असे—

नो० नं० १९

Registered NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष. ४७ ] आकोला—— सोमवार तारीख २८ माहे एप्रिल सन १९१३ इ० [ अंक १६

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपय
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील-
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीस त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. मागुन येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

**मुंबई व्यांकेची सेव्हिंग व्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई व्यांक आकोला ९।१०।१ G. A. Phillips. एजंट
नं १

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २९¾ तोळे असतें.

साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१-९-१० G. A. PHILLIPS. एजंट
नो० नं० २

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळया**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १८

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिळाफ करून बनविलें आहे. किं. ४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली खरूज याचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ३

### अगदीं नवीन तऱ्हेचें अत्यंत मनोरंजक मासिक पुस्तक ' ज्ञानांजन '

यांत आजकाल घडत असलेल्या खऱ्या खऱ्या गोष्टी, बड्या लोकांची कारस्थानें, भूतविद्या, शास्त्रीय शोध इ. विषय येतील. **यांतील सामाजिक लेखांमुळें महाराष्ट्रांत मोठी खळबळ उडून जाईल.** येत्या ता० १९ मे पासून हे मासिक प्रसिद्ध होईल वर्गणी १। रु. नांवें नोंदवा

पत्ता { ज. र. आजगांवकर, भांग्वाडी, नं २ मुंबई,

नो० नं० ४

### —सीतागीत—किं. २ आणे

शाळा खात्यानें मंजूर केलेलें, मनोरंजन, केसरी, आनंद वगैरेनीं उत्तम अभिप्राय दिलेलें, मुद्दाम स्त्रियांकरितां सोप्या व चटकदार चालीवर रचलेलें.

अर्धाच आण्याची तिकिटें पाठवून मागवा.

**कर्ताः**--- गणेश दिनकर आठवले मास्तर हायस्कूल आकोला [ वऱ्हाड ]

नो० नं० ५

## निराश्रित बालरक्षण गृह

सर्वत्र जनसमाजास अल्प मतीनें व अज्ञान बुद्धीनें व नम्रतेनें जाहीर करण्यांत येते कीं ज्या ज्या ज्ञातींत पुनर्विवाहाची वहिवाट नाहीं त्या त्या ज्ञातींत वैधव्याचें प्रमाण दिवसें दिवस वाढत चाललें आहे यामुळें गर्भपात बालहत्यादी पातकें कशी होतात व त्यांचा परीणाम पातकी व त्यांचे संसर्गी लोकांस कसा भोगावा लागतो व सदरील संबंधानें अनीवार्य संकटांत पडल्यामुळें त्यांना किती दुःखें सोसावीं लागतात. ते तपसीलवार लिहिण्यांत अशक्य आहे. तरी थोडक्यांत त्याचा परीणाम इतकांच आहे कीं ईश्वरापुढें पातकी, सरकारपुढें गुन्हेगार, व आपआपल्या ज्ञातींत अनेक प्रकारच्या दोषास पात्र व घरांतील आप्त वर्गास स्वतः डोळ्यावर झांकण टाकून कानाडोळा कसा होतो याचा विचार प्रत्येकांनी स्वतःच करावा. या सर्व गोष्टीविषयीं जगनियंत्या परमेश्वरानें माझें मनांत संचार केल्यामुळें वर दर्शविलेल्या संकटांतून निभावण्याकरितां आकोला ताजनापेठेंत हनुमान वस्तींत मारुतीचें देवळाजवळ **निराश्रित बालरक्षण गृह** स्थापन केलें आहे. भाड्यानें घेतलेलें घर केव्हां सोडावें लागेल याचा निश्चय नसतो या करितां मुद्दाम विकत घेतलेलें घर या कामीं अर्पण केलें व वर दर्शविलेल्या नांवाची फळी त्या ठिकाणीं लावलेली आहे. या कामीं संचार करणारा व प्रत्यक्ष हातानी करविणारा व अशा कामीं सर्व प्रकारें निरंतर यश देणारा जगनियंता परमेश्वरच समर्थ आहे.

आपलें अज्ञान बालक जी. श्रीमंतातर्फे
म्यानेजर विष्णु प्रभुराम पेन्शनर
हायकोर्ट पिटिशनरायटर
ता० १६-८-१२ आकोला वऱ्हाड
नो. नं. ६

### वऱ्हाडांत खात्रीची उत्तम नवीन सोय.

### खरे गारेचे थंडचष्मे

आम्हीं मुद्दाम वऱ्हाडच्या लोकांकरितां हल्लीं तणामन सर्व तऱ्हेच्या फ्रेमीसहित **खरे गारेचे थंड चष्मे माफक दरानें** विकण्याचें दुकान काढलें आहे. **मुंबई** वगैरे मोठ्या ठिकाणच्या भपक्यावर मंडळी कशी फसतात हें सर्वांना श्रुतच आहे सर्व गरजूनीं अनुभव घेऊन पहावा.

**गोपाळ पांडुरंग आणि कंपनी**
नो० नं० ७ आकोला

उन्हाळ्याकरितां

## लिमलेटच्या वड्या

१६ वड्याचे बाटलीस ८ आणे पो. खर्च माफ. ६ बाटल्या घेणारास एक बाटली फुकट. खात्री करितां एकच मागवा.
डि. व्हीं. राजवाडे बुधवार पेठ पुणें सिटी
नो० नं० ८

अपूर्व लाभ ! अपूर्व संधी !! अपूर्व संधी !!!

### उत्तम कलप.

जर तुम्हाला तरुण दिसावे अशी इच्छा असेल तर आमचा कलप वापरा. त्या योगें केंस काळे कुळकुळीत होऊन ते पुनः पांढरे होत नाहींत इतकेंच नाहीं तर त्या पासून केंस रेशमासारखे मऊ होतात. पुष्कळ श्रीमंत लोकांनीं आमचा कलप वापरून अनुभव पाहिलेला आहे एक पेटी ६ महिने पुरते. त्याच्या उपयोगापुढें किंमत फारच स्वस्त म्हणजे दर पेटीस फक्त १ च रुपया ठेविला आहे. ट. ह. निराळा

आमचा **पत्ता**

**म्यानेजर खिजाबे-लाजबाब फ्याक्टरी मुंबई नं. ३**

नो० नं० ९

### रामबाण उपाय.

### रक्तपिती व कोड

दहाहजार पुड्याफुकट. आम्हीं आमच्या औषधाची खात्री पटावी म्हणून १०००० नमुन्याच्या पुड्या करण्याचें योजिलें आहे या पुड्या वरील महारोग दुरुस्त होण्यासारख्या आहेत. हे त्या निःसंशय सिद्ध करितील. या पुड्या वापरून अनुभव पहावा म्हणजे खात्री होईल. नमुन्याच्या पुडीची किंमत फक्त ८= ठेविली आहे. ही किंमत फक्त टपाल हशील वगैरे खर्चापुरतीच आहे

२ आम्हीं रक्तपिती, कोड, हे कसे उद्भवतात त्याची शुश्रुषा कशी करावी? वगैरे माहितीचे इंग्रजी व बंगाली भाषेंत पुस्तक तयार केलें आहे तेंही पण गरजूनीं अवश्य वाचण्या लायक आहे. म्हणजे त्या पासून त्वचे संबंधीं रोगाची पूर्ण माहिती होईल किंमत फक्त ट. ख. सह ॥= सर्व पत्र व्यवहार इंग्रजींत करावा.

पंडीत कृपाराम
८ नंदीबागनलेन पो सालकिया जि. हावरा.

नो० नं० १०

## सुमती पत्राच्या वर्गणीदारास एक सवलत.

### प्रतिभा.

वरील नांवाची कादंबरी श्रीयुत बाबू अवीनाशचंद्रदास एम० ए० बी० एल० यांची वंग साहित्यांत अत्यंत श्रेष्ठ पद पावलेल्या ' कुमारी ' नामक कादंबरीचा आनुवाद आहे, एवढें सांगितले असतां ही कादंबरी किती मनोहर आहे हें निराळें सांगण्याची कांहीं आवश्यकता नाहीं. प्रस्तुत कादंबरी सुमती पत्राचे एप्रील अखेर वर्गणीदार होणारास [illegible]म्या ( ८१० ) किंमतींत देण्याचें योजिलें आहे. प्रती बेताच्याच काढावयाच्या असल्यामुळें या सवलतीचा फायदा घेऊं इच्छिणारांनीं खालील पत्त्यावर नावें नोंदविण्याची त्वरा करावी. इतरांस एप्रील अखेरपर्यंत नांव नोंदविल्यास ट० ख० सह १८४ सवा रुपया.

सुमती हें पत्र दर सोमवारीं प्रसिद्ध होत असून यात निडवक लेख, वर्तमानसार, मनोरंजक आणि आश्चर्य कारक गोष्टी येत असून चालू साल्च्या जानेवारी महिन्या पासून ' अंजनासुंदरी ' नांवाची एक चटकदार कादंबरी चालू आहे. वार्षीक वर्गणी ट० हा० सह २ रु० तरी ' एक पंथ दो काज ' या ह्मणी प्रमाणें या पत्रास वर्गणीदार होऊन वरील सवलतीचा फायदा घेण्याची वाचकांनीं कृपा करावी.

म्यानेजर-सुमती वर्धा. ( सी. पी. )

नो. नं. ११

---

## जाहीर नोटीस

ती० जानकाई मर्द परशराम न्हावी रा० अनवी मीरजापूर ता० आकोला

इसः—

खालीं सही करणार याजकडून या जाहिर नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं माझा चुलता मयत परशराम आणि माझा बाप भवानी हे सख्खे बंधु असून त्याची वडिलोपार्जितची स्थावर जगम जीनगी कादिमपासून एक ठिकाणीं आहे. माझा बाप मरण पावल्या नंतरहि माझा चुलता परशराम आणि मी एकत्र होतो फक्त घरांत बायाबायांचे जमत नसल्यामुळें चुली वेगळ्या वेगळा होत्या माझा चुलता परशराम मेल्या नंतर त्याचे हिस्याचे सर्व स्थावर जंगम जीनगीचा वारस या नात्यानें आह्मी मालक आहों. आणि कायद्यानें तुमच्या हयाती पावेतों अन्नवस्त्राचा हक्क आहे असें असून तुह्मी आतां दुसऱ्या लबाड लोकांच्या नादानें ह्या सर्व स्थावर जीनगीची नासधुस करण्याच्या विचारांत आहा असें मी ऐकतों. एवढेंच नाहीं तर मौजे राजापूर ता॥ आकोला येथील शेत सर्वे नं० ९ यातील आणे ८९८४ पै चा हिस्सा व सर्वे नं० ९२ पैकीं २ हे शेत विक्रण्यास काढले आहेत. तर ही जमीन तुह्मास कायद्यानें विकता येत नाहीं. तुमचा फक्त हयाती पावेतों अन्नवस्त्राच्या रुपानें उपभोग घेण्याचा हक्क आहे. या जीनगी संबंधानें तुह्मी कोणताही दस्ताऐवज कोणास करून दिल्यास तो दस्ताऐवज रद्द आहे त्याचा बोजा जीनगीवर लागू होणार नाहीं ही नोटीस दिली. सही आकोला ता० २०-४ १३

सही

१ मानाजी वल्लद भवानी न्हावी नीशाणी खुद हातची रा० अनवीमिरजापूर ता० आकोला पोष्ट बोरगांवमंजू

१ रायाजी वा॥ पुंजाजी न्हावी मानाजी भवानी नीशाणी खुद.

नो० नं० १२

---

## नोटीस

१ चंद्रभागा मर्द नथु काकड

२ शेंगाई मर्द बापु काकड उभयता राहणार मोरगांव ( भाकऱ्याचे ) ता० आकोला यांस--

या जाहिर लेखानें कळविण्यांत येतें कीं तुह्मी उभयतां अनुक्रमें माझ्या पुतण्याची विधवा व भावजय अशा आहां सर्व जिनगी एकत्रपणांतली व बहुतेक मी संपादलेली आहे माझा धाकटा भाऊ बापु हा मरण्यास २९-३० वर्षें झालीं. नथु मोठा झाल्यावर जिनगी वाढविण्याच्या हेतूनें आणि नथुला रोजगारधंदा समजावा ह्मणून त्याला निराळे ठेवून मी त्याच्याकडे निव्वळ वहिवाटी साठीं ह्मणून मोरगाव येथील सर्वे नं. ८२ शेत त्याच्याकडे ठेविले आणि बाकीच्या शेती मध्यें तो माझ्या बरोबरच वाहीपेरी करूं लागला. आतां नथु दीड महिन्यापूर्वी मरण पावला. इतक्यांतच तुह्मी जिनगीची अफरातफर मांडली आहे. सध्यां शेंगाईनें आपला भाऊ व बहिण घरीं आणीली आहेत. गोऱ्हा, ४ बैल वगैरे विकून टाकले आहेत. हा वर्तनाचा क्रम फार घातुक आहे. दागदागीना व रोख रुपये मिळून दोन हजाराचा ऐवज तुमच्या पाशीं आहे. त्याचा तुह्मी हिशेब द्यावा आणि त्याबद्दल पुंडलीक वा॥ जानजी यांसही मी जबाबदार धरीन. तुह्मी उभयतां अन्नवस्त्राच्या मालकीण आहां. तुह्मी माझ्या जवळ गुण्यागोविंदानें रहाल तर तुह्माला कांहीं कमी नाहीं. तुह्माला शेतीवाडी वगैरे विकण्याचें कांहींच कारण नाहीं. या उपर तुह्मी जर कांहीं इस्टेटी संबंधानें व्यवहार कराल तर तो बातल व रद्द असून त्याची जोखीम जिनगीवर राहणार नाहीं. ज्याचा तो जबाबदार राहील कळावें ता० २०-४-१९१३

सही

खंडू वा॥ विठोबा काकड पाटील रा० मोरगांव ता० आकोला

नो० नं० १३

---

## जबाबी नोटीस

नोटीस वेशमी कवशी मर्द पंढरी ध्यार राहणार नांदखेड ता० आकोट हल्लीं रा. अन्वी ता० आकोला

इसः —

खालीं सही करणार यांजकडून नोटीसीचा जबाब देण्यांत येतो कीं तुं मजला नोटीस नं. १९ ता० १९।३।१३ इ० ची दिलेली बनावटी कागदाची असून या नोटीसीपासून मजला धास्ती पडून मी फारकत ध्यावी ह्या हेतूनें खोटी लिहून पाठविली आहेस ही तुझे आंगची समजूत नसून दुसऱ्याचे सांगण्यावरून तु आपले संसाराची माती करून घेत अहेस व तुझा नांदण्याचा हेतू दिसत नाहीं वास्तविक पाहतां गंधर्वास आठ वर्षे होऊन माझे घरून जाण्यास तीन वर्ष होत आलें आहेत. दरम्यान मध्यें बरेच वेळ मी व आणखी गांवातील संभावित लोक नेण्यास आलो परंतु तं लपून राहिलीस त्यांत दोन वेळ तुजला मी धरलें तेव्हां नांदण्यास येण्याचा करार करून गेलीस तरी आज पावेतो अली नाहीस व वरील नोटीस नं. १९ ची दिलीस या नोटीसीचेद्वारें तुं माझी बरीच अब्रु घेतलीस. नोटीसीप्रमाणे तूं खरें करून दाखविल्यास ठीक पडेल नाहीं तर तुजवर फौजदारींत काम चालवीन फारकती शिवाय तुजला गंधर्व करतां येत नाहीं वेल्यास तूं व जो गंधर्वाचा नवरा करशील असें उभयताना ही जबाबदार धरलें जाईल दुसऱ्याचे सांगण्यावरून तुझे हातून असे अनन्वीत कृत्य घडून येउ नये ह्मणून आ[illegible] नोटीसीनें तुझे नोटीसीचा जबाब दिला आहे मी तुजला नांदविण्यास तयार अ[illegible] तुजला नांदण्याचे असल्यास ही [illegible]टीस पावले तारखेपासून १९ दिवसाचे आंत तुझे अंगावर असलेलें माझे सोन्या चांदीच्या दागीन्यासह माझे घरी येऊन नांदावें वरील मुदतींत असे घडून न आल्यास पुढें काम चालवून कोर्ट मार्फत तुजला [illegible]टून आणिन असें होऊं नये ह्मणून [illegible]टीसीनें कळविलें आहे व तुझे आईने [illegible]जपासून खाण्याकरीतां रोख रुपये [illegible]६ पंचविस हातउसने नेले त्याजला हे चार वर्षे झाले मजला तुझे आईनें आणून दिले नाहीं तेही समागमे आणावें कळावें तारीख २१ माहे एप्रिल सन [illegible]१३ इ.

स[illegible]

पंढरी वा॥ निंबाजी रहणार नांदखेड ता. आकोट हल्लीं आकोला नी० खुद

नो० नं० १४

---

## नोटीस

ती० रा० रा० परशराम वा॥ मा[illegible] पटील रा० हिंगणे उंबरे ता० खामगांव

यांसः—

मी तुमचा चिरंजीव आहे. पण मला दत्तक घेतल्या नंतर अलिकडे अलिकडे तुमच्या चित्ताची चळ विचल दिसते. तुह्मी जिन्नगीची अफरा तफरा करूं पाहात आहां आणि दुष्टत्वानें सर्व जिन्नगी गमवून कर्ज वाढविण्याचा तुमचा हेतु आहे असे सांप्रतच्या वर्तनावरून दिसतें बहुतेक सर्व जिन्नगी आज्याच्या हातची आहे तेव्हां तुह्माला माझ्या संमती शिवाय जिन्नगीची देवघेव करितां येणार नाही आणि जर कोणी तुमच्या बरोबर परभारे देव घेव करिल तर तो व्यवहार माझ्या जिन्नगीवरील हिस्सा संबंधानें बातल व रद्द आहे असें समजावें. तुह्मी मेहरबानी करून जिन्नगी कायम ठेवण्याची कृपा करावी. कळावे. ता० १६।४।१३ इ

सही

सीताराम परशराम पाटील रा० हिंगणें उंबरें ता॥ खामगांव

नो० नं० १५ निशानी

---

## नोटीस

नोटीस वेशमी १ फुल्या वा॥ नाण्या माहार २ मन्या वा॥ दरबाऱ्या महार ३ मामुऱ्या उर्फ श्रावण्या वा॥ बध्या महार ४ सटव्या वा॥ बनशा महार ५ गण्या ॥ उकड्यो महार

यांसः --

खालीं सही करणार नोटीस देतो कीं तुह्मी माझे मालकीचे शेत मौजे चिंचोली येथिल स नं० १४ ए० ११४८ अ० २३ खाते गोवर्धन हे शेत ता० ८ ४ १९११ रोजीं २०० रुपयामध्यें तीन वर्षे तुह्मी माझेपासून पट्यानें घेतलें आहे. व हा दोनशे रुपयाचा पट्याचा भरणा माझे पासून तुह्मी उलट परत नेऊन याच दिवशीं मला एक प्रामेसरी नोट करून दिली आहे. सदरहु शेत आज पर्यंत रेवाजी ओंकारजी यानें जबरदस्तीनें वाहिल्या मुळें त्याजवर मी फिर्याद करून कोर्ट मार्फत ताबा मिळविला आहे. तरी तुह्मी आंता सदरहु शेत वरील प्रामेसरी नोटीची सव्याज फेड करून वाहण्यास आपले ताब्यांत घ्यावे. प्रामेसरी नोटीची फेड करण्या करितां तुह्मी माझे ताब्यांतून शेत जबरदस्तीनें घेतल्यास तुमचेवर फौजदारी करण्यांत येईल. तरी प्रामेसरी नोटीची फेड तुह्मी ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसांत करावी. न केल्यास कायद्या प्रमाणें तजवीज करण्यांत येईल. कळावें आकोला ता० २१-४ १३ इ०

सही

गोवर्धन पन्नालाल मारवाडी राहणार मौजे चिंचोली रुद्राई ता० व जिल्हा आकोला.

नो० नं० १६

---

## नोटीस

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार जइ कडून विनंती कीं माझा नवरा मारुती सतमाळी यास २९—३० वर्षे झाले आहेत आणि मी माझे जिनगी करितां दत्तक घेण्याचे हरी वा॥ पिकाजी माळी यास योजून त्यास मी मजजवळ ठेविलें यास ५—६ वर्षें झाले मुलाची चालचलन पाहून त्यास दत्तविधान व दत्तपत्र करून घेऊन दत्तक करावयाचे मी योजिले परंतु मुलाची चालचलन चांगली नसल्यानें व तो मला बरोबर वागवील अशी उमेद नसल्यानें मी त्यास आतां दत्तक घेऊं इच्छीत नाहीं सदरहु मुलगा मजजवळ होता ह्मणून कोणी माझे करितां त्यासी पैशाचा व्यवहार करूं नये अगर केलें असेल तरी माझेवर व माझे जिनगीवर मुळींच हक्क चालणार नाहीं. कळावे ता० १४-४-१३ इ०

सही

ठमाई मर्द सतमाळी इचा बांगडी असे

नो० नं० १७

## नोटीस

नोटीस बेशमी दाउ वलद झीतऱ जात कुणबी अडनाव खामणकार राहणार मौजे निळापुर प्रगणे वणी तालुके वणी जिल्हे येवतमाळ यास खाली सही करणार याज कडुन नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आमचे साक्षात बाप असोन तुमचे पासी वडिलोपार्जित ईस्टेट आजाचे वेळची आहे ती मौजे निळापुर येथील सेते तीन आणि घर व कोठा शिवाय जंगम माल बैल ६ गाई १० व सोने चांदीचा माल आणि तांबे पीतळेची भांडी व लाकडी सामान वगैरे असोन तुह्मी सदरहु ईस्टेटीचा हिसा मजला न देतां घरा बाहेर काढुन दिले व हल्ली असे समजते कीं मजला हिसा न देतां सर्व इस्टेट माझा धाकटा भाउ सभा वलद दाउ हा तुमचे पासी आहे त्यास सर्व जिन्नगी देऊन सेताचा वगैही त्याचे नांवचा करून देता असे कळतें परंतु एकंदर स्थावर जंगम इस्टेटी मधे मझ निमे हिसा आहे तो मजला देऊन माझी फारकती ध्यावी असे तुमचे कडुन न झाल्यास दिवाणी कोर्टात फिर्यादी करून आपला हिसा घेईन व मजला हिसा न देता भावास सर्व जिन्नगी दिल्यास हे करणे कायदे शीर होणार नाहीं व नोटीस पावल्या पासुन कोणतेही इस्टेटीची आफरा तफरा करूनये अगर कोणी घेतल्यास त्य जबर माझे हिशाची जबाबदारी राहील व आजपर्यंत तुह्मास फक बीठोबा वलद काशिनाथ हेपट याचें कर्ज देणे आहे या शिवाय कोणाचें नाहीं तर मजला हिसा दिल्यास मी निमे कर्ज हल्लीं देण्यास तयार अहे तरी ही नोटीस पावल्या पासून १५ दिवसाचे आंत मजला जबब द्यावा न दिल्यास पुढे कोणतेच प्रकारची जबाबदारी ऐकीली जाणार नाहीं ही नोटीस दिली असे ता० १७।४।१३। ई०

दस्तुर धोंडो सखाराम पेनशनर नाजर राहणार वणी.

सही

शंकर वलद दाउ कुणबी खामणकार राहणार निळापुर याचे हातची निशनी असे दस्तुर धोंडो सखाराम

नो. नं.

## नोटीस

चि० रा० रा० गोपाळ कृष्ण काळे व काशिनाथ कृष्ण काळे राहणार अकोले

यांसः—

मी खालीं सही करणार ईजकडुन नोटीस देण्यात येते कीं तुह्मी मला तारिख १९ २ १९१३ ईसवीरोजीं अन्न वस्त्राचा लेख लिहुन दिला त्या अन्वयें मागच्या सालचे रुपये ७५ पाउणशे व या चलुं सालचे रुपये ७५ पाउणशे एकूण रुपये १५० दिडशे मला तुमचे कडुन घेणे आहेत. करितां ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आत रुपये देऊन माझी पावती ध्यावी तसें न केल्यास कराराशीर रुपये न दिल्यामुळें नुकसानी दाखल व्याज दरमहा दर शेकडा दोन रुपये प्रमाणें व या नोटीसाच्या खर्चा सह दिवाणी कोर्टात दावा करून रुपये तुमचे कडून वसूल केले जातील कळावें ता० २१।४।१९१३ ई० दस्तुर दत्तात्रय वामन पी०रा० आकोला

सही

लक्ष्मीबाई जवजे गोविंदराव काळे निशाणी खुद्द

नो० नं० १९

## नोटीस

नोटीस बेशमी विठल कनयालाल लोहार रा० मुकळी जाहगीर पो० आर्णी ता० दारव्हा यांस

खालीं सही करणार याज कडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुह्मास ता० १२-३-१९१३ इसवी रोजीं कुलमुखत्यारपत्र दिलें व ते अ० नं २ ला दिग्रस स० र० कचेरींत खरें केलें आहे तें मुखत्यार पत्र ता० १२-४-१३ ई० पासून रद्द केलें आहे तरी तुह्मी कोणतेच तऱ्हेचा व्यवहार करू नये केल्यास रद्द असे ही नोटीस दिली. कळावे ता० १३ ४-१३ ई.

सही

चिमणभार्थी गुरू गोविंदभर्थी मुकळी याचे हातची निशानी असे

नो० नं० २०

## नोटीस

रा० रा० पुरुषोत्तम महेतुलाल पांडे आकोट

यांसः—

खालीं सही करणार याजकडुन नोटीस देण्यांत येते किं मी तुह्मास माझे तर्फे शेती पहाण्यास व देण्या घेण्याच्या कमासाठीं कोर्टात माझे तर्फे हाजर रहाण्यास मुखत्यार नेमले होते हल्लीं कांहीं काम नसले मुळें मजला मुखत्याराची जरुरी नाहीं करितां तुह्मास दिलेले जनरल मुखत्यार पत्र रद्द केले आहे

लक्ष्मी नारायण गंगा प्रसाद दस्तुर खुद्द आकोट.

सही

गवरा बाई जवजे गंगाप्रसाद दस्तुर खुद्द

नो. नं. २१

## नोटीस

नोटीस बेशमी सारजी मर्द भिवा गोधेतेली रा. बोरगांव मंजू ता. अकोला ईस—

खाली निशानी करणारा कडून नोटीस देण्यांत येते कीं त्वां वऱ्हाड समाचार अंक ११।१९१३ मध्यें जी नोटीस दिली ती खोटी असून मी तुला ४—५ वेळ नेण्यास आलो. परंतु तूं आली नाहींस तूं माझे घरून अंगावर सुमारे २५० रुपयाचे दागीनें सोन्याचांदीचे नेलेस तें तुझे बापानी अफरातफर केलेस दिसते व समजतें. मी तुला वागविण्यास तयार आहे. तरी आज तारखेपासून १५ दिवसांचे आंत त्वां मझ्या दागीन्यासह माझें घरीं निघून यावें. नाहीं पेक्षा कोर्टाकडून तुझा ताबा मिळवून दागीन्या बद्दल तुझे बापावर फिर्याद करण्यांत येईल. मी कवठ ता. मोर्तिजापूर येथें असल्यानें मला तुझी नोटीस पावली नाहीं. परंतु घरच्या माणसांनीं ती परत केली सबब मुदतींत उत्तर देतां आले नाहीं. माझे घरीं नांदण्याचे तुझे मनांत नाहीं ह्मणून तूं ही खोटीं कारणें दाखविलीं आहेत. तरी वरील मुदतींत वर प्रमाणें व्यवस्था नझाल्यास तुला व तुझे बापाला जबाबदार धरण्यांत येईल कळावे- ही नोटीस दिली. ता. २०-४-१३ ई.

सही

भिवा व. अर्जुन गोधेतेली रा. मनभा याचा आंगठा

नो० नं० २२

## नोटीस

नोटीस बेशमी नथू वलद मुकाजी कसूरकार कुणबी रा० पंचगव्हाण ता० आकोट

यांस—

खालीं सही करणारा कडून नोटीस देण्यांत येतें कीं मौजे पंचगव्हाण पेठ औरंगपूर ता० आकोट येथील जागा बांधलेली वीटांची खांब २४ पू० प० हात २४ द० उ० हात १५ ( अजमास ). दर्शनीय भाग पश्चिमेस आहे ही जागा मजजवळ खरीदी असून तुमचे आईस राहण्यास दिली होती. व तीन शेतें सर्वे नंबर ६५।७८।७२ यांतील निम्मा हिस्सा हे तुमचे आईस मरेपर्यंत खाण्यास दिले होते. ती तुमची आई सांप्रत मरण पावल्यामुळें ती जागा आतां आमचे ताब्यांत द्यावी. या घराबद्दल अगर वरील शेता बद्दल अफरातफर केल्यास तुमचेवर योग्य कोर्टांत दावा करण्यांत येईल. कळावें ही नोटीस दिली. ता० २४ एप्रिल सन १९१३ ई०

सही

मारूती नारायण आप्पा रा० निंबा द० खुद्द.

नो० नं० २३

## जाहिर नोटिस

सर्वत्र लोकांस या नोटीशी द्वारें जाहिर करण्यांत येतें कीं, मौजे मनात्री खुर्द ता० आकोट येथील शेत सर्वे नंबर ६५-७८-७९ यांतील निम्मा हिस्सा व शेते सर्वे नं० १८।६२ ही शेतें सालीम व मौजे पंचगव्हाण पेठ औरंगपूर ता० आकोट येथील जागा विटाची बांधलेली खांब २४ ही जागा आह्मांस नथु मुकाजी कसूरकर यांनीं आह्मांस विकण्यास अजमास ५ वर्षे झालीं. व वृत्त पत्रांतून त्यांनींच आमचे कबज्यांत वरील इस्टेट दिल्या बद्दल जाहिर खबर दिली. तरी सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं वराल इस्टेटी संबंधी कोणतेच प्रकारें कोणी त्याजपासून लेख करून घेऊं नये. घेतल्यास त्या बद्दल घेणारा जबाबदार राहून त्यावर योग्य तजवीज केली जाईल कळावें ही नोटीस दिली ता० २४ एप्रील सन १९१३ ई०

सही

मारूती नारायण आप्पा रा० निंबा. द० खुद्द

नो० नं० २४

## नोटीस

नोटीस बेशमी १ डलू बाळाराम मारवाडी

२ नारू किसन तेली

३ पांडु निंबाजी तेली

४ भिकू व रामचंद्र वा॥ नारू शिंपी अ० पा० करणार गंगाई मर्द नारू शिंपी राहणार पंचगव्हाण तालुका आकोट

यांसः—

खालीं सही करणारा कडून नोटीस देण्यांत येते कीं आमची जमीन मौजे मनात्री खुर्द ता० आकोट येथील शेत स. नं. ६५ सर्वे नंबर ७८ शेत सर्वे नंबर ७९ या तिन्ही नंबरांतील एक द्वितियांश हिस्सा व शेत सर्वे नंबर १८ व शेत सर्वे नंबर ६२ हे सबंध नंबर ही जमीन तुमचे कडे पट्यानें होती. व त्या पट्याचे पैसे तुमचे कडून येणें आहेत. व तुमचे गहाणाचे पैसे आह्मास देणें आहेत पट्याचे पैसे आह्मास देऊन गहाणाचे पैसे आपण मागून घ्यावे अशा बद्दल नथु मुकाजी कसुरकार यानें तुह्मास नोटीस दिली होती. त्या नोटिशी प्रमाणें तुह्मी कांहींच केलें नाहीं. तर ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसाचे आंत पट्याचे पैसे वजा जातां जे आपले गहाणाचे पैसे फिरतील ते निंबे येथें येऊन घेऊन जावे. अगर नोटिशीनें मागणी करावी. ही नोटीस दिली. ता० २४ एप्रील सन १९१३ ई.

सही

मारुती नारायण आप्पा दस्तुर खुद्द राहणार निंबे

नो० नं० २५

## नोटीस

नोटीस बेशमी रामु व० खंडुजी बोरोकार राहणार उमरा तालुके खामगांव जिल्हा बुलढाणा.

यांसः—

नोटीस देणार हाजी अबदुल लतीफ वल्द हाजी उसमान कछी दुकान पेठ बाळापुर नोटीस देतो ऐसाजे कीं मौजे उमेर येथील शेत सर्वे नंबर ६ एकर गुंठे १३ ८३५ आकार रुपये २६ यांतील एकत्रीतीयांशचा हिस्सा ह्मणजे ८५८४ चा हिस्सा आह्मी खरेदी घेतला आहे व ताबाही आमचा आहे हे शेत आह्मी विकण्यास तयार आहो जर करितां हें शेत तह्मास खरेदी अगर पट्यानें घेण्याचे असल्यास तुह्मी आमचे दुकानावर येऊन आमच्यासी भेटून आमचे सल्लयानें पट्टा वगैरे करुन ध्यावे जर करितां असे न केल्यास आह्मी नुकसानी बद्दल रुपये २०० भरून घेऊ आमचे परवानगीनें या शेतांत जाऊंनये असी आपणास नोटीस दीली आहे ही नोटीस दिल्यापासून आठ दिवसाचे आंत आह्मास कळवावे कळावे ता० २३।४।१९१३ ई.

सही

हाजी अबदुल लतीफ हाजी उसमान दस्तुर मुखत्यार गुलाम यासीन अबदुल गफूर

नो० नं० २६

### ब. महाजनि व मुलांचें शील

याच्या **आनंद** मासिकाच्या संपदकांस
ा वर्ष—प्रतिपदेच्या मुहूर्तानें मी दोन
पाळीनें ह्मणतों ते कोणते पाळावे
ाकरून सांगा. हे मी स्वतः पाळीन
पाळावयास आपल्या सोबत्याचें मन
न" असें पत्र कोणा एका मुलानें
. त्याचें उत्तर त्यांनीं स्वतः न
"आपल्यापेक्षां वयानें, विद्वत्तेनें
ारानें व इतर गुणांनीं श्रेष्ठ अशा"
क गृहस्थांस द्यावयास विनंती केली.
ब. महजनि ह्यांनीं एक सुंदर पत्र
जे दोन उपाय सुचविले आहेत
ामच्या बाळ व थोर वाचकांसाठीं
पुढें देतों:—

आमच्या पूर्वीच्या ऋषींनीं पांच सहा
वर्षांपूर्वी बाळांकरितां घालून दिलेल्या
ांतले हे पहिले दोन होत. नवीन
त नाहीं.

नियम १—**सत्यवंद**=सत्य (खरें) बोल
" २—**धर्मचर**=धर्मानें वाग.

सत्यानें सर्व जगाचें रहाटगाडगें चालतें,
न मुक्तेश्वर कवि ह्मणतात—

**ापरता नाहीं धर्म। सत्य तेंची परब्रह्म॥**
**ापाशीं पुरुषोत्तम। सर्वकाळ तिष्ठत॥**

सत्य बोलायला धैर्य लागतें. आपल्या
न घडलेला अपराध वडिलांच्या नजरेस
यावा व त्याचें रागें भरणें किंवा
चुकावा, ह्मणून पुष्कळदां भीतीनें
खोटें बोलतात. ही घसरणीवरील
ली ठेंच. वेळीं कोणीं तरी सांवरिलें
ठीक. नाहींतर शेवटीं कडेलोटाचा
ग यावयाचाच!

**सत्य बोल**"—यांतच "सत्य समजून
" व "सत्य शोधण्याकरितां श्रम घे"
आलें. निदान आपल्या समाजाविरुद्ध
लूं नकोस. हें अवश्य. "सत्य बोल,"
तच "सत्य आचार," हेंही पण आलें.
लावें एक, करावें दुसरें — हें झालें
ा — दांभिकगिरी. बोलण्या प्रमाणें आचरण
णें तरवारीच्या धारेसारखें आहे.

हें व्रत प्रथम फार कठीण जातें. खोटें
ालण्याची व खोटें आचरण्याची संवय
कदम जात नाहीं. ह्मणून दिवसांतून आपण
कतीदां खोटें बोललों खोटें वागलों, याचें
निजते वेळीं स्मरण कर. खरें बोल-
ाचा व वागण्याचा निश्चय दृढ कर,
शी ईश्वरापाशीं करुणा भाक, ह्मणजे
ही वाईट संवय मोडून सत्यावर तुझें
खंड प्रेम जडेल.

"**धर्मानें वाग.**" धर्म या शद्बाचा अर्थ
ार मोठा आहे. तूर्त त्यांतला एक भाग
र्वांना पसंत आहे तो सांगतो —

**तूं दिवसांतून निदान एक दोनदां दुसऱ्याच्या उपयोगीं पड.**

उपयोगीं पडण्याचे पुष्कळ प्रकार आहेत. अगदीं सोपे, आपणाला करतां येतील, असे तुझ्याही येतील.

प्रकार १ — आईनें न सांगितलेलेंही तिचें काम कर; तसेंच बाबाचें, व वरांतील माणसांचें.

प्रकार २ — घरांत नौकर चाकर असतील तर त्यांना टाकून बोलूं नकोस; त्यांच्या दुखण्याबाण्यांत त्यांना औषध नेऊन दे. भिकाऱ्यांना — आंधळ्या, पांगळ्यांना — भीक घाल.

प्रकार ३ — घराबाहेर शाळेंतील सोबत्यांच्या उपयोगीं पड. लहान मुलगा पाय घसरून पडला तर त्याला उठीव. एखाद्या मुलाच्या अंगावर बैल वगैरे आला तर त्याला एकीकडे सुरक्षित ने. चुकल्या माकल्या मुलाला घरीं पोहोंचीव.

तात्पर्य — सर्वांवर दया करून सर्वांच्या उपयोगीं पडण्याचा निश्चय कर, व निश्चया प्रमाणें रोज थोडें फार वाग. कबीरानें ह्मटलें आहे—

"दया धरमका मल है."

दया हें धर्माचें मूळ होय. लोकां-विषयीं दया बहुतेकांच्या मनांत जन्मतःच असते. पण उपयोगीं पडून ती जागी ठेविली पाहिजे, हळू हळू वाढविली पाहिजे.

हे दोन नियम अत्यंत कठीण आहेत खरें, पण निराश होऊं नकोस. हे प्रथम विषाप्रमाणें वाटतील, पण अंती अमृताचा रखे गोड असे अनुभवास येतील दृढ विश्वास व दृढ निश्चय मात्र पाहिजे. ते तुला ईश्वर देवो, येवढीच त्याजवळ प्रार्थना आहे.

मु. प.

वऱ्हाडसमाचार

चैत्र वद्य १ शके १८३५ प्रमादी

## इंग्रजी वाङ्मयाचा परिणाम.

सध्या आमच्या सुशिक्षित मंडळींवर दोन वाङ्मयांचे थोडे फार परिणाम घडत आहेत. एक संस्कृत वाङ्मय व दुसरें इंग्रजी वाङ्मय. पैकीं संस्कृत वाङ्मयाचा झरा जिवंत नाहीं. तें वाङ्मय कितीही सोज्वल असलें तरी मिष्ट पण साचलेल्या पाण्याच्या डबक्याप्रमाणें स्थिर आहे. जगांत सध्यां काय घडामोडी चालल्या आहेत, त्या पाहून तदनुरूप लोकांच्या विचारांना व कृतींना वळण लावण्याचें सामर्थ्य संस्कृत वाङ्मयांत नाहीं. संस्कृत वाङ्मयांत अमूल्य रत्नें आहेत खरीं, पण तीं हल्लींच्या काळांत व हल्लींच्या परिस्थितींत स्वयंप्रकाशित नाहींत स्वयंप्रकाशित असें वाङ्मय इंग्रजी वाङ्मय हेंच आहे. तें स्वतःप्रकाशित आहे इतकेंच नाहीं, तर दुसऱ्याला ही उज्वलित करणारें आहे हिऱ्याच्या अंगीं तेज असलें तरी त्याच्यावरचा धूळ झटकून टाकण्यास दिसावें ह्मणून दिव्याची जशी अपेक्षा असते व धूळ झटकल्यानंतर दिव्याचा प्रकाश हिऱ्याच्या प्रत्येक पैलूवर परावर्तन पावून नवा दशगुणित होतो तसें संस्कृत वाङ्मयावरील धूळ झटकून त्याला सोज्वल करण्याच्या व त्याचें तेज आमच्या अनुभवास आणून देण्याच्या कामीं आह्मांला इंग्रजी वाङ्मयाचें उत्कृष्ट साह्य होत असतें हें इंग्रजी वाङ्मयाचें साह्य नसतें तर पूर्वीच्या जुन्या शास्त्रीवैदिकां प्रमाणें संस्कृत वाङ्मय आह्मी नुसतें घोकून पाठ करून ठेविलें असतें, पण त्याचा परिपाक आमच्या ठायीं मुळींच झाला नसता. तेव्हां संस्कृत वाङ्मयाची महती ओळखण्यास व त्याच्या अंगचे गुण खऱ्या रीतीनें अनुभवण्यास इंग्रजी वाङ्मयानें आह्मांस शिकविलें हा त्याचा मोठा उपकारच समजला पाहिजे.

वर ह्मटलेंच आहे कीं आमच्यांतल्या सुशिक्षितांवर कांहीं संस्कृत वाङ्मयाचा व बराचसा इंग्रजी वाङ्मयाचा परिणाम झालेला आहे. अल्प शिक्षितांवर तर नुसत्या इंग्रजी वाङ्मयाचाच परिणाम घडत आहे. कारण अल्प शिक्षित जें कांहीं वाङ्मय वाचतात तें सगळें देशी भाषांतलें वाङ्मय, आणि हें वाङ्मय ह्मणजे इंग्रजी वाङ्मयाचें अत्यल्प प्रतिबिंब असतें. आमची हल्लींचीं नाटकें घ्या, कादंबऱ्या घ्या, गोष्टींचीं पुस्तकें घ्या, इतिहास व चरित्रें पहा, कोणतेंही वाङ्मयाचें अंग घेतलें तरी त्यांच्या प्रत्येक रोमांग्रांत इंग्रजी वाङ्मयाचें अनुकरण करण्याचा यत्न दृग्गोचर होईल. तीस चाळीस वर्षांपूर्वींचीं मराठी भाषेंतलीं पुस्तकें संस्कृत वाङ्मयाच्या धर्तीवर रचलेलीं दिसत, आतां सर्वस्वी इंग्रजीचें अनुकरण होत आहे. या मनोरंजनपर वाङ्मयाच्या द्वारें समाजावर केवढा परिणाम घडत आहे, त्याच्या योगानें लोकांच्या आचार विचार वर व भाषेवर केवढा परिणाम घडत आहे त्याचा विचार कोणीं केला आहे काय? दुर्दैवाची गोष्ट ही आहे कीं पाश्चात्य समाज व आमचा समाज यांच्या मूळ रचनेंतच तात्विक भेद असल्यामुळें आह्मांस अस्वाभाविक वाटणाऱ्या गोष्टी मनोरंजक वाङ्मयाच्या द्वारें आमच्या भावी पिढीच्या मनांत घेऊं लागल्या आहेत व त्यांचा अनिष्ट परिणाम त्यांचे विचित्र विचार व त्याहून विचित्र अशा नव्या संवयी यावर घडूं लागला आहे. हा अनिष्ट परिणाम आह्मी लवकरच सावध झालों नाहीं तर कायमचा होण्याचा संभव आहे. पण पाश्चात्य संस्कृतींतला चांगुलपणा तेवढा घेऊन आह्मी आपल्या समाजाची सुधारणा देशकाल वर्तमानानुरूप केल्यास इंग्रजी वाङ्मयाच्या या परिणामाची विशेषशी भीती बाळगावयाला नको.

दुसरा एक परिणाम ह्मणजे आह्मांला आमच्या वेद, शास्त्र, उपनिषदें वगैरे विषयीं अभिमान वाटूं लागला हा होय. पूर्वींही अभिमान असे. वेदांत सगळ्या ब्रह्मांडांतलें ज्ञान भरलें आहे, जें भारतांत नाहीं तें साऱ्या जगांत नाहीं वगैरे अर्थाचीं सुभाषितें तत्कालीन अभिमानाचीं द्योतक आहेत. पण हा त्या वेळचा अभिमान अंधपणाचा होता. आमच्या वाङ्मयाची तुलना दुसऱ्या वाङ्मयाशीं करून विचाराअंतीं साधार रीतीनें हा अभिमान उत्पन्न झालेला नव्हता. तो उत्पन्न करण्याचें श्रेय इंग्रजी वाङ्मयाच्या अभ्यासालाच दिलें पाहिजे. इंग्रजी वाङ्मयाचा तिसरा परिणाम ह्मणजे इहजन्माच्या सफलतेविषयीं ज्या अगदीं नव्या कल्पनांचा अंकुर आमच्या मनांत उत्पन्न झाला हा होय. संस्कृत वाङ्मया प्रमाणें इहजन्माची सफलता ह्मणजे व्यक्तिविषयक वैराग्य व तद्द्वारा मुक्तिलाभ. इंग्रजी वाङ्मयानें हा आमच्या विचाराचा ओघ पूर्णपणें बदलला आणि व्यक्तिहित नव्हे तर समाजहित साधणें हें व्यापक ध्येय आमच्यापुढें मांडलें. हल्लींच्याकाळच्या लोकांच्या विचाराची प्रवृत्ति स्वतः करितां मोक्षाचा लाभ साधण्याकडे मुळींच नसून सार्वजानिक हित साधणें हाच पुरुषार्थ आणि तोच परमार्थ असें मानण्याकडे विशेष आहे आणि या विचारानेंच प्रेरित होऊन तरुण विद्यार्थी मंडळी सुद्धां दुष्काळफंड, पैसाफंड, वगैरे लोकोपयोगी कार्यासाठीं झटण्यास उत्सुकतेनें तयार होतात लोकांच्या परमार्थाच्या कल्पनेंत झालेलें हें परिवर्तन इंग्रजी वाङ्मयामुळेंच घडून आलें आहे यांत शंका नाहीं.

### अपूर्व कोटिक्रम.

आतां पर्यंत समकालीन सिव्हिलसर्विस परिक्षेच्या विरुद्ध सरकारी अधिकाऱ्यांनीं पब्लिक सर्व्हिस कमिशनपुढें अनेक बरी वाईट कारणें सांगितलीं. पण पंजाबचे लेफ्टनंट गव्हर्नर सर लुइडेन साहेब यांनीं आणलेला कोटिक्रम अगदींच विचित्र होता. हिंदुस्थानांत सिव्हिल सर्विस परीक्षा नकोत, कां, तर लेखी परीक्षा घ्याव्या लागतील व या परिक्षांच्या प्रश्नांचे कागद फुटल्या शिवाय राहणार नाहींत. बरें तोंडी परिक्षा घ्यावी तर मुलांचे पालक परीक्षकांना नसती भीड घालून आपलीं मुलें पास करून घेतील. अशी सर साहेबांना भीति वाटते. हिंदुस्थानांत ९ युनिव्हर्सिट्या आहेत त्यांतून व कित्येक सरकारी आफासांतून दरसाल परीक्षा होत असतात व या परीक्षा हजारो विद्यार्थी दरसाल उत्तीर्ण होतात ते सगळे अन्यायानें प्रश्नांचे कागद अगोदर मिळवुन अथवा परीक्षकांनीं भीड मुरवती खातर पास करून घतलेले असतात काय? या सगळ्यापरिक्षांचे प्रश्नांचे कागद अगोदर फुटलेले असतात असें ह्मणणे ह्मणजे युनिव्हरसिटीच्या रजिस्ट्रार वगैरे अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर व परिक्षकांच्या सचोटीवर आक्षेप घेण्यासारखें आहे असें सरसाहेबांस वाटत नाहीं काय? मागें लॉर्ड कर्झन साहेबांनीं हिंदुस्थानच्या लोकास लबाड ह्मटलें होतें त्याचाच अनुवाद सरलुइडेन साहेब या आपल्या विचित्र विधानाच्या द्वारें करीत आहेत. सरसाहेबांचें हें विचित्र विधान सत्यापासून तर दूर आहेच पण तर्क शास्त्राच्या दृष्टीनेंही अत्यंत दूषित आहे असें सहज दाखविता येईल. हिंदुस्थानांत समकालीन परिक्षा सुरू झालीतर परिक्षेचे प्रश्न अन्यायानें मिळविण्याचा मोह ज्या हिंदी अईबापाना पडण्याचा सर साहेबांस भीति वाटते त्याच आईबापाना सध्या आपलीं मुलें सिव्हिलसर्व्हिस परिक्षेसाठीं हजारों रुपये खर्चून विलायतेस पाठवावें लागत असतां तोमोह अधिकच पडत असला पाहिजे हें उघड आहे. विलायतेंतले परिक्षक व हिंदुस्थानांतले युनिव्हर्सिटी रजिस्ट्रार व परीक्षक यांच्या सचोटींतले

तारतम्य लक्षांत घेऊन आपण हें विधान केलें असें ह्मणण्यास सर साहेब तयार होतील काय ? लेखी किंवा तोंडी परिक्षा इंग्लंडांत झाली तरच अधिकाऱ्यांची रुचोटी कसोटीला उतरेल, हिंदुस्थानांत झाल्यास ती उतरणार नाहीं. असा सर लुइसाहेबांच्या विधानाचा स्पष्ट अर्थ आहे. या विधानावर त्याची उतट तपासणी कोणी कशा प्रकारें केली तें कळलें असतें तर बहार झाली असती.

## जमीन महसूल

ब्रिटिश इंडियाच्या जमीन महसूलाच्या वाढी संबंधानें आह्मी गेल्या ३१ मार्चाच्या अंकांत उल्लेख केलेला होता. पण त्या विधानाच्या आधाराला घेतलेले आंकडे चुकीचें आहेत असें आमच्या नजरेस आणले कमिशनर साहेब यांनीं आणून दिलें आहे. राजश्री स्लांडन हे आंकडे शास्त्रांत प्रवीण असून त्यांनीं आपल्या अभिप्रायाच्या समर्थना साठीं १९१३-१९१४ च्या सरकारी बजेटांतील आकडे प्रमाणभूत धरले आहेत. आह्मी त्यांचे आभारी आहेंत आणि त्या आंकड्यावरून असें स्पष्ट दिसतें कीं ब्रिटिश इंडियाचा जमीन महसूल

| १९०९-१० | १९१२-१९१३ |
|---|---|
| ३३,६७,४२,९४१ | ३४,२४,७९,००० |

असा होता आणि बजेटाच्या ह्मणजे १९१३-१४ सालीं हे उत्पन्न ३४३६४४००० आकारलेलें आहे. या आंकड्यावरून पाहतां सरासरीं गेल्या चार वर्षांत सुमारें ६८ लक्ष रुपयाचा वाढवा आहे. ही बाब सर्व हिंदुस्थानच्या हिशेबा प्रमाणें पाहातां कांहीं विशेष लक्षांत घेण्यासारखी नाहीं आणि. रा० रा० स्लांडन साहेब यांनीं या आंकड्याची फोड करतांना पाट बंधाऱ्या-संबंधानें वाढलेलें महसूलाचे आंकडे वजा केले आहेत. हे आकडे वजा करून पाहतांना १९०९-१० सालीं व १२-१३ सालीं जमीन महसूलीचें उत्पन्न बहुतेक सारखेंच ह्मणजे ३२०००००० बत्तीस कोटी रुपये आहे. या वरून लक्षांत येईल कीं सरकारनें आपली जमीन महसूलाची मागणी वाढविलेली नाहीं. पाटबंधाऱ्याच्या वाढत्या उत्पन्नासंबंधानें कोणासही हरकत घेण्याला जागा नाहीं. पाट बंधाऱ्याखालीं यणार क्षेत्र जसजसें वाढतें तसतसें त्या संबंधाचे उत्पन्न वाढतें हे अगदीं साहजीक आहे. पाठबंधाऱ्याचें उत्पन्न १९०९-१० सालीं एककोटी साडे सदुसष्ट लक्ष होते. तें १९१३-१४ सालीं दोन कोटी साडे एकूणतीस लक्ष होईल असा अंदाज आहे.

## जमीन महसूल

### मध्यप्रांत व वऱ्हाड

जमीन महसूलीचा १९११-१२ सालचा नुकताच रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे त्या वरून असें दिसतें कीं मध्यप्रांताची जमीन महसुलाची मागणी त्र्याणव लक्ष बावीस हजार सहाशे एकुणीस रुपये १९११ चे अक्टोबरला होती ती १९१२ आक्टोबरला पंचाणव लक्ष पंचेचाळीस हजार नउशे अकरा रुपये पर्यंत वाढली आहे. ही वाढ होण्याला कारण दमोह, जबलपूर वर्धा, द्रुगबिलासपुर, येथें झालेली नवी जमाबंदीची आकारणी होय. वऱ्हाडच्या जमीन महसुलाचें उत्पन्न मध्यप्रांताच्या अगदीं जवळ जवळ ह्मणजे नव्वद लक्ष चौऱ्याण्णव हजार सहाशे सत्याहात्तर रुपये आहे आधलें वर्षापेक्षां हें उत्पन्न सरासरी सततीस हजार आठशे पस्तीस रुपयानीं वाढलें आहे प्रांताच्या मानानें ही वाढ फारशी मोठी नाहीं.

## काटकसर

आमच्या वऱ्हाडच्या मुलकी खात्यांत नवीन काटकसर चालली आहे. पगती चांगली आहे असें मात्र ह्मणण्याला आह्मी तयार नाहीं. ही काटकसर रा० रा० स्लाय यांनीं अगदीं प्रथम नजरेत आणिली व त्यानींच तिला सुरवात केली. ही काटकसर फक्त तहसीलींतील चपरासी व कारकून व डेपटी कमीशनरचे कचेरींतील चपरासी व कारकुन कारकून यांचे संखेमध्ये केली आहे. पूर्वी चपरासी व कारकून यांची संख्या जेव्हां निश्चित केली तेव्हां पेक्षां हल्लीं किती तरी कम वाढले आहे. आणि या काटकसरीचा परिणाम सुवराह अतरा विषयीं अधिकारी लोकांचे उद्गार ऐकूं येत नाहींत. या काटकसरी संबंधानें व्हावी तितकी ओरड झाली नाहीं. याला कारण रा० स्लाय साहेब यांची युक्तीप्रयुक्ती होय. वीस रुपये पगाराच्या कारकुनी जागा २११ कमी करण्याचा ठराव करण्यांत आला आणि त्यां ऐवजीं २०रुपये पगाराची जागा २५ रुपयाची केली. आणि या प्रमाणे ८४ कारकुनास प्रत्येकी पांच रुपयाची बढती दिली. २५ रुपये पगाराच्या ४३ कारकुनाचा पगार ३० रुपये केला. आणि १२ कारकूनांचा पगार ३० चे ऐवजीं ३५ केला. या रीतीनें दरमाहा ११८ रुपयांचा खर्च वाढला हें खरें, पग प्रस्तुतच्या कारकुनावर कामचा बोजा अधिक वाढविण्यांत आला हेंही उघड आहे.

शिपाई ४५० होते ते ३४९ केले. आणि त्याचा ७८-९ असा होता तो एकेक रुपयानें वाढविला. या रीतीनें ६१८ रुपयाची बचत दाखविण्यांत आली आहे. वरील काटकसरी संबंधानें अनुकूल अभिप्राय नमूद करतांना कमीशनर साहेब ह्मणतात कीं राजश्री स्लाय साहेबांचीं कल्पना इतरत्र अनुकरण करण्या सारखी आहे. पण ही काटकसरीची गोष्ट नामदार चीफकमीशनर साहेबांस तितकीच पसंत पडली असें मात्र आह्मांस वाटत नाहीं. कारण त्यांचा तसा अभिप्राय त्यांच्या सिंहावलोकनांत निर्दिष्ट केलेला नाहीं.

## वऱ्हाडवृत्त

हवामानः—आकोल्याची उष्णता सर्व हिंदुस्थानांत अग्रभागीं आहे व सध्या जाकोबाद देखील मागें पडला आहे. उष्मा विशेष होऊं लागला आहे. उन्हाच्या मानानें रोगराई फार कमी आहे.

पाण्याचा पुरवठा — नदींतल्या जुन्या विहीरी दुरुस्त करून पाण्याचा पुरवठा करण्याचें काम येथील म्युनिसीपालिटीनें झपाट्यानें चालविलें आहे ही आनंदाची गोष्ट होय.

सहकार्यपत पेढी -- या संस्था सर्व वऱ्हाडभर स्थापित करण्याचा विचार चालूं असून तदनुरूप उद्योग चालूं आहे सध्या पतपेढ्या व कृषी मंडळें या दोन प्रकारच्या संस्थांची भरभराट असून त्या पुढें विशेष लोकोपयोगी होतील असा पूर्ण भरंवसा वाटूं लागला आहे.

सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटी नांवाची पुण्यास एक परोपकारी सार्वजानिक संस्था आहे; तिची एक शाखा उमरावतीला असून त्या शाखेचे सभासद रा० रा० कैकिणी यांनीं यवतमाळ जिल्यांत गेल्या आठ महिन्यांत जी सार्वजनिक सेवा केली. तिचा कथा वृतांत इंग्रजी मध्यें आमच्या कडे नुकताच आलेला आहे; रा० कैकिणी यांनीं २१ सार्वजनिक सभा भरावेल्या. पत पेढ्या स्थापण्यासाठीं गांवोगांव हिंडले प्राथमिक शिक्षणाचा प्रसार केला ई० ई० पुष्कळशा लोकोपयोगी गोष्टी केलेल्या आहेत. हा रिपोर्ट ह्मणजे यवतमाळ जिल्ह्यांतील सार्वजनिक हाल चालीचा अहवाल होय. राजश्री कैकिणी यांनीं थोड्या काळांत इतकें यश संपादन केलें या बद्दल आह्मी यांचा गौरव करितों.

## वर्तमान सार.

लहोर येथील गव्हर्मेंट कॉलेजच्या इमारतीस आग लावण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून लाहोरचे डिस्ट्रिक्ट जज यांजपुढें एका मुसलमान फकिरावर खटला चालू आहे. हा फकीर कॉलेजनजीकच्या एका जागेंत बसत असे. पण ही जमीन कॉलेजच्या खेळण्याच्या मैदानासाठीं घेण्यांत आल्यामुळें या फकीरास तेथून निघून जाण्याचा हुकूम करण्यांत आला. त्यावरून फकीरानें रागावून कॉलेजच्या इमारतीस आग लावण्याचा प्रयत्न केला, अशी या खटल्याची हकीकत आहे खटला चालू आहे.

बंगालमधील गलबतें बंदरांत नेण्या-आणण्याच्या कामावर देखरेख करणारे सीनियर अधिकारी मि० ई० ए० वार्ड यांच्या पत्नी मिसेस वार्ड यांच्या निजावयाच्या खोलींत बुधावार ता० २३ रोजीं सकाळीं त्यांचा एक नोकरींतून काढलेला नोकर शिरला. व मिसेस वार्ड यांची मान धरून तो त्यांस फटका मारण्याच्या बेतांत होता मिसेस वार्ड यांनीं त्याच्याशीं निकराची झटापट करून आपली सुटका करून घेतली व मोठ्यानें ओरडून त्या खोलीच्या बाहेर पडल्या व आपल्या शेजाऱ्याच्या घरांत शिरल्या. त्यानंतर त्यांस मारहाण करणारा इसम तेथून पसार झाला. आपण ज्या मनुष्यास नोकरीवरून काढले. तेंच हा मारहाण करणारा इसम असल्याचे मिसेस [illegible]यांनीं ओळखलें. मिसेस वार्ड यांचे पती [illegible] वेळीं नोकरीवर गेले होतें. व त्या एकट्याच आपल्या खोलींत होत्या.

गार्डन रीच कलकत्ता येथील क्लाइव ज्यूट मिलमधील सुमारें तीनशें लोकांनीं बुधवारीं सकाळीं आठ वाजल्यापासून संप करून काम बंद पाडलें. संपवाले लोक गिरणीच्या दरवाजाशीं जमा होऊन धमक्या देऊं लागले. त्यामुळें पोलिसास खबर देण्यांत आल्यावरून पोलिस तेथें येऊन दाखल झाले. गिरणीजवळ बंदोबस्तासाठीं पोलिसचा पहारा ठेवण्यात आला आहे. आपला पगार वाढविण्याबद्दल लोकांनीं केलेल्या अर्जाचा विचार करण्याचें गिरणीच्या अधिकाऱ्यांनीं नाकारल्यावरून हा संप झाला.

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येतें कीं मी मलकापूर तहसील कचेरींत ता. २२-४-१३ ई. रोजी कोरा जनरल स्टांप रु. १चा अनुक्रम नंबर ३७१चा सुपडा व० आनंदा पाटील कुणबी रा० ताल खेड या नावाचा खरेदी करून त्यांच दिवशी मी तालखेड्यास परत जात असतां वाटेंत कोठें पडला असून त्याचा शोध करित असतां सापडत नाहीं त्याचा शोध आमचा सुरू आहे. जर कोणास सांपडेल तर त्यांनीं खालील पत्यावर आणून द्यावा. मला लिहितां येत नसून रोखा तानकुपंत वेंडर यांचे जवळून घेतला त्यावर माझा निशाणीचा आंगठा घेतला आहे. सदर्हू स्टांपावर जर कोणी माझे नांवाचा रोखा तयार करुन पुढें मागें माझेवर दावा वगैरे आणल्यास मी स्वतः जातीनें कोणत्याही प्रकारें जबाबदार होणार नाहीं. ही जाहिर नोटीस दिली असे ता. २४-४-१३ ई. दस्तूर रामचंद्र रमाकांत इंगळे पिटीशन रईटर.

सुपडा वल्लद आनंदा पाटील कुणबी
तालखेड तालुके मलकापूर
जि. बुलढाणा निशानी
खुद पोष्ट मोताळे

नो. नं. ४१

## जाहिरनामा

या जाहिरातीनें आमचे शाखेचे सर्व लोकांस असे कळविण्यांत येते कीं, माझी मुलगी वेणु इचा विवाह माझे पश्चांत चोरून शामराव गंगाराम राहणार कारंजा हा आकोलखेड येथील रामचंद्र सीताराम कास्त याच्या मुलाशी जबरदस्तीनें करण्याच्या विचारांत आहे. तरी सदर्हू बद्दल मी रामचंद्र सीताराम यांस मनाईची नोटीस दिली आहे. याचप्रमाणें आमचे शाखेचे सर्व गृहस्थास असे कळविण्यांत येते कीं, माझे मुलीचा विवाह माझ्या सल्याशिवाय कोणीही करण्याच्या भानगडींत पडूं नये पडल्यास ते गृहस्थ कायद्याप्रमाणें फौजदारी गुन्ह्यास पात्र होतील. कळावें तारीख २३।४।१९१३ इ.

सही
विठल अमृत जवरे पटवा
कास्त खेर्डी प्रगणें कारंजा

नो. नं. ४२

## नोटीस

नोटीस बशमी नरसाजी बंडाजी काळे रा० बोरगांव खुर्द ता० आकोला यांस—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी कसबे पातुरनंदापूर येथाल शेत सर्वे नंबर २१० ९८६३ एकर गुंठे आकार रुपये १७ माझेपासून बटाईनें घेतले. तुह्मी वाहील्या पासून मला निमे माल मिळाला नाहीं. व शेताची किस्तकारी मुळीच केली नाहीं. तुह्मी दापकीचे शेर घेतले त्याची जशी किस्तकारी काळजीपूर्वक केली तशी माझ्या शेताची कां केली नाहीं. याचें कारण माझे लक्षांत आलेले हेंच कीं ते शेत तुमचें मनांत पचवावयाचे होते हा मुख्य हेत बटाइखत हाण्याचे पूर्वी तुह्मी मला खुप अवळपवळ माया दाखविली त्या वेळेस तुह्मास बराच दयेचा पाझर फुटला होता तो बटाइखत नोंदल्यावर लागलीच बंद झाला. तुमची कृती निराळ्या तऱ्हेची दिसली तुह्मी मला सदरहु शेत पुष्कळ वेळां विकत मागितले परंतु मी देइना व तुमचे मनांत जरूर घेणें होते ह्मणून तुह्मी मजला असा फासा घातला तो शेताची नादुरूस्तीमुळें होणारी पिकाची माझी नुकसानी व माल न देणें या वरून दिसला मी तुह्मास बटाईनें शेत देऊन फसलो, माझे डाळे, उघडले, माझ्या मुलाबाळाचें अन्न काढून तुमचे मनांत आपले घशांत घालण्याचा कृत्रिमभाव दिसन आला. मला निमे माल मिळेना व शेतेंही कोणी विकत घेईना कारण तुमचा धाक, तुमची वर्तणूक आडदांडपणाची, मला भलत्या सलत्या थापा मारून खोटी समजूत करून माझे पासून बटाईनें करून घेतले चांगल्या जमिनीचा शेत सारा जो कोणी शेत वाहतो तोच शेतसारा देतो तो तुह्मी मजवर ला ला तुह्मांस वायदा देण्यास नको, माल देणें नको, माझे शेत ह्मणजे तुमचे जनावराचे खाद्य व तुमचे जनावरांची चैन. पुढें मी भीक मागो, माझी मुलेबाळ दारोदार भीक मागत फिरो त्याची तुह्मांस काय जरूर, तुमची व तुमचे जनावरांची चैन झाली ह्मणजे पुरे मग कांहीं होवो. व मी याच कारणा करत तुह्मांस शेत बटाईनें दिले असेल नाहीबरें ? मी अनाथ भोळा मनुष्य त्याबद्दल मी काय करावें तें मला सुचेना शेवटीं त्रासून त्रासून मी बोरगांव खुर्द येथील सदाशिव निंबाजी पटवारी यांस सदरहू शेत उभ्या पिकासमेत विकिले त्या अर्थी निमे माल तुह्मी त्यास द्यावयाचा होता तो तुह्मी त्यास दिला नाहीं ही तुमची मोठी चूक आहे. त्या बद्दल मी जबाबदार नाहीं. तुह्मी शेतें दुरूस्त न केल्यामुळें माझी नुकसानी फार झाली. शिवाय दोन वर्षांचें पीक मला मिळाले नाहीं तरी त्या बद्दल नुकसानी भरून द्यावी. व शेताच्या चारी मेरा नागणें वखरणें व मेर साफ करण्यास लागवें. असें नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचें आंत न केल्यास माझी नुकसानी बद्दल माझे शेताचा खरीदीदार तुमचे बटाईखत रद्द समजून शेताची वाही वगैरे करील व तुमचेवर फिर्याद करीन कळावें. ता० १७।४।१३ दस्तुर कृष्णाजी राघोजी माळी रा० बोरगांव खुर्द.

सही

विठू वल्लद लक्ष्मण धनगर रा० बोरगांव खुर्द निशाणी खुद

नो० नं० ३६ आंगठा

## नोटीस

नोटीस बेशमी सिताराम जाणजी सावकार कुणबी राहणार घाबे तालुके अकोला यांस:

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतेंकीं मौजे पातूरनंदापूर येथील शेत सर्वे नंबर २१० ९८३२ आकार १७ हें शेत मी तुह्मास गहाण करून दिलें गहाण करून देण्याचें कारण माझा पुतण्या नामें महादू बापूजा धनगर रा० कानशिवणी यांस देण्याकरितां व बाकीचे राहिले रूपये मला मिळण्या करितां तुह्मास रुपये ४०० यास गहाण करून दिले व गहाणाचे रुपये मला नोंदणारे अमलदारासमक्ष दिले त्यानंतर तुह्मी मला व जैराम जाधव या आह्मी दोघे उभयताना तुह्मी आपले घरीं दिवस थोडा राहिल्या कारणानें व जवळ रकम असल्याकारणानें आह्मास घेऊन गेले तुमचे येथें गेल्या नंतर जैराम जाधव तुमचे आप्त असल्यामुळें व तुह्मी चांगले विश्वासू मनुष्य आहांत असें जाणुन तुह्मी मला रकम मागितल्यावरून मी तुमचे स्वाधीन साठीम रकम केली व दुसरें दिवशीं आह्मी दोघे गांवाकडे येतांना मी आपली रकम तुह्मास वापस मागितली असतां मज बरोबर आलेला जैराम जाधव याजला तुह्मी सांगीतलें कीं तुमचेकडे जे माझे रुपये आहेत ते रुपये तुह्मी आपल्या हातांनीं विठू याचा सावकार महादू यास देऊन त्याचें गहाण काढून घ्यावे बाकी राहिलेली रकम विठू यांस द्यावी त्याप्रमाणें जैराम यानें कबूल केल्यावरून तुमचे विश्वासानें आह्मी उभयतां घरीं निघून आलों नंतर मी जैराम यास तगादा लावला कीं माझे सावकारास व मला रुपये द्यावे परंतु जैराम यानें कोणतेच प्रकारची व्यवस्था केली नाहीं व पुष्कळ वेळां मी तुमचेकडे रुपये मागण्या करितां आलों परंतु तुह्मी मात्र जैराम जाधव यास घेऊन आणण्याचें कारण दाखविलें त्याप्रमाणें मी जैराम जाधव यास तुमचेकडे येण्या विषयीं ह्मटलें असतां तो नयेतां त्यानें माझी अशी समजूत केली कीं जर करितां तुह्मास रुपये दिले नाहीं तो पर्यंत त्याचें गहाण रद्द आहे असे मला सांगितल्यावरून मी तुमचे कडे आलों नंतर तुह्मी आमचे गावास येऊन जैराम तुमचा आप्त असल्या कारणानें तुमचा काय विचार झाला तो मला अद्यापही समजला नाहीं व रुपयांचा भरणा ही मला अद्याप दिला नाहीं करितां तुमचें गहाण पोकळ आहे. असें समजावें करितां माझे गहाण नोटीस पावल्यापासून आठदिवसांत माझे गहाणखत वापस करून माझी पावती द्यावा असें मुदतीत न कल्यास रीती प्रमाणें तजवीज करीन. सही

विठू वल्लद लक्ष्मण

निशाणी खुद आंगठा

नो० नं० ३७

अमूल्य संधी ? अप्रतीम नासिक चूर्ण !! अमुल्य रत्न.

### टि. सि. एन.

### सुगंधी औषधी तपकीर.

जगत प्रसिद्ध असें हें सुगंधी तपकीर, दिर्घ काला पासून कोट्यावधि लोकांच्या उपभोगानंदास पात्र झाले आहे. आलिकडे सर्वत्र याचा जास्त प्रचार झाल्या कारणानें युरोप खंडांतील बहुमान्य गृहस्थांच्याही अंतःकरणांत यानें मकोबनस्या विषयीं तिटकारा उत्पन्न करून स्वतंत्रपणें त्यांना फार प्रिय झाले आहे. लक्षावधि एतद्देशीय लोकांनीं हे वापरून याच्या अलौकिक गुणांबद्दल आपला संतोष प्रकट केला आहे.




मस्तकशूल, ज्ञानतंतूचा दुर्बलता, स्मरण शक्ति कमी होणें, मानासिक चिंता, औदासिन्य, चक्कर येणें, डोळ्या पुढें अंधेरी येणें इत्यादि विकार हे सुगंधी तपकीर वापरल्यानें एका घटकेंत जातात. विद्यार्थी, शिक्षक, गव्हर्नर, वकील, ब्यारिष्टर वगैरे सारख्या डोक्याच्याच कामाच्या मंडळीनें डोक्याचे हलके पणांसाठीं हे जरूर वापरून एक वेळां परिक्षा करून पहावी. याच्या गुणांबद्दल हजारो सार्टीफिकीटा मिळाल्या व नित्य मिळतात.

झोंप घेण्याची वेळ खेरीज करून, दिवसांतून दोनदां किंवा तिनदा ही तपकीर ओढल्यानें मनाला आनंद वाटतो, इतर तपकीर शेरभर वापरल्या पेक्षां ही तपकीर ओढल्यानें नाक सुगंधानें भरून जाते. एक पैशाच्या साध्या तपकीरींत आमच्या सुगंधी तपकीरीच्या दोन चिमटी मिळविल्या असतां सर्व तपकीर सुगंधी होतें. अचुक गुणकारी व अत्यंत सुवासिक आणि अगदीं अल्प किंमतींत मिळणारी अशा प्रकाराची तपकीर इतर ठिकाणीं आज पर्यंत कोणाच्याही पाहण्यांत आली नसेल. स्वाभाविक गुणकारी व चित्ताकर्षक असें हे लोक प्रिय सुगंधी तपकीर केवळ एक चिमटीभर ओढल्याने सुगंधभारित असें श्वास नाकांतून बाहेर येतात व त्या योगानें मनाला उल्हास वाटतो.

किं. एक डबीस ०–४–० वि० पी० चार्ज ०–३–०
” डझन डबीस २–६–० ” ” ” ०–६–०

( सुचना ) पत्र लिहुन मागविणारानी न्युसपेपराचें नांव व तपकीरीची किंमत लिहुन कळविलें असतां वरील किंमती प्रमाणें पाठविले जातील’ किंवा तसें न केल्यास अडिचरुपयांस पाठविलें जाईल. पत्र लिहिणारानीं इंग्रजींत अथवा बालबोध अक्षरानीं आमचेवर दयाकरून लिहावे.

स्वतः तयार करणारे :— टि० सी० नागलिंगप्पा आणि कंपनी’ नं० २० सिंगण्णनरोड. पार्क टाऊन पोष्ट’ मद्रास

नो० नं० ३८

## जाहीर नोटीस

खाली सही करणार नोटीस करितो कीं तु माझी भावजई नामे सई मर्द यादो सोनार राहाणार दहिहांडा ता० आकोट हल्लीं मुक्काम गुरधी ता० आकोला जिल्हा मजकुर नोटिस देण्यांत येते कीं तूं गैर चालीची असून तूं कनयालाल बापुलाल ब्राह्मण रा० बाळापुर याचे येथें होती व तुजला एक मुलगा नामें नामदेव व मुलगी नामें संदरी असें दोघे लेकरं आहेत आह्मी यांचे चुलते आहो याचे लग्न करण्यास तयार आहे व शेते दोन आहेत त्यातील एक पंचमांश हिस्सा मी देण्यास मुलास तयार आहे मुलगा सध्या अज्ञान आहे ह्मणुन जीनगीची अफरा तफरा ह्मणजे सेताची होऊं नये तूं गैरचालीची असल्याकारणानें तुजला मी देत नाहीं तूं अफरातफरा करशील ह्मणून देत नाहीं मुलगा सज्ञान झाला ह्मणजे देईन सदरहु सेतांतील एकपंचमांश हीस्सा कोणी गहाण किंवा खरेदी किंवा बक्षिस घेऊं नये किंवा सदरहु हिस्यावर कोणी कर्ज सई मर्द यादो सोनार हीस देऊं नये दीले असल्यास ते रद्द समजले जाईल मुलगा व मुलगी आठ दिवसाचे आंत माझे घरी आणुन द्यावे न आणल्यास मी त्याचा जबाबदार नाहीं कळावे ता० २३।४।१३ ई०

दस्तुर गोविंदसा माधोसा हातरूण

सही

भगवान राजाराम सोनार राहणार दहीहंडा दस्तुर खुद

नो० नं० ३९

## जाहिर नोटीस

उमरी येथील रा. शंकर महादेव मोहळकर ह्यांच्या उमरी येथील नठार पेठेंतील बंगल्याबद्दल मर्जीनें अगर विकत घेणें असल्यास रा. रा. रामचंद्र विष्णु महाजनी वकील आकोले यांच्याशी प्रत्यक्ष भेटीनें अगर पत्रानें खुलासा करून घ्यावा.

नो० नं० ४०

## जाहिर नोटिस

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं मी तारीख १२-३-१९१३ इसवी रोजीं विठल कनयालाल लोहार रा० मुकळी यास कुलमुखत्यारपत्र दिलें आहे तरी तें मुखत्यारपत्र ता० १२-४-१३ इसवी पासून रद्द केलें आहे तर त्याशीं कोणीं कोणतेच प्रकारें व्यवहार करूं नये केल्यास आह्मी जबाबदार नाहीं ही नोटीस दिली. कळावे ता० १३-४-१३ इसवी सही

चिमणभार्या गुरु गोविंदभार्या राहणार मुकळी याचे हातची निशाणी असे

नो० नं० ३१

## नोटीस

रा० रा० बंकटलाल भवाणीदास आगरवाले व तानाजी बाबुजी माळी रा० शेगांव यांस:—

तुह्मांस कळविण्यांत येते कीं तुह्मांस आह्मी आमचे शेगांव येथील बालचंद बन्सीलाल या नांवाचे दुकानाचें काम करण्याकारितां गुमास्ते नेमले होते हल्लीं तुमचें वर्तन आह्मांस पसंत नसल्यामुळें या नोटिशीनें आपणास कळविण्यांत येते कीं आह्मी तुह्मांस कामावरून दूर केलें आहे यापुढें तुह्मी दुकानाकारितां कोणत्याही प्रकारचा व्यवहार करूं नये तसें केल्यास त्याजबद्दलची सर्व प्रकारें जबाबदारी आमचे दुकानावर न येता आपणावरच राहिल अशा व्यवहारामुळें जें कांहीं नुकसान आमचे होईल त्या नुकसानीस तुह्मी कायदेशीर रीतीनें पात्र व्हाल कळावे तारीख २४।४।१९१३ इसवी.

सही

रतनलाल बालचंद तर्फे गोविंद घोंडदेव

नो० नं० ३२

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं शेगांव येथें आमचे पूर्ण मालकीचें बालचंद बनसीलाल या नांवाचें दुकान चलूं आहे त्या दुकानांत आजपर्यंत आह्मी बंकटलाल भवानी यांस व तानु वा। बापूजी यांस गुमास्ते नेमले होते सदरहु गुमास्त्याचें वर्तन हल्लीं आमचें मताप्रमाणें नसल्यामुळें त्यास आह्मी आज तारखेपासून आमचे नोकरीवरून दूर केले आहे. सबब सर्वत्रास कळविण्यांत येतें कीं सदरहु दुकानची देवघेव यापुढें कोणीही त्यांचेशीं करूं नये या तारखे नंतर जर कोणी व्यवहार त्यांच्याशीं करील तरी त्याजबद्दलची पुर्णपणें जबाबदारी व्यवहार करणारावर राहून त्या व्यवहारामुळें आह्मी बांधले जाणार नहीं. व ज्या लोकांकडे दुकानचें घेणें असेल त्यांनीं वरिल गुमास्त्यास न देता त्यानी आमचे आकोला दुकानावर आणून द्यावें व आमची पावती घ्यावी कळावें. ता० २४-४-१३ इ०

सही

रतनलाल बालचंद तर्फे गोविंद घोंडदेव.

नो० नं० ३३

## *NOTICE*

The Royal Commission on the Public Services in India will leave India for England on April 19th 1913 They propose to return to India early in the ensuing cold weather season to prosecute their investigations into the following Departments, where they exist in each Province, in addition to those of which notice has already been given:—

Firstly- Provincial Medical namely Civil Assistant Surgeons.

Secondly - *Salt.*

Thirdly – Excise.

Fourthly – Factory Inspection including Boiler Inspection.

They accordingly invite all persons, not members of those Departments and all associations or public bodies who may have any representation to make, to send the same, addressed to the Under Secretary to the Chief Commissioner in the General Administration Department, Central Provinces, Nagpur, on or before the 10th June 1913, together with an indication of their qualifications for giving an opinion on the points at issue. Any representations sent might conveniently be made in the form of memoranda under the following main heads so far as they may be suitable in each case–

I. Methods of recruitment.

II. Systems of training and probation

III. Conditions of Service.

IV. " " Salary.

V. " " Leave.

VI. " " Pension.

VII. Such limitations as may exist in the employment of non-Europeans, and the working of the existing system of Division of services into Imperial and Provincial.

VIII. Relations of the service with the Indian Civil Service and other services.

IX. Any other points within the terms of reference to the Royal Commission not covered by the proceeding heads.

Sd/- E. R. K. Blenkinsop,
Chief Secretary to the Chief Commissioner Central Provinces

Nagpur, the 14th April 1913

N

## नोटीस

रा० रा० रामचंद्र सीताराम कास्त राहणार आकोलखेड ता० आकोट यांस:-

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, आज आठ दिवस होत आले माझे कुटुंब व मुलगी नामें वेणु या दोघांस कारंजा येथें राहणारा शामराव गंगाराम कास्त यानें माझे पश्चात खेरड्याहून आणून आपले घरीं ठेविलें आहे असे मी लोकांकडून ऐकतो माझ्या पश्चांत माझी परवानगी व इच्छा नसतांना माझ्या मुलीचे लग्न तुमचे मुलासी जबरदस्तीनें लावावे असी शामराव याची खटपट चालु आहे असें मी ऐकतों तुह्मी संभावित आणि इज्जतदार आहांत ह्मणून तुह्मांस या नोटीशीनें कळविण्यांत येते कीं, तुह्मी माझ्या संमतीशिवाय शामरावचे नादीं लागून माझ्या मुलीचे लग्न तुमच्या मुलाशी करून घेऊ नये केल्यास फौजदारी कायद्याप्रमाणें गुन्ह्यास पात्र व्हाल व मुकदम्याचा खर्च व नोटीसीचा खर्च तुह्मापासून भरून घेतला जाईल. कळावे तारीख २३।४।१३

सही

विठुल अमृत पटवारी मु. खेर्डा तालुका मुर्तिजापूर

नो० नं० ३९

## कापूस– तक्ता– साप्ताहिक- १९ एप्रिल १९१३ पर्यंत

| जिल्हा. | वर्ष | काटन मार्केट — आयात — कापसाच्या गाड्यांची संख्या: ता. १९।४।१३ पर्यंतचा आठवडा | काटन मार्केट — आयात — कापसाच्या गाड्यांची संख्या: १।१०।१२ पासून | काटन मार्केट — आयात — रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या: ता. १९।४।१३ पर्यंतचा आठवडा | काटन मार्केट — आयात — रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या: १।१०।१२ पासून | गठ्ठे बांधण्याचे प्रेस — बांधलेली गठ्ठी: ता० १९।४।१३ पर्यंतचा आठवडा | गठ्ठे बांधण्याचे प्रेस — बांधलेली गठ्ठी: ता. १।१०।१२ पासून आज तागाईत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उमरावती | चालू साल | ४,२९३ | १४९०२४ | १२३९ | १७,६७४ | ४,५५५ | १४४,६९९ |
| | गुदस्त | ३,४५८ | २३८६०० | ८०६ | २४४५८ | .... | .... |
| | तिगस्त | २,४१८ | ९६,९४५ | ५०८ | १०५२२ | .... | .... |
| यवतमाळ | चालू साल | ४१७ | १३२५०१ | १०४१ | १६,७२२ | १२०२ | ७९,३५८ |
| | गुदस्त | ४५५ | १४१२०९ | २०७ | ११,०७९ | .... | .... |
| | तिगस्त | ४८७ | ३९,९६८ | ७९७ | १२,७५६ | .... | .... |
| आकोला | चालू साल | २,७३१ | १४६३०९ | २,२१६ | ३९५०० | ४,३२३ | १५८,८९१ |
| | गुदस्त | १,९५१ | १७८५७६ | २,०६९ | ४६२७२ | .... | .... |
| | तिगस्त | २,२८८ | ९३,०३८ | १,४८७ | २००५४ | .... | .... |
| बुलढाणा | चालु साल | १६५८ | ९०,९०१ | ८२२ | ९,०१९ | ३,५८२ | ११०,३७४ |
| | गुदस्त | ५१५ | १२०१७६ | २४६ | ८,४५२ | .... | .... |
| | तिगस्त | १,१०० | ११३२१९ | २२८ | ५,४२४ | .... | .... |
| एकूण वऱ्हाड | चालू साल | ९,०९९ | ५१८७३५ | ५,३१८ | ८२,९१५ | १३,६६२ | ४९३,३२२ |
| | गुदस्त | ६,३७९ | ६७८५५७ | ३,३२८ | ९०२६१ | .... | .... |
| | तिगस्त | ६,२९३ | ३४३१७० | ३,०२० | ४८,७५६ | .... | .... |

टीप—चालूं सालाच्या बरोबरीचे साल गुदस्त व तिगस्त सालचे आठवडे २० एप्रिल १९१२ व २२ एप्रिल १९११ पावेतों होते

पत्रकें धाडणारे
मार्केट प्रेस
३० ८६

सी. यू. वील्स.
डायरेक्टर आफ आग्रिकलचर
इंडस्ट्रीज—मध्यप्रांत

## एकाच वस्तूपासून तीन देणग्या

सौंदर्य

आरोग्य

थोडा खर्च

जेव्हां तुमचें रक्त दूषित होतें तेव्हां ह्या तिन्ही सुखाना मुकावें लागतें.

रक्तदोषापासून पुष्कळ प्रकारचे घाणेरे भयंकर रोग होतातः—काळे डाग, संधिवात घशांतव्रण पीनस, नाकसडणें, रक्तपिती, सर्वांगठणकणें, सुनभेरी मेहरी, बद, फोड, चट्टे, आंगाची आग, तोंडाला दुर्गंध, अजीर्ण, कंडू व कडकीपासून इतर रोग.

**तर स्वतःचाच राजवैद्य बनून**

रोग नष्ट करणें बरें नव्हें काय ?

—डा. गोखले एम्. ए. एम्. डी यांच्या प्रख्यात—

## आयोडाईझड सार्सापरिलानें

ते निखालस बरे होतात.

फॅक्त उत्तम वनस्पतींचा बनविलेला आयोडाईझड.

———अनुभवतरपहा. ———

किं. १ रु. पो. ख. ०४ आ. उत्तमगुणास, ४ बाटल्याची पो. ख. सह किं. ४ रु.

**बालामृत हें काय आहे ?**

== अस्सल बालामृत हें ==

मुलाना आरोग्य देणारें आहे तें पुढील रोगावर अमोलिक उपाय आहे

क्षय, खोकला, दम, अपचन, मोठें पोट, काड्यांसारखीं हाडें, ओकारी, शौचाला घाण, वाईट दुधानें होणारें रोग, कंडू, आंकडी वगैरे. डा० गोखले एम्. ए. एम्. डी यांनीं पुष्कळ वर्षांच्या अनुभवानें प्रथम तयार केलेलें. इतर सर्व बालामृतें याच्या रंगीत नकला ! रंगीत साखरेचे पाक पाजून नसते रोग मुलांना विकत घेऊ नका.

किं. १८२ आणे पो. ख. ०४ पूर्ण गुणास ३ बाटल्यांची किं. पो. ख. सह २८९

पत्ताः-- हिंदु फ्यामिली मेडिकल हॉल माधवबाग मुंबई नं. ४ नं. २७



## जाहीरात.

!!! डाक्टर जी. बी. यांची सुवासिक औषधी तपकीर !!!

!! मागवा व खात्री करून घ्या !!

REGISTERED TRADE MARK



ह्या तपकीरीचा शेंकडों लोकांनीं अनुभव घेऊन सर्टिफिकीटें दिलीं आहेत. शिवाय वैद्य व डाक्टर लोकांचीं या तपकीरीच्या स्वच्छते बद्दल व गुणाबद्दल अनुकूल मतें आह्माकडे आलेली आहेत. ही तपकीर पिनस. अर्धाशिशी, डोके दुखणें व डोक्यांतील मेंदुचे इतर सर्व रोग तसेंच पडसें वगैरे विकारांवर फार वस्ताद आहे. ही ओढल्यानें मेंदुतील दूषित धातु पातळ होऊन नेत्रद्वारें व नाकांतून बाहेर निघून जाते व मस्तकांतील मेंदु स्वच्छ होऊन बुद्धी व ज्ञान तीव्र व वृद्धिंगत होतात. मज्जेसंबंधीं रोग दूर करणारें या सारखें सुलभ साधन दुसरें नाहीं. साधी तपकीर दहा वीस वेळां ओढून जो उपयोग होतो तो गूण आमची ही सुवासिक तपकीर फक्त दोन तीन वेळ ओढल्यानें करते. एक पैशाच्या साध्या तपकीरींत आमच्या सुवासिक तपकीरीच्या दोन चिमटी मिळाविल्या असतां सर्व तपकीर सुगंधी होते. शेंकडों लोक ही तपकीर आपल्या कुटुंबांत नित्य लागणाऱ्या औषधाप्रमाणें संग्रही ठेवतात साध्या तपकीरी प्रमाणें ह्या आमच्या तपकीरींतील सुवास व तीव्रता एकदोन दिवसांत नष्ट होत नाहींत. हे गूण आमच्या तपकीरींत एक वर्षपर्यंत कायम रहातात ही तपकीर आह्मीं मोठ्या श्रमानें व वैद्यलोकांच्या सहायानें तयार करविली आहे एक वेळ अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी. एक आण्याचीं तिकीटें पाठविलीं असतां नमुन्याची बाटली पाठवूं. सर्वांस घेण्यास सुलभ पडावी ह्मणून हिची किंमत आह्मीं फायद्याकडे न पहातां फारच माफक ठेविली आहे.

एक बाटलीस ४ आणे व वेगळा टपाल व व्ही. पी. खर्च ३ आणे

डजन बाटल्यास रु. २–८ " " " ६ आणे

सूचना ] पत्र लिहिणारांनीं इंग्रजींत अथवा बालबोध लिपींत आमचेवर दया करून लिहींणें कळावें. तपकीर मिळण्याचें ठिकाणः—

गुरुबसवा आणि कंपनी,

नो. नं. २८ सावकार पेठ, मद्रास



"बादशाही याकुती" बनविण्याचा हक्क प्रसिद्ध डॉक्टर चांदलीआ ह्यांनाच आहे.

## नामर्दाईवर "बादशाही याकुती"

आमच्या खऱ्या "बादशाही याकुतीचा" सरकारी रजिस्टर नंबर २२० आहे. ह्याच याकुतीनें सर्व प्रकारचे धातु विकार दूर होऊन नपुंसकत्वपणाचा पूर्णपणें नाश होतो व हमेश टिकेल अशी युवावस्था प्राप्त होते. हेंच औषध हिंदुस्थान युरोप व आफ्रिकेंत प्रसिद्ध आहे. किंमत रुपये १०.

**कमजोरीवर** "पुरुषार्थ लेप" गुप्त अंगाच्या कमजोरीचा नाश करून पुर्ण तरतरी आणणारा प्रख्यात गुणकारी लेप. किंमत २९ रु.

## पुपरम्यावर वस्ताद प्रमेहांतक.

लघ्वीची आग, पू ठणके हटकून बंद करणारा जगप्रसिद्ध "प्रमेहांतक किंमत रुपये २ रोग बरा करूं इच्छिणाऱ्यांनीं हेंच औषध घ्यावें.

जास्त माहितीसाठीं क्याटलॉग मागवा.

पत्ता--चांदलीआ कंपनी काळबादेवी रोड पोपटवाडी मुंबई.

नो० नं० २९



## Oriental Government security LIFE ASSURANCE COMPANy Limited

ESTABLISHED IN 1874.

R. Paterson, Brown, Manager,

HEAD OFFICE—BOMBAY

**FUNDS Exceed 4 crores**

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up to, treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested:—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securitie and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application to

M. DESOUZA,

CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH No. No 30


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वन्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.